# राज्यशास्त्र

इयत्ता बारावी











शासन निर्णय क्रमांक : अभ्यास-2116/(प्र.क्र.43/16) एसडी-4 दिनांक 25.4.2016 अन्वये स्थापन करण्यात आलेल्या समन्वय समितीच्या दिनांक 30.1.2020 रोजीच्या बैठकीमध्ये हे पाठ्यपुस्तक सन 2020-21 या शैक्षणिक वर्षापासून निर्धारित करण्यास मान्यता देण्यात आली आहे.

# राज्यशास्त्र

## इयत्ता बारावी

२०२०

महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ, पुणे.

E2T5H6

आपल्या स्मार्टफोनवरील DIKSHA App द्वारे पाठ्यपुस्तकाच्या शीर्षक पृष्ठावरील Q.R. Code द्वारे डिजिटल पाठ्यपुस्तक, त्या पाठासंबंधित अध्ययन-अध्यापनासाठी उपयुक्त दृक्-श्राव्य साहित्य उपलब्ध होईल.

प्रथमावृत्ती : २०२०

© **महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ, पुणे ४११ ००४.**

महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळाकडे या पुस्तकाचे सर्व हक्क राहतील. या पुस्तकातील कोणताही भाग संचालक, महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ यांच्या लेखी परवानगीशिवाय उद्‌धृत करता येणार नाही.

**राज्यशास्त्र विषय समिती**

डॉ.श्रीकांत परांजपे, अध्यक्ष
डॉ.प्रकाश पवार, सदस्य
डॉ.मोहन खडसे, सदस्य
डॉ.अभय दातार, सदस्य
प्रा.संगीता आहेर, सदस्य
प्रा.अजिंक्य गायकवाड, सदस्य
डॉ.नीता बोकील, सदस्य
श्री.मोगल जाधव, सदस्य
प्रा.गौरी कोपर्डेकर, सदस्य
सौ.वर्षा सरोदे, सदस्य-सचिव

**राज्यशास्त्र अभ्यासगट समिती**

| | |
|---|---|
| डॉ.प्रविण भागडीकर | प्रा.दिलीप कडू |
| प्रा.संगिता दीक्षित | डॉ.नंदकिशोर बोकाडे |
| डॉ.राजेंद्र इंगळे | डॉ.रामदास ढगे |
| प्रा.वीणा केंची | डॉ.बालाजी कतूरवार |
| डॉ.रोहिदास मुंढे | डॉ.प्रभाकर लोंढे |
| डॉ.व्यंकटलक्ष्मी पुरणशेट्टीवार | श्री.रविंद्र जिंदे |
| प्रा.अरुणा खामकर | श्री.सुभाष राठोड |
| प्रा.पीतांबर उरकुडे | श्रीमती मुग्धा महाबळ |

**संयोजक**

सौ. वर्षा सरोदे
साहाय्यक विशेषाधिकारी,
इतिहास व नागरिकशास्त्र
पाठ्यपुस्तक मंडळ, पुणे.

**लेखक**

डॉ.श्रीकांत परांजपे
डॉ.उत्तरा सहस्त्रबुद्धे
डॉ.संहिता जोशी
प्रा.अजिंक्य गायकवाड
प्रा.मानसी मिसाळ
प्रा.गायत्री लेले

**नकाशाकार**

श्री.रविकिरण जाधव

**मुखपृष्ठ व सजावट**

श्री.देवदत्त बलकवडे

**अक्षरजुळणी** : मुद्रा विभाग,
पाठ्यपुस्तक मंडळ, पुणे

**कागद** : ७० जी.एस.एम.क्रिमवोव्ह

**मुद्रणादेश** :

**मुद्रक** :

**निर्मिती**

श्री. सच्चितानंद आफळे,
मुख्य निर्मिती अधिकारी
श्री. प्रभाकर परब,
निर्मिती अधिकारी
श्री. शशांक कणिकदळे,
साहाय्यक निर्मिती अधिकारी

**प्रकाशक**

श्री. विवेक उत्तम गोसावी, नियंत्रक
पाठ्यपुस्तक निर्मिती मंडळ, प्रभादेवी, मुंबई-२५.

# भारताचे संविधान

## उद्देशिका

**आम्ही, भारताचे लोक, भारताचे एक सार्वभौम समाजवादी धर्मनिरपेक्ष लोकशाही गणराज्य** घडविण्याचा
व त्याच्या सर्व नागरिकांस:

सामाजिक, आर्थिक व राजनैतिक **न्याय;**
विचार, अभिव्यक्ती, विश्वास, श्रद्धा
व उपासना यांचे **स्वातंत्र्य;**
दर्जाची व संधीची **समानता;**

निश्चितपणे प्राप्त करून देण्याचा
आणि त्या सर्वांमध्ये व्यक्तीची प्रतिष्ठा
व राष्ट्राची एकता आणि एकात्मता
यांचे आश्वासन देणारी **बंधुता**
प्रवर्धित करण्याचा संकल्पपूर्वक निर्धार करून;

**आमच्या संविधानसभेत**
आज दिनांक सव्वीस नोव्हेंबर, १९४९ रोजी
**याद्वारे हे संविधान अंगीकृत आणि अधिनियमित करून स्वत:प्रत अर्पण करीत आहोत.**

## राष्ट्रगीत

जनगणमन-अधिनायक जय हे
भारत-भाग्यविधाता ।
पंजाब, सिंधु, गुजरात, मराठा,
द्राविड, उत्कल, बंग,
विंध्य, हिमाचल, यमुना, गंगा,
उच्छल जलधितरंग,
तव शुभ नामे जागे, तव शुभ आशिस मागे,
गाहे तव जयगाथा,
जनगण मंगलदायक जय हे,
भारत-भाग्यविधाता ।
जय हे, जय हे, जय हे,
जय जय जय, जय हे ।।

## प्रतिज्ञा

भारत माझा देश आहे. सारे भारतीय माझे बांधव आहेत.

माझ्या देशावर माझे प्रेम आहे. माझ्या देशातल्या समृद्ध आणि विविधतेने नटलेल्या परंपरांचा मला अभिमान आहे. त्या परंपरांचा पाईक होण्याची पात्रता माझ्या अंगी यावी म्हणून मी सदैव प्रयत्न करीन.

मी माझ्या पालकांचा, गुरुजनांचा आणि वडीलधाऱ्या माणसांचा मान ठेवीन आणि प्रत्येकाशी सौजन्याने वागेन.

माझा देश आणि माझे देशबांधव यांच्याशी निष्ठा राखण्याची मी प्रतिज्ञा करीत आहे. त्यांचे कल्याण आणि त्यांची समृद्धी ह्यांतच माझे सौख्य सामावले आहे.

# प्रस्तावना

प्रिय विद्यार्थी मित्रांनो,

राज्यशास्त्र हा विषय सत्ताव्यवस्था आणि शासन प्रणालीविषयी आपणास अधिक व्यापक समज देण्याच्या दृष्टीने साह्यभूत ठरतो. शासन प्रणालीस विविध स्वरूपाचे पैलू आहेत. इयत्ता अकरावीच्या पाठ्यपुस्तकात आपणास राज्यशास्त्राचे विविध घटक ज्ञात करून देण्यात आले आहेत. त्यात राज्यशास्त्रातील प्रमुख संकल्पना, विविध स्वरूपाच्या शासनपद्धती, प्रशासकीय प्रणाली आणि आंतरराष्ट्रीय संबंध यांचा अंतर्भाव आहे. आता इयत्ता बारावीत मागील वर्षाच्या थोडे पुढे जाऊन राज्यशास्त्र या विषयाचा अभ्यास करणार आहोत.

बारावीच्या पाठ्यपुस्तकात जगातील इ.स.१९९१ पासूनच्या समकालीन घटनांचा निर्देश आहे. त्यात जगातील १९९१ पासूनच्या विविध घटनांचे स्थान तसेच जागतिकीकरणाच्या संदर्भात ज्या संकल्पना विविध चर्चेतून उदयाला आल्या त्यांचा आपणास परिचय करून देण्यात आला आहे. पर्यावरण, शाश्वत विकास, गरिबी आणि लिंगभावासारखे मानवी प्रश्न इत्यादींचा या पाठ्यपुस्तकात समावेश आहे. त्यासोबतच राष्ट्रीय एकात्मतेसमोरील आव्हाने तसेच त्याबाबतची चिंता आणि त्याचे महत्त्व भारताच्या संदर्भात अभ्यास करणार आहोत. या सर्व प्रश्नांकडे शासन कोणत्या भूमिकेतून पाहते? त्याचे प्रतिबिंब आपणास 'सुशासन' या प्रकरणात पाहावयास मिळते. शेवटच्या प्रकरणात भारताच्या परराष्ट्रीय धोरणाचा सर्वेक्षणात्मक आढावा घेतला आहे.

अकरावी आणि बारावीची दोन्ही पाठ्यपुस्तके आपणास राज्यशास्त्र या विषयाची सखोल माहिती देण्याच्या दृष्टीने उपयुक्त ठरणार आहेत. ही पाठ्यपुस्तके राज्यशास्त्र विषयाचा समग्र आशय समजून घेण्यात आणि आपल्या सभोवताली घडणाऱ्या घटनांचे पृथःकरण करण्यात सक्षम ठरणार आहेत.

अध्ययन अधिक सुलभ, रंजक व कृतीयुक्त होण्यासाठी माहितीपर चौकटी, विविध कृती, क्यू. आर.कोडवर देण्यात येणारे साहित्य याचा तुम्हांला निश्चितच उपयोग होईल.

राज्यशास्त्र विषय समिती, अभ्यासगट, लेखक, चित्रकार इत्यादींनी आशय अधिकाधिक समृद्ध करण्याच्या संदर्भात अथक परिश्रम घेतले आहेत. पाठ्यपुस्तकात आशय अधिक तपशीलाने समजून घेण्यासाठी वेबसाईट्स देण्यात आलेल्या आहेत.

आपणाकडून आलेल्या सूचना आणि शिफारशींचे स्वागत करण्यात येईल. आम्ही अशी अपेक्षा करतो की, विद्यार्थी, पालक आणि शिक्षक या सर्व घटकांकडून या पाठ्यपुस्तकाचे स्वागत होईल.


**(विवेक गोसावी)**
संचालक
महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम
संशोधन मंडळ, पुणे.


पुणे
दिनांक : २१ फेब्रुवारी २०२०
भारतीय सौर : २ फाल्गुन १९४१

## पाठ्यपुस्तकाविषयी....

इयत्ता ११ वी मध्ये राज्यशास्त्राच्या विविध घटकांची तुमची ओळख झाली आहे. तुम्ही राज्यशास्त्रातील काही संकल्पनांचा अभ्यास केला आहे. जसे की, शासनाचे कामकाज, प्रशासकीय यंत्रणा आणि आंतरराष्ट्रीय नातेसंबंध. इयत्ता १२ वी च्या या पाठ्यपुस्तकात तुम्हांला राज्यशास्त्राच्या काही नवीन घटकांची ओळख करून देण्यात येईल.

पाठ्यपुस्तकाच्या सुरुवातीला १९९१ नंतर जगात झालेल्या बदलांचा आढावा घेतला आहे. सोव्हिएट रशियाच्या विघटनानंतर जागतिक राजकारणातील महत्त्वाच्या प्रवाहांवर पहिले प्रकरण भाष्य करते. १९९१ नंतरच्या जागतिक राजकारणातील बदलत्या प्रवाहांचा व्यापक आढावा या प्रकरणात घेतला आहे.

यापुढील दोन प्रकरणे १९९१ नंतरच्या युगात नव्याने निर्माण झालेल्या काही संकल्पना आणि समस्यांवर केंद्रित आहेत. दुसरे प्रकरण जागतिकीकरणावर आहे. जागतिकीकरणाच्या विविध मितींवर यात भाष्य केले आहे. यात राजकीय, आर्थिक, वैचारिक, तांत्रिक आणि सामाजिक-सांस्कृतिक पैलूंचा समावेश होतो. याशिवाय जागतिकीकरणाचा भारतातील राजकीय आणि आर्थिक यंत्रणेवरील परिणामांवर देखील यात भाष्य केले आहे. तिसऱ्या प्रकरणात पर्यावरण आणि शाश्वत विकास, गरिबी आणि स्त्री-पुरुष यांसारख्या मानवतावादी समस्यांवर लक्ष केंद्रित केले आहे.

यापुढील दोन प्रकरणे सद्यकालीन भारतातील समस्यांवर आधारित आहेत. या नवीन समस्यांना हाताळताना राज्याची भूमिका काय असेल यावर या प्रकरणात भर दिला आहे. चौथे प्रकरण, राष्ट्रीय एकीकरण आणि समस्या यांबाबत भारत अनुभवत असलेल्या समस्यांशी निगडित आहे. आज सुशासन आणि नागरिककेंद्रित शासन ही राज्याची भूमिका आहे. पाचवे प्रकरण सुशासनामार्फत शासन नागरिकांना सेवा कशा पुरवते यावर आधारित आहे.

सहावे प्रकरण भारताच्या जगातील भूमिकेवर भाष्य करते. भारतीय परराष्ट्र धोरणात बदलत्या काळात कसे बदल झाले आणि जागतिक चश्म्यातून बघताना भारताला तोंड द्यावे लागणाऱ्या समस्यांवर केंद्रित आहे.

एकत्रितपणे, इयत्ता ११ वी आणि १२ वी च्या पाठ्यपुस्तकातून, राज्यशास्त्राचा पाया निर्माण करण्याचा तसेच भारतातील व जगातील सद्यकालीन विवादांची ओळख करून देण्याचा प्रयत्न केला आहे. विषय उत्तम प्रकारे समजून घेण्यासाठी आणि सामाजिक शास्त्रांतील मानव्य विद्याशाखांतील पुढील उच्च शिक्षणासाठी याचा उपयोग होईल. याशिवाय स्पर्धात्मक परीक्षांसाठी उत्तम पायाभूत माहिती यातून मिळेल.

आम्हांला आशा आहे, की पुढील अभ्यासात तुम्हांला या पाठ्यपुस्तकाची मदत होईल. भविष्यकालीन वाटचालीसाठी शुभेच्छा !

# क्षमता विधाने

| अ.क्र. | घटक | क्षमता |
|---|---|---|
| १. | १९९१ नंतरचे जग | • शीतयुद्धोत्तर काळात आंतरराष्ट्रीय संबंधात झालेल्या बदलांचा आढावा घेणे.<br>• मानवी समस्यांचे वाढते महत्व, दहशतवादाची समस्या आणि बहुध्रुवीयता आणि प्रादेशिकवाद या संकल्पना समजून घेणे. |
| २. | जागतिकीकरण | • आर्थिक, राजकीय, विज्ञान आणि तंत्रज्ञान आणि सामाजिक आणि सांस्कृतिक क्षेत्रात जागतिकीकरणाने आणलेले बदल समजून घेणे आणि त्याचे विश्लेषण करण्याची क्षमता निर्माण करणे. |
| ३. | मानवतावादी समस्या | • पर्यावरण आणि शाश्वतता, गरिबी आणि विकास आणि महिलांची स्थिती या समकालीन संकल्पनांची ओळख करून देणे.<br>• त्या समकालीन विषयांचे भारताच्या संदर्भात विश्लेषण करण्याची क्षमता निर्माण करणे. |
| ४. | राष्ट्रीय एकात्मता | • राष्ट्रीय ऐक्य आणि राष्ट्रीय एकात्मतेची मूल्ये आत्मसात करण्यास प्रवृत्त करणे.<br>• भारतात शांतता, स्थैर्य आणि राष्ट्रीय एकात्मतेला असलेल्या आव्हानांना समजून घेणे. |
| ५. | सुशासन | • लोकप्रशासनाच्या पारंपरिक दृष्टिकोनात झालेल्या बदलांबाबतचे विचार समजून घेणे.<br>• भारतातील सुशासनाबाबतचे वेगवेगळे पैलू समजून घेणे. |
| ६. | भारत आणि जग | • भारताच्या परराष्ट्रीय धोरणाच्या विकासाची प्रक्रिया समजून घेणे.<br>• भारताचे विविध राष्ट्रांशी असलेल्या संबंधांचे विश्लेषण करण्याची क्षमता निर्माण करणे. |


# अनुक्रमणिका



| | | |
|---|---|---|
| | जगाचा नकाशा | |
| | आशिया खंडाचा नकाशा | |
| १. | १९९१ नंतरचे जग | १ |
| २. | १९९१ नंतरच्या महत्वाच्या संकल्पना आणि समस्या : जागतिकीकरण | १४ |
| ३. | १९९१ नंतरच्या महत्वाच्या संकल्पना आणि समस्या : मानवतावादी प्रश्न | २४ |
| ४. | समकालीन भारत : शांतता, स्थैर्य आणि राष्ट्रीय एकात्मतेसमोरील आव्हाने | ३५ |
| ५. | समकालीन भारत : सुशासन | ४८ |
| ६. | भारत आणि जग | ५९ |
| I. | परिशिष्ट : संक्षिप्त रूपे | |
| II. | परिशिष्ट : ईशान्य भारतातील राज्यांसंदर्भात काही माहिती | |



• **S.O.I. Note :** The following foot notes are applicable : (1) © Government of India, Copyright : 2020. (2) The responsibility for the correctness of internal details rests with the publisher. (3) The territorial waters of India extend into the sea to a distance of twelve nautical miles measured from the appropriate base line. (4) The administrative headquarters of Chandigarh, Haryana and Punjab are at Chandigarh. (5) The interstate boundaries amongst Arunachal Pradesh, Assam and Meghalaya shown on this map are as interpreted from the "North-Eastern Areas (Reorganisation) Act. 1971," but have yet to be verified. (6) The external boundaries and coastlines of India agree with the Record/Master Copy certified by Survey of India. (7) The state boundaries between Uttarakhand & Uttar Pradesh, Bihar & Jharkhand and Chattisgarh & Madhya Pradesh have not been verified by the Governments concerned. (8) The spellings of names in this map, have been taken from various sources.

# जग – राजकीय (प्रमुख देश)






# आशिया खंडातील प्रमुख देश

# १. १९९१ नंतरचे जग

इयत्ता अकरावीमध्ये आपण १९४५ ते १९९१ दरम्यानच्या आंतरराष्ट्रीय घडामोडींचा अभ्यास केला. या प्रकरणात आपण १९९१ नंतरच्या कालखंडाचा अभ्यास करणार आहोत.

नोव्हेंबर १९८९ मध्ये बर्लिनची भिंत पडली आणि सोव्हिएट रशियाच्या विघटनाची सुरुवात होऊन अखेरीस शीतयुद्धाचा काळ समाप्त झाला. अशा प्रकारे अमेरिका आणि सोव्हिएट रशिया यांच्यामधील वर्चस्वाच्या लढाईवर आधारित पूर्व-पश्चिम वादही यामुळे संपुष्टात आले.

शीतयुद्धोत्तर काळातील घटना व घडामोडींचा आढावा पुढील पाच मुख्य परिमाणांद्वारे घेता येईल.

**(i) शीतयुद्धाचा शेवट आणि नव्या राष्ट्रांचा उदय :** शीतयुद्धाच्या शेवटासोबत अमेरिका आणि सोव्हिएट रशिया या दोन महासत्तांनी व्यापलेली आंतरराष्ट्रीय व्यवस्था संपुष्टात आली. याच काळात सोव्हिएट रशियाचे विघटन होऊन नवीन राष्ट्रे उदयास आली.

**(ii) एकध्रुवीयतेचा उदय :** अमेरिका आणि सोव्हिएट रशिया यांच्यामधील शीतयुद्ध संपल्याने द्विध्रुवीयता संपुष्टात आली. पुढे अमेरिकेचे वर्चस्व असलेली एकध्रुवीय आंतरराष्ट्रीय व्यवस्था उदयास आली.

**(iii) मानवी हक्क आणि मानवतावादी हस्तक्षेप :** मानवी हक्कांबाबतच्या जागरूकतेत वृद्धी झाली आणि मानवतावादी दृष्टिकोनातून झालेल्या हस्तक्षेपांमध्ये वाढ झाली.

**(iv) दहशतवाद :** ११ सप्टेंबर २००१ ला अमेरिकेविरुद्ध झालेल्या हल्ल्यानंतर (ज्याला ९/११ हल्ला म्हणून ओळखले जाते) दहशतवादाचे स्वरूप बदलत गेले.

**(v) बहुध्रुवीयता आणि प्रादेशिकतावाद :** या काळात मुख्यतः चीन आणि भारत या राष्ट्रांचा प्रभाव वाढला, इंडो-पॅसिफिक प्रदेशाचे प्रस्थ वाढले आणि व्लादिमीर पुतीन यांच्या अध्यक्षतेखाली रशियाचाही उदय झाला. या घडामोडींबरोबरच प्रादेशिकतावादाचा विकास झाला ज्यामुळे बहुध्रुवीय जागतिक व्यवस्था अस्तित्वात आली. प्रदेश आणि प्रादेशिक संस्थांचे महत्त्व वाढत गेले.



**माहीत आहे का तुम्हांला ?**

महासत्तेला आंतरराष्ट्रीय राजकारणामध्ये महत्वाचे स्थान असते. महासत्तांकडे जागतिक घडामोडींवर प्रभाव टाकून आपले हित साधण्याची क्षमता असते. दुसऱ्या महायुद्धानंतर शीतयुद्धाच्या काळात अमेरिका आणि सोव्हिएट रशिया या दोन महासत्ता एकमेकांसमोर उभ्या ठाकल्या होत्या.

## शीतयुद्धाचा शेवट आणि नव्या राष्ट्रांचा उदय


१९८९ मधील पूर्व युरोपातील क्रांतीनंतर आंतरराष्ट्रीय संबंधांमध्ये दोन महत्वाचे प्रवाह आढळतात. पहिला म्हणजे स्वयंनिर्णयांच्या हक्कांवर आधारित वांशिक राष्ट्रवादाच्या संकल्पनेचा आग्रह आणि दुसरा म्हणजे द्विध्रुवीयतेचा अस्त. अमेरिका आणि सोव्हिएट रशिया या दोन महासत्ता अस्तित्वात असल्यामुळे द्विध्रुवीयता अबाधित होती. सत्तेच्या या दोन केंद्रांमध्ये जग विभाजित झाले होते. सोव्हिएट रशियाच्या विघटनामुळे एक महासत्ता लोप पावली आणि जगात द्विध्रुवीयता नष्ट झाली.

पूर्व युरोपीय राज्यांमधील क्रांती ही तेथील मध्यमवर्गाच्या वाढत्या अपेक्षांमधून निर्माण झाली होती. अधिक स्वातंत्र्य आणि आर्थिक स्थैर्य मिळावे अशी त्यांची इच्छा होती म्हणूनच सोव्हिएटप्रणित साम्यवादी शासनांविरुद्ध त्यांनी उठाव केला. तेथे स्वतंत्र लोकशाही राज्ये उदयास आली. सोव्हिएट रशियाच्या अंतर्गत राजकीय आणि आर्थिक स्वातंत्र्य मिळवण्यासाठीदेखील


चळवळी उदयास आल्या. त्यामुळे वेगवेगळ्या राज्यांनी अधिक स्वायत्ततेसाठी आग्रह धरून कालांतराने स्वातंत्र्याची मागणी केली. यादरम्यान विविध प्रदेशांतील लोकसमूहांच्या वांशिक अस्मिता प्रबळ होऊ लागल्या होत्या. यामुळे वांशिक अस्मितेवर आधारित स्वतंत्र राष्ट्र निर्मितीच्या मागण्या होऊ लागल्या.

याची काही उदाहरणे पुढीलप्रमाणे –

- युरोपमध्ये नवीन राष्ट्रे खालीलप्रमाणे निर्माण झाली.
  - चेकोस्लोव्हाकियाचे ‘चेक गणराज्य’ आणि ‘स्लाव गणराज्य’ या दोन राष्ट्रांमध्ये विभाजन झाले.
  - युगोस्लाव्हियाचे विघटन होऊन क्रोएशिया, स्लोवेनिया, सर्बिया, बोस्निया आणि हर्झेगोविना, उत्तर मेसिडोनिया, माँटेनिग्रो ही राष्ट्रे उदयास आली.
- सोव्हिएट रशियाच्या विघटनातून काही नवी राष्ट्रे अस्तित्वात आली ती पुढीलप्रमाणे : आर्मेनिया, मॉल्डोव्हा, एस्टोनिया, लाटव्हिया, लिथूआनिया, जॉर्जिया, अझरबैजान, ताजिकिस्तान, किरगिझस्तान, बेलारुस, उझबेकिस्तान, तुर्कमेनिस्तान, युक्रेन, कझाकस्तान आणि रशिया.
- स्वशासनाच्या हक्कावर आधारलेल्या वांशिक राष्ट्रवादाला अनुसरून नव्या राज्यांच्या निर्मितीचा प्रवाह जगाच्या इतर भागांमध्येही दिसून आला. काही नवे देश जे स्वतंत्र राज्य म्हणून उदयास आले ते होते–
  - पूर्व तिमोर (इंडोनेशियापासून स्वातंत्र्य)
  - एरिट्रिया (इथियोपियापासून स्वातंत्र्य)
  - दक्षिण सुदान (सुदानपासून स्वातंत्र्य)
- आजही वांशिक राष्ट्रवादावर आधारित स्वातंत्र्याच्या मागण्या होत आहेत :




युरोप



सोव्हिएट रशियामधील पूर्वीचे देश

- कॅटलोनिया (स्पेनपासून स्वातंत्र्य हवे आहे.)
- कोसोवो (सर्बियापासून स्वातंत्र्य हवे आहे. युरोपातील काही देशांनी कोसोवोचा स्वतंत्र देशाचा दर्जा मान्य केला आहे.)
- चेचन्या (रशियापासून स्वातंत्र्य हवे आहे.)

## एकध्रुवीय जागतिक व्यवस्थेचा उदय

१९९० मध्ये इराकने कुवेतवर आक्रमण करून कुवेतच्या भूप्रदेशावर ताबा मिळवला. याचे पडसाद जागतिक स्तरावर उमटले. संयुक्त राष्ट्रांने या प्रकरणाची दखल घेत यावर चर्चा केली. इराक विरुद्धच्या कारवाईत पुढाकार घेत अमेरिकेने एका बहुराष्ट्रीय सैन्याचे नेतृत्व केले. या युद्धात कुवेतची इराकच्या ताब्यातून सुटका केली. अमेरिकेचे तत्कालीन राष्ट्राध्यक्ष जॉर्ज एच. बुश (सिनियर) यांच्या मते हा एक नैतिक विजय होता. या नव्या जागतिक परिस्थितीला 'New World Order' अशी संज्ञा वापरली गेली. अमेरिकेच्या या कृतीला जागतिक पातळीवर पाठिंबा मिळाला. यात सोव्हिएट रशिया, चीन, नाटो मधील सहभागी देश, इस्राएल आणि अरब देशांमध्ये सौदी अरेबियाचादेखील समावेश होता. अंतर्गत समस्यांनी ग्रासलेल्या सोव्हिएट रशियाचे १९९१ मध्ये विघटन झाले. अमेरिकेसमोर फारसे वैचारिक आव्हान उरले नव्हते. कालांतराने 'नवीन जागतिक व्यवस्था' या संज्ञेचा अर्थ राष्ट्रीय सुरक्षेशी जोडून जागतिक पातळीवर अमेरिकन वर्चस्वाला आणि नेतृत्वाला सर्वमान्यता आहे असा घेण्यात आला. एकध्रुवीय जागतिक व्यवस्थेची ही पहिलीच अभिव्यक्ती होती.



कुवेत आणि इराक

### माहीत आहे का तुम्हांला ?


फ्रान्सिस फुकुयामा

अमेरिकन राजकीय भाष्यकार फ्रान्सिस फुकुयामा यांनी 'इतिहासाचा अंत' हा सिद्धांत मांडला. त्यांच्या मते सोव्हिएट रशियामध्ये साम्यवादाचा पाडाव झाल्यानंतर समाजवादी राजकीय, आर्थिक आणि सामाजिक व्यवस्थांचा अंत होऊन आता जगभरात उदारमतवादी लोकशाही व्यवस्था निर्माण होतील.

अमेरिका आता जगात एक प्रबळ राष्ट्र म्हणून प्रस्थापित झाले होते. अमेरिकेच्या या वर्चस्वाला राजकीय आणि आर्थिक आयाम होते. राजकीयदृष्ट्या, पूर्व युरोपातील अनेक पूर्वाश्रमीच्या साम्यवादी राजवटींनी अमेरिकी उदारमतवादी-लोकशाही तत्वांवर आधारलेली शासनप्रणाली स्वीकारली. सुशासनाची संकल्पनासुद्धा लोकशाहीशी जोडली गेली. आर्थिक क्षेत्रात देखील बऱ्याच देशांनी समाजवादी अर्थव्यवस्थेचा त्याग केला.

अमेरिकन वर्चस्वाचा आणखी एक महत्वाचा पैलू म्हणजे तिचे सॉफ्ट पॉवर. सैनिकी बळाचा वापर न करता दुसऱ्या देशांवर प्रभाव टाकणे म्हणजे सॉफ्ट पॉवर. हा प्रभाव पाडण्यासाठी आर्थिक, सामाजिक, सांस्कृतिक आणि इतर साधनांचा वापर केला जातो.

### उदारमतवादी लोकशाही म्हणजे काय ?

उदारमतवादी लोकशाही हा प्रातिनिधिक लोकशाहीचाच एक प्रकार आहे. जागतिक स्तरावर आज उदारमतवादी लोकशाही व्यवस्था ही एक प्रबळ राजकीय विचारधारा आहे. यात वैयक्तिक स्वातंत्र्याला महत्वाचे स्थान आहे. उदारमतवादी लोकशाहीची काही ठळक वैशिष्ट्ये पुढीलप्रमाणे :

- सार्वत्रिक मताधिकार
- स्वतंत्र आणि न्याय्य निवडणुका
- स्पर्धात्मक पक्षीय राजकारण
- कायद्याचे राज्य

### माहीत आहे का तुम्हांला ?


जोसेफ नाय

अमेरिकन समाजशास्त्रज्ञ जोसेफ नाय यांनी सत्तेचे विभाजन दोन प्रकारांत केले आहे- हार्ड पॉवर आणि सॉफ्ट पॉवर. हार्ड पॉवर म्हणजे ''अशी क्षमता जी दुसऱ्यांना त्यांच्या प्राधान्यक्रमाच्या आणि इच्छेच्या विरुद्ध वागण्यास भाग पाडते''. यात धमकी आणि प्रलोभने दाखवून दुसऱ्यांवर सक्ती करणे याचा समावेश होतो. याविरुद्ध सॉफ्ट पॉवर म्हणजे ''अशी क्षमता ज्यामुळे तुम्हांला हवे तेच दुसऱ्यांना हवेसे वाटेल.'' अधिक स्पष्ट करायचे असल्यास, 'सक्तीपेक्षा आकर्षण निर्माण करून स्वत:ची ध्येये साध्य करण्याची क्षमता' म्हणजे सॉफ्ट पॉवर होय.

### अमेरिकन सॉफ्ट पॉवरची काही उदाहरणे

- शैक्षणिक देवाणघेवाण कार्यक्रम - अमेरिका हा देश विद्यार्थ्यांसाठी अतिशय अनुकूल आहे. गेल्या काही वर्षांमध्ये अमेरिकेत शिकणाऱ्या आंतरराष्ट्रीय विद्यार्थ्यांचा आकडा भरपूर प्रमाणात वाढला आहे.
- आंतरजाल - आंतरजालाद्वारे लोकशाही व अभिव्यक्ती स्वातंत्र्याचा प्रसार ही सुद्धा अमेरिकेच्या सॉफ्ट पॉवरचा भाग आहे.
- फूड चेन्स - अमेरिकन फूड चेन्सला जागतिक ओळख लाभलेली आहे. मॅकडोनाल्ड, सबवे, पिझ्झा हट, बर्गर किंग इत्यादीही याची काही उदाहरणे आहेत.

### मानवी हक्क आणि मानवतावादी हस्तक्षेप

राष्ट्रांचे विघटन आणि नव्या राष्ट्रांचा उदय या प्रक्रिया नेहमीच शांततामय असतीलच असे नाही. उदा., युगोस्लाव्हियाच्या बोस्निया आणि हर्झेगोविना प्रांतांमध्ये प्रचंड प्रमाणात वांशिक हिंसाचार झाला. चेचन्या, पूर्व तिमोर आणि एरिट्रीया या प्रदेशांमध्ये देखील संघर्ष सुरू होता. हिंसेच्या या प्रसंगांमध्ये मानवी हक्कांच्या होत

## संयुक्त राष्ट्र शांतता रक्षक दल



शांतिसेना

संयुक्त राष्ट्रसंघाला स्वतःचे असे सैन्य नसते, परंतु जागतिक शांतता व सुरक्षितता प्रस्थापित करण्यासाठी संयुक्त राष्ट्रांच्या सदस्य देशांच्या स्वतःच्या सैन्यातून एका शांतिसेनेची स्थापना केली आहे. या सेनेला 'संयुक्त राष्ट्र शांतता रक्षक दल' असे म्हणतात. बऱ्याचदा शस्त्रसंधी लागू असताना संयुक्त राष्ट्र सुरक्षा परिषदेच्या शिफारसीनुसार संघर्षप्रवण किंवा युद्धक्षेत्रांमध्ये शांतता रक्षक दलाला पाचारण केले जाते.

असलेल्या पायमल्लीमुळे लोकांमध्ये चिंतेचे वातावरण होते. एक महत्त्वाची जागतिक संघटना म्हणून संयुक्त राष्ट्रे या देशांमध्ये हस्तक्षेप करून संघर्षाची किंवा युद्धाची परिस्थिती नियंत्रणात ठेवण्याचे प्रयत्न करते. शांतता रक्षण हे संयुक्त राष्ट्राच्या प्रमुख कार्यांमधील एक कार्य आहे.

शीतयुद्धोत्तर काळात संयुक्त राष्ट्रे युद्धजन्य परिस्थिती असणाऱ्या प्रदेशांत शांतता प्रस्थापित करण्याच्या दृष्टीने हस्तक्षेप सुरू ठेवतात, परंतु येथे या हस्तक्षेपाचे उद्दिष्ट केवळ चालू असणारे युद्ध थांबवणे हे नसून भविष्यात अशाप्रकारच्या संभाव्य युद्धांना आळा घालणे, शांतता प्रस्थापित करणे आणि पीडितांच्या मानवी हक्कांचे संरक्षण करणे हे आहे. याच कारणांसाठी संयुक्त राष्ट्राने कंबोडिया, सोमालिया आणि युगोस्लाव्हिया या देशांमध्ये हस्तक्षेप केला.

मानवी हक्कांबद्दलची वाढती जागरूकता आणि आंतरराष्ट्रीय कायद्यामध्ये त्यांना मिळालेल्या पाठबळामुळे 'मानवतावादी हस्तक्षेप' या हक्क संरक्षणाच्या नवीन संकल्पनेचा उदय झाला. १९९० चे दशक हे मानवतावादी हस्तक्षेपाचा सुवर्णकाळ म्हणावा लागेल.

**शीतयुद्धोत्तर काळातील मानवी हक्क :** १९९० पासून अनेक देशांनी मानवी हक्कांसंदर्भातील सहा मुख्य conventions आणि करारांना मंजुरी दिली. १७० हून अधिक देशांनी व्हिएन्ना येथे पार पडलेल्या १९९३ च्या जागतिक मानवी हक्क परिषदेत सहभाग नोंदवला. या परिषदेत त्यांनी मानवी हक्क संरक्षणाबाबत आपल्या जबाबदारीची पुन्हा एकदा पुष्टी केली.

यानंतर संयुक्त राष्ट्रांचे मानवाधिकार उच्चायुक्तांचे कार्यालय अस्तित्वात आले. त्यांचे मुख्य कार्य संयुक्त राष्ट्रांच्या मानवी हक्कांशी निगडित कार्यक्रमांमध्ये समन्वय साधणे व मानवी हक्कांप्रती सार्वत्रिक आदर प्रस्थापित करणे होय.

नव्वदीच्या दशकात मानवी हक्कांसंबंधीचे विचार प्रसारित करण्यात बिगर-सरकारी संस्थांनी महत्त्वाची भूमिका बजावली. इंटरनॅशनल कमिटी ऑफ द रेड क्रॉस, मेडिसीन्स सान्स फ्रंटीयर आणि ऑक्सफॅम या संस्था थेट युद्धक्षेत्रांमध्ये कार्यरत आहेत. या संस्था मानवी हक्कांबाबत मोहीम राबवून मानवी हक्क करार, मानवतावादी कायद्याचे पालन यांचा प्रसार करतात.

**माहीत आहे का तुम्हांला ?**

**भारताचे मानवतावादी कार्य**

**संयुक्त राष्ट्रांचे कंबोडियातील संक्रमण प्राधिकरण UNTAC फेब्रुवारी १९९२ ते सप्टेंबर १९९३ :** कंबोडियात शांतता राखण्यासाठी व मानवी हक्कांप्रती आदर निर्माण करण्यासाठी भारतातर्फे सैन्य आणि पोलीस दल पाठवण्यात आले. याचबरोबर कायदा व सुव्यवस्था राखणे, मुक्त आणि न्याय्य निवडणुकांचे आयोजन, नागरी प्रशासन ही कार्ये हाती घेतली. संक्रमण काळात कंबोडियन निर्वासितांचे प्रत्यवर्तन व पुनर्वसन करण्यात देखील भारताने महत्त्वाची भूमिका बजावली.

**संयुक्त राष्ट्रांची सोमालियातील मोहीम (UNOSOM-II) मार्च १९९३ ते डिसेंबर १९९४ :** सोमालियातील संयुक्त राष्ट्रांच्या अभियानात भारताने सक्रिय सहभाग नोंदवला होता. संयुक्त राष्ट्रांच्या शांतिसेनेतील भारतीय तुकडीने यशस्वीरीत्या मानवतावादी मदत पुरवण्याचे काम केले. त्यांनी मोठ्या प्रमाणात विहीरी खोदल्या, शाळा आणि मशिदी बांधल्या, फिरते दवाखाने व मदत शिबिरांद्वारे वैद्यकीय व पशुवैद्यकीय सुविधा पुरविण्यात आल्या. याचबरोबर हजारो निर्वासितांचे पुनर्वसन करून त्यांच्या प्रत्यवर्तनास साहाय्य केले.



कंबोडिया येथे भारतीय पोलीस अधिकारी



सोमालिया येथे भारतीय लष्करी डॉक्टर

### दहशतवाद

११ सप्टेंबर २००१ रोजी झालेल्या न्यूयॉर्क ट्रेड सेंटर आणि वॉशिंग्टन डी. सी. मधील पेंटागनवरील हल्ल्याने (जो ९/११ चा हल्ला म्हणून ओळखला जातो) दहशतवादाचे एक नवे रूप जगासमोर आले. दहशतवादाची संकल्पना तशी जुनी आहे. समाजात भीती निर्माण करून राजकीय, धार्मिक आणि वैचारिक उद्दिष्टे पूर्ण करण्याच्या हेतूने चालविलेला हिंसाचार किंवा निर्माण केलेला धाक म्हणजे दहशतवाद होय. साधारणपणे सरकारी संस्था आणि अधिकारी यांना प्रामुख्याने लक्ष्य केले जाते.



११ सप्टेंबर २००१ चा दहशतवादी हल्ला

१९७२ मध्ये म्युनिक येथे इस्राएलच्या ऑलम्पिक संघावर पॅलेस्टिनी दहशतवाद्यांनी केलेला हल्ला आधुनिक दहशतवादाचे पहिले उदाहरण म्हणता येईल.

**माहीत आहे का तुम्हांला ?**



जॉर्ज डब्ल्यू बुश

अल-कायदा या संघटनेने घडवून आणलेल्या ९/११ च्या दहशतवादी हल्ल्याचे प्रत्युत्तर म्हणून अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष जॉर्ज डब्ल्यू बुश यांनी 'दहशतवादविरोधी लढाई' ही लष्करी मोहीम आखली. अफगाणिस्तान युद्ध (२००१) आणि इराक युद्ध (२००३) हे याच लढाईचा भाग होते. अमेरिका पुरस्कृत या सैनिकी आक्रमणाला ब्रिटन, तुर्कस्थान, जर्मनी, इटली, नेदरलँड, फ्रांस आणि पोलंड या देशांनी पाठिंबा दिला होता.

त्यानंतर दहशतवादी संघटना विमान अपहरणे, बॉम्बस्फोट आणि राजकीय नेत्यांची हत्या अशा मार्गांचा वापर करू लागले. पारंपरिक दहशतवाद हा मुख्यतः सरकारी संस्थांना लक्ष्य करत असे. दहशतवादी सहसा काही विशिष्ट लोकसमूहांच्या हक्कांसाठी लढत असत. दहशतवादी कारवायांचा अनेकदा अलगतावादी (फुटीरतावादी) चळवळींशी संबंध येतो.

आधुनिक दहशतवाद अनेक पातळ्यांवर वेगळा ठरतो. आज दहशतवादी विशिष्ट भौगोलिक क्षेत्रातील विशिष्ट लोकसमूहांसाठी लढत नाहीत. दहशतवादी संघटना अमूर्त स्वरूपाच्या धार्मिक विचारसरणीने प्रेरित झालेल्या असतात, त्यांचा लढा अमूर्त स्वरूपाची धार्मिक ध्येये साध्य करण्यासाठी असतो. त्यासाठी वैश्विक पातळीवर योजना राबवल्या जातात. ९/११ च्या हल्ल्यांनंतर त्याच्याशी साधर्म्य असलेले हल्ले बाली (२००२), माद्रिद (२००४), लंडन (२००५) आणि मुंबई (२००८) मध्ये घडवून आणले गेले.

### बहुध्रुवीयता आणि प्रादेशिकतावाद

शीतयुद्धोत्तर काळात अमेरिकेने जागतिक व्यवस्थेवर आधिपत्य गाजवण्यास सुरुवात केली. या काळात अमेरिकेच्या लष्करी आणि आर्थिक ताकदीला कोणीही आव्हान देऊ शकत नव्हते. त्यामुळे ती एकमेव महासत्ता म्हणून उदयास आली, परंतु महासत्ता होण्यासाठी आणि ते स्थान टिकवण्यासाठी आर्थिक संपन्नता आणि लष्करी बळ हे दोनच निकष नाहीत. जागतिक पातळीवर देशाचा महासत्ता म्हणून उदय हार्ड पॉवर आणि सॉफ्ट पॉवर यांच्या एकत्रीकरणामुळे होतो. हार्ड पॉवरमध्ये आर्थिक निर्बंध आणि लष्करी बळ अशा गोष्टी येतात तर सॉफ्ट पॉवरमध्ये देशाची प्रतिष्ठा, सांस्कृतिक प्रभाव अणि परंपरा हे घटक येतात. अलीकडच्या काळात अमेरिकेच्या प्रबळ स्थानास प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्षपणे आव्हान दिले गेले आहे. उदा., युरोपियन युनियन (EU) मार्फत युरोपात आर्थिक आणि प्रादेशिक एकीकरण झालेले दिसते; चीन आणि जपान व त्यापाठोपाठ भारतामुळे जागतिक व्यवस्थेत आशियाचा प्रभाव वाढलेला दिसतो; रशियाचे लष्करी शक्ती म्हणून झालेले पुनरुत्थान आणि नव्या प्रादेशिक संघटनांचे वाढते महत्त्व यांमुळे एकध्रुवीय जागतिक व्यवस्थेचे बहुध्रुवीय व्यवस्थेत रूपांतर झाले.

अमेरिकाप्रणित एकध्रुवीय जगास चीनने शक्तिशाली आव्हान दिलेले आहे. १९७० च्या मध्यात डेंग शाओपिंग यांच्या नेतृत्वाखाली चीनने उदारीकरणाचे धोरण स्वीकारून आर्थिक प्रगती साध्य केली आणि चीनने जगात प्रबळ स्थान प्राप्त केले. १९९० मध्ये आणखी नाट्यमय घटना घडल्या.

चीनने One Belt One Road आणि चीन-पाकिस्तान आर्थिक कॉरिडोर यांसारखे महत्त्वाकांक्षी प्रकल्प राबवण्यास सुरुवात करून आपले प्रभावक्षेत्र निर्माण केले. मध्य आशिया आणि पूर्व आशिया या प्रदेशांवर वर्चस्व गाजवण्यास सुरुवात केली. आफ्रिकेत देखील प्रवेश करून शेजारी देशांपलीकडे प्रभाव पडण्याची आकांक्षा दाखवली. दक्षिण चिनी सागरावर आपला हक्क सांगण्याकरिता चीन आपले नौदल व वायुसेना भक्कमपणे उभारत आहे.

**तुम्ही शोधू शकता का?**

चीनच्या वन बेल्ट वन रोड आणि चीन-पाकिस्तान आर्थिक कॉरिडोर या योजना नक्की काय आहेत हे शोधा.

रशियाने तेल आणि वायुनिर्मितीच्या क्षेत्रात मोठी प्रगती केलेली आहे. रशिया उर्जास्रोतांची महासत्ता म्हणून उदयास आली आहे. हल्लीच्या काळात तेथे आर्थिक स्थैर्यामुळे राष्ट्रनिष्ठा जागृत होऊन लष्कराचा प्रभाव वाढलेला दिसतो. रशिया हा शांघाय को-ऑपरेशन ऑर्गनायझेशन (SCO) चा संस्थापक सदस्य असल्यामुळे मध्य आणि पूर्व युरोपात रशियाचा बऱ्यापैकी प्रभाव कायम आहे असे दिसते.

आजघडीला इंडो पॅसिफिक प्रदेशाचे महत्व वाढीस लागले आहे. चीन आणि भारतासारख्या देशांमुळे झालेली आर्थिक वृद्धी, दक्षिण चीन महासागरातील संघर्ष, ASEAN चे वाढलेले महत्त्व आणि पॅसिफिक प्रदेशात अमेरिकेला असणारा रस यांमुळे या प्रदेशाचे महत्त्व आणखी वाढीस लागले आहे. भविष्यात भारताची या प्रदेशामध्ये महत्त्वाची भूमिका असेल.

### शीतयुद्धोत्तर काळातील प्रादेशिकवाद

प्रादेशिकवाद हा आंतरराष्ट्रीय संबंधांच्या अभ्यासातील महत्त्वाचा विषय आहे. एखादी प्रादेशिक संघटना निर्माण करण्यासाठी अथवा त्याचा भाग होण्यासाठी अनेक देश एकत्र येताना दिसतात. या संघटना भौगोलिक तत्त्वांवर किंवा समान राजकीय, वैचारिक, आर्थिक इत्यादी घटकांवर आधारलेल्या असू शकतात. प्रादेशिक संघटना बांधताना देशांनी भौगोलिकरीत्या जोडलेले असणे महत्त्वाचे असतेच त्याशिवाय काही व्यावहारिक आणि संसाधनांसंदर्भातले मुद्देही महत्त्वाचे ठरतात. यामध्ये दळणवळण आणि संपर्कव्यवस्था, उर्जास्रोत, आरोग्यव्यवस्था इत्यादींचा समावेश होतो. प्रादेशिकवादाचा प्रवास साधारणतः त्यातील सदस्यांमध्ये घडणाऱ्या राजकीय संवादाने सुरु होतो. ही चर्चा पुढे नेण्यासाठी समान विचारसरणी किंवा आर्थिक हितसंबंध उपयोगास येऊ शकतात. या चर्चेचा परिपाक म्हणजे एखाद्या प्रादेशिक संघटनेची निर्मिती होणे होय.

१९४० आणि १९५० च्या दरम्यान आशिया आणि आफ्रिकेतील प्रादेशिकवादाने येथील देशांमधल्या राजकीय चर्चांवर लक्ष केंद्रित केले होते. युरोपचे लक्ष मात्र आर्थिक समन्वयाकडे होते. उदा., युरोपमध्ये युरोपीय कोळसा आणि पोलाद समुदाय (ECSC, १९५१), युरोपीय आर्थिक समुदाय (EEC, १९५७) आणि युरोपीय अणुउर्जा समुदाय (Euratom, १९५८) या संघटना स्थापन झाल्या.

१९६० च्या सुमारास प्रादेशिक सहकार्याच्या संकल्पनेचा आशियामध्ये प्रसार झाला. १९६७ मध्ये ASEAN ची स्थापना झाली. १९६० मध्ये आर्थिक निकषांवर आधारलेल्या प्रादेशिक संघटना उदयास आल्या. NATO सारख्या काही संघटनांनी संरक्षणाच्या बाबींवर लक्ष केंद्रित केले. शीतयुद्धोत्तर काळात प्रादेशिक संघटनांनी व्यापारावरही लक्ष देण्यास सुरुवात केली. त्यामुळे या काळात अनेक व्यापारी गट निर्माण झालेले दिसून येतात.


**व्यापारी गट म्हणजे काय?**

अनेक देश मिळून आपले आर्थिक हितसंबंध दृढ करण्याकरिता काही विशेष करार करण्यासाठी व्यापारी गट स्थापन करतात. सामान्यतः हे करार व्यापारातील अडथळ्यांना कमी अथवा दूर करण्यासाठी केले जातात. जकात (आयातीवरील कर) आणि कोटा (आयातीच्या प्रमाणावर घातलेल्या मर्यादा) हे व्यापारातील अडथळ्यांचे प्रमुख प्रकार आहेत.

आता आपण शीतयुद्धोत्तर काळातील काही महत्त्वाच्या प्रादेशिक संघटनांचा आढावा घेऊ.

### (i) युरोपीय संघ

दुसरे महायुद्ध व त्यांनतर शीतयुद्ध यांमुळे आलेल्या सततच्या अस्थिरतेमुळे युरोपमधील देशांना कायमच एकत्र येण्याची प्रेरणा मिळाली आहे. युरोपीय संघाची सुरुवात आर्थिक सहकार्य दृढ करणारी संस्था म्हणून झाली. याच धर्तीवर युरोपीय संघाची स्थापना झाली. त्यामागची कल्पना अशी होती, की जेव्हा देश एकमेकांशी व्यापार करतील तेव्हा ते आर्थिकरीत्या परस्परांवर अवलंबून असतील त्यामुळे त्यांच्यामधील संघर्ष टळू शकेल. यासाठीच युरोपिय कोळसा व पोलाद समुदाय आणि युरोपीय आर्थिक समुदाय या दोन संस्थांची अनुक्रमे १९५१ आणि १९५७ साली स्थापना झाली.




युरोझोन राष्ट्रे

पुढे या सर्व संघटना एकमेकांत विलीन होऊन युरोपीय समुदाय (EC) म्हणून ओळखले गेले. १९७३ मध्ये एका करारांतर्गत युरोपीय संसद निर्माण करण्यासाठी एक करार करण्यात आला होता. १९८०च्या दशकात युरोपीय संघाची एक बाजारपेठ तयार करण्याच्या दृष्टीने प्रयत्न सुरू होऊन १९९३ मध्ये ती प्रक्रिया पूर्ण झाली. ७ फेब्रुवारी १९९२ रोजी 'मास्त्रीक्त' करार अंमलात येऊन युरोपीय संघाची स्थापना झाली. या करारामुळे सहकार्याचा परीघ वाढला आणि त्यात अंतर्गत व्यवहार, न्यायालयीन बाबी, परराष्ट्र आणि संरक्षण धोरणांचा समावेश झाला. या करारातून आर्थिक पातळीवर एकीकरण होऊन 'युरो' या समान चलनाचा उदय झाला. युरो (€) हे युरोपीय संघामधील २८ पैकी १९ देशांचे अधिकृत चलन आहे. या देशांना एकत्रितपणे 'युरोझोन' म्हणून ओळखले जाते.

निव्वळ आर्थिक संघटनाच्या दृष्टीने सुरू झालेली युरोपीय सहकार्याची प्रक्रिया विकसित होऊन आता हे

**माहीत आहे का तुम्हांला ?**




१ जानेवारी १९९९ साली जगातील चलनांच्या बाजारात युरोचा प्रवेश झाला; ब्रिटन, स्वीडन आणि डेन्मार्क यांचा अपवाद वगळता युरोपीय संघाच्या सगळ्या देशांमध्ये युरोचा वापर सुरू झाला. युरोपीय संघातील युरो हे राष्ट्रीय चलन म्हणून स्वीकारलेल्या देशांच्या भौगोलिक आणि आर्थिक प्रदेशास युरोझोन म्हणून संबोधतात.

संघटन हवामान बदल, पर्यावरण, आरोग्य, परराष्ट्र संबंध, सुरक्षा व स्थलांतर अशा विविध धोरण क्षेत्रांमध्ये कार्यरत आहे.


**शोधा पाहू ?**

युरोपीय संघाचे सदस्य देश कोणते ?

**करून पहा.**

युरोझोन राष्ट्रांची यादी तयार करा.

शेंगेन प्रदेशाची निर्मिती ही युरोपीय संघाची सगळ्यांत मोठी कामगिरी मानली जाते. शेंगेन करार– हा १९८५ साली केला गेला ज्याद्वारे सगळ्या सदस्य देशांमधील अंतर्गत सीमारेषा नष्ट करण्यात आल्या. फ्रान्स, जर्मनी, बेल्जियम, लक्झेंबर्ग आणि नेदरलँड या पाच युरोपियन देशांनी या करारावर स्वाक्षऱ्या केल्या. हा करार लक्झेंबर्ग देशाच्या दक्षिणेकडील शेंगेन या खेडेगावात करण्यात आला. शेंगेन व्हिसा हा युरोपमध्ये सर्वत्र वापरला जाणारा व्हिसा आहे. शेंगेन प्रदेशांतर्गत




शेंगेन क्षेत्र

**माहीत आहे का तुम्हांला ?**




**शेंगेन व्हिसा म्हणजे काय?**

शेंगेन व्हिसा पात्र व्यक्तींना २६ सहभागी देशांमध्ये मुक्तपणे प्रवास करण्याची परवानगी देते. याचाच अर्थ युरोपीय प्रवाशांना अंतर्गत शेंगेन सीमांवर तपासणी प्रक्रियांना सामोरे न जाता वेगवेगळ्या शेंगेन देशांमध्ये थेट प्रवेश मिळवता येईल.

सीमा नाहीत. या प्रदेशात न केवळ युरोपीय संघाचे सदस्य परंतु सदस्य नसणारे व्यापारी आणि पर्यटक हेही एका देशातून दुसऱ्या देशात सहजरीत्या व मोकळेपणाने प्रवास करू शकतात. या प्रवासात त्यांना तपासणी आणि चौकशीला सामोरे जावे लागत नाही. सद्यस्थितीत युरोपीय संघातील २८ पैकी २२ देश शेंगेन प्रदेशाचा भाग आहेत.

**माहीत आहे का तुम्हांला ?**

**युरोपीय महासंघाचे कार्य कसे चालते?**

युरोपीय आयोग, युरोपीय संसद, युरोपीय परिषद आणि युरोपीय न्यायालय या चार संस्था युरोपीय संघाचे कामकाज चालविण्यासाठी अत्यंत महत्त्वाची भूमिका बजावतात–

**युरोपियन आयोग :** हा आयोग युरोपियन युनियनचा कार्यकारी–नोकरशाहीशी संबंधित असा घटक आहे. युरोपियन आयोग मुख्यतः नव्या कायद्यांसाठीचे प्रस्ताव सुचवणे, युरोपियन संसदेने आणि आयोगाने घेतलेल्या धोरणात्मक निर्णयांची अंमलबजावणी करणे या जबाबदाऱ्या पार पाडतो.

**युरोपियन संसद :** युरोपीय संसदेत एकूण प्रत्यक्ष निवडणुकांद्वारे एकूण ७५१ सदस्य पाच वर्षांच्या कार्यकालासाठी निवडले जातात. संसदेवर कायदेविषयक, देखरेखीच्या आणि अर्थविषयक जबाबदाऱ्या सोपवल्या जातात.

**युरोपियन परिषद :** युरोपियन परिषदेच्या रचनेत सदस्य राष्ट्रांचे राष्ट्राध्यक्ष किंवा प्रधानमंत्री, त्यांचे परराष्ट्र मंत्री, व त्यासोबत परिषदेचे पूर्णवेळ अध्यक्ष यांचा समावेश असतो. ही परिषद वर्षातून चार वेळा भरवली जाते आणि युरोपियन युनियनला सामरिक नेतृत्व प्रदान करते.

**युरोपियन न्यायालय :** युरोपियन न्यायालय युरोपियन युनियनमधील कायद्यांचा आणि करारांचा अर्थ लावणे व निवाडा करणे हे कार्य पार पाडते. युरोपियन युनियनचे कायदे सदस्य देशांच्या राष्ट्रीय कायद्यांपेक्षा श्रेष्ठ मानले जातात.

**'ब्रेक्झिट' वर चर्चा करा.**

२०१६ साली ब्रिटिश नागरिकांनी जनमताद्वारे युरोपीय संघ सोडण्याचा निर्णय घेतला. शुक्रवार, दि.३१ जानेवारी २०२० च्या मध्यरात्री युनायटेड किंगडमने औपचारिकरित्या युरोपियन युनियनचे सदस्यत्व समाप्त केले. या प्रक्रियेला 'ब्रेक्झिट' असे नाव दिले गेले. ब्रेक्झिट हे ब्रिटिश राष्ट्रवादाच्या बाजूने मांडलेले आग्रही मत आहे. राज्यसंस्था ही संकल्पना आजही आपले महत्त्व टिकवून आहे हे यातून सिद्ध होते. या अनुषंगाने पुढील प्रश्नांच्या आधारे वर्गात चर्चा घडवून आणा.

ब्रिटनला युरोपीय संघातून बाहेर का पडायचे होते ?

ब्रेक्झिटच्या बाजूने दिलेला कौल जागतिकीकरणाच्या विरोधात आहे असे म्हणता येईल का?




### (ii) सार्क (SAARC)

१९८५ मध्ये ढाका येथे सार्कची स्थापना करण्यात आली. सुरुवातीच्या काळात सार्कमध्ये भारत, बांगलादेश, पाकिस्तान, नेपाळ, भूटान, श्रीलंका व मालदीव असे सात देश सदस्य होते. २००७ मध्ये अफगाणिस्तानचा आठवा सदस्य म्हणून समावेश केला गेला. चीन, अमेरिका, युरोपीय महासंघ यांच्यासह ९ देश व संघटनांना सार्कमध्ये 'निरीक्षक दर्जा' बहाल करण्यात आला आहे. दक्षिण आशियामध्ये संवाद निर्माण करण्यासाठी सार्कची निर्मिती करण्यात आली. या अनुषंगाने दक्षिण आशियाई प्राधान्य व्यापार करार (SAPTA) १९९३ साली अस्तित्वात आला. पुढे दक्षिण आशियाई मुक्त व्यापार क्षेत्र (SAFTA) ही सार्कची मुक्त व्यापार व्यवस्था २००६ मध्ये एका करारामुळे कार्यान्वित झाली ज्यामुळे १९९३ ची सार्क प्राधान्य व्यापार व्यवस्था संपुष्टात आली.

### (iii) बीम्सटेक (BIMSTEC)

'बे ऑफ बंगाल इनिशिएटिव्ह फॉर मल्टी सेक्टर टेक्निकल अँड इकॉनॉमिक को-ऑपरेशन' म्हणजेच बीमस्टेकची स्थापना १९९७ मध्ये झाली. बीमस्टेक मध्ये बंगालच्या उपसागरालागतच्या व इतर जवळच्या भागांमधील एकूण सात सदस्य देश सामील आहेत. त्यात दक्षिण आशियामधील बांगलादेश, भूटान, भारत, नेपाळ, श्रीलंका, असे पाच देश तर आग्नेय आशियातील दोन देश, म्यानमार आणि थायलंड यांचा समावेश आहे. बीम्सस्टेक दक्षिण आशिया आणि आग्नेय आशिया या दोन प्रदेशांना जोडणारा दुवा आहे. वेगवान आर्थिक विकासाला चालना देणे आणि सर्वांच्या स्वारस्यांच्या विषयांवर सहकार्य घडवून आणणे हे बीम्सटेकचे प्रमुख कार्य आहे.

### (iv) ब्रिक्स (BRICS)

ब्रिक्स ही संघटना २००९ साली ब्राझील, रशिया, भारत आणि चीन या उदयोन्मुख अर्थव्यवस्था असलेल्या देशांच्या पुढाकाराने आकारास आली. २०१० मध्ये त्यात दक्षिण आफ्रिकेचा समावेश करण्यात आला. ब्रिक्समधील सदस्य विकसनशील किंवा नवीन औद्योगिक देश म्हणून ओळखले जातात. मोठ्या व वेगाने वाढणाऱ्या या अर्थव्यवस्थांचा प्रादेशिक आणि जागतिक घडामोडींवर बऱ्यापैकी प्रभाव असतो. ब्रिक्सचे सर्व सहभागी देश हे जी-२०चे सदस्य आहेत.

### (v) शांघाय सहकार्य संघटना (SCO)

शांघाय सहकार्य संघटना २००१ मध्ये चीन, रशिया तसेच कझाकस्तान, किरगिझस्तान, ताजिकिस्तान आणि उझबेकिस्तान या रशियालगतच्या देशांनी एकत्र येऊन SCO संघटनेचे गठन केले. पुढे २०१६ साली भारत आणि पाकिस्तान या संघटनेचे सदस्य झाले. गेल्या काही वर्षांत या संघटनेने दहशतवादाविरुद्ध सहकार्याच्या दिशेने महत्वाची पावले उचलली आहेत. राजकीय संवाद/चर्चा व आर्थिक सहकार्य यांद्वारे शांतता व स्थैर्य राखणे हे या संघटनेच्या प्रमुख उद्दिष्टांपैकी एक आहे. याव्यतिरिक्त व्यापार, संशोधन आणि तंत्रज्ञान या क्षेत्रांमध्ये सहकार्याला ही संघटना चालना देते.

### (vi) जी-२०

युरोपियन युनियन आणि १९ इतर राष्ट्रांची सरकारे आणि मध्यवर्ती बँकांचे गर्व्हनर यांची १९९९ मध्ये जी-२० नावाने आंतरराष्ट्रीय व्यासपीठ तयार करण्यात आले. त्याचा मुख्य उद्देश हा आर्थिक स्थैर्याबाबत चर्चा करणे हा होय. २००८ पासून जी-२० चा शिखर परिषदांमध्ये राष्ट्रप्रमुख किंवा राष्ट्राध्यक्ष तसेच त्यांचे अर्थमंत्री आणि परराष्ट्र व्यवहार मंत्री भाग घेताना दिसतात. अमेरिका, ब्रिटन, जर्मनी, फ्रान्स, जपान यांसारखी विकसित राष्ट्रे जी-२० चे सभासद आहेत. विकसित आणि विकसनशील राष्ट्रांच्यादरम्यान चर्चा होण्यासाठी हे एक व्यासपीठ आहे. जी-२० मध्ये भारताने सातत्याने सक्रिय सहभाग घेतला आहे.

या पाठात आपण १९९१ पासूनच्या जागतिक राजकारणातील काही महत्वाच्या घटना आणि कल पाहिले. सोव्हिएट महासंघाच्या ऱ्हासानंतरच्या महत्वाच्या अशा बदलांचा आपण आढावा घेतला आहे. पुढील पाठात याच बदलांचा संकल्पनात्मक अभ्यास करूया.

**See the following website for additional information:**

(1) College of Engineering, (COEP) Pune, History Club Lecture, ''१९९१ नंतरचे जग आणि प्रवाह'' - डॉ.श्रीकांत परांजपे World After 1991'' - Dr. Shrikant Paranjpe. (On You Tube)

(2) India and United Nations Peacekeeping Operations, By Lt Gen Satish Nambiar (Retd) January 26, 2014, Media Centre, Ministry of External Affairs, Government of India https://mea.gov.in/articles-in-indian-media.htm?dtl/22776/India+and+United+Nations+Peacekeeping+Operations

**प्र.१ (अ) दिलेल्या पर्यायांपैकी योग्य पर्याय निवडून विधाने पूर्ण करा.**

(१) १९८९ नंतर आंतरराष्ट्रीय संबंधांमधील महत्वाचा प्रवाह –
   (अ) द्विध्रुवीयतेचा अस्त
   (ब) आशियामध्ये प्रादेशिकतावादाचा उदय
   (क) अलिप्ततावादाचा अंत
   (ड) नवीन आंतरराष्ट्रीय आर्थिक व्यवस्थेची मागणी

(२) मास्त्रीक्त करार संदर्भ –
   (अ) संयुक्त राष्ट्र शांतता रक्षक दल
   (ब) युरोपीय संघ
   (क) अमेरिकेचा कुवेतमध्ये हस्तक्षेप
   (ड) ब्रिक्सची स्थापना


**(ब) दिलेल्या विधानांसाठी समर्पक संकल्पना लिहा.**

(१) जेव्हा एक राज्य इतर राज्यांवर लष्करी ताकदीच्या वापराशिवाय प्रभाव पाडते –


(२) जागतिक घडामोडींवर प्रभाव टाकण्याची व स्वत:चे हित साधण्याची क्षमता तसेच आंतरराष्ट्रीय राजकारणात महत्वाचे स्थान असलेले राज्य –

**प्र.२ (अ) पुढील संकल्पनाचित्रे पूर्ण करा.**

(१)




(२)




**(ब) पाठातील नकाशांचे निरीक्षण करून खालील प्रश्नांची उत्तरे लिहा.**

(१) शेंगेन क्षेत्रातील कोणत्याही चार देशांची नावे लिहा.

(२) युरोपीय महासंघाचे सदस्य नसलेल्या मात्र शेंगेन क्षेत्रात असलेल्या कोणत्याही दोन देशांची नावे लिहा.

**प्र.३ खालील विधाने चूक की बरोबर ते सकारण लिहा.**

(१) दक्षिण आशियातील व्यापारासाठी सार्क महत्वाचे आहे.

(२) मास्त्रीक्त करार युरोपच्या संरक्षणासाठी करण्यात आला.

(३) १९८० च्या दशकाला मानवतावादी हस्तक्षेपाचा सुवर्णकाळ म्हणतात.

**प्र.४ आपले मत नोंदवा.**

(१) मानवतावादी हस्तक्षेप

(२) आंतरराष्ट्रीय राजकारणातील प्रादेशिकतावाद

**प्र.५ खालील प्रश्नांची उत्तरे लिहा.**

सॉफ्ट पॉवर म्हणजे काय ते उदाहरणासह स्पष्ट करा.

**प्र.६ पुढील प्रश्नाचे उत्तर दिलेल्या मुद्द्यांच्या आधारे लिहा.**

युरोपीय महासंघाबाबत पुढील मुद्द्यांच्या आधारे चर्चा करा.

(अ) इतिहास (ब) युरोपियन आयोग
(क) युरोपियन संसद (ड) युरोपियन परिषद
(इ) युरोपियन न्यायालय

**उपक्रम**

भारताचा ब्रिक्समधील सहभाग कोणता ते शोधा.

# २. १९९१ नंतरच्या महत्त्वाच्या संकल्पना आणि समस्या : जागतिकीकरण

१९९१ नंतर जगात जे बदल होत गेले त्याचा आपण अभ्यास केला आहे. तसेच १९८९ मध्ये पूर्व युरोपमधील बदल, १९९० ची कुवेतची समस्या आणि १९९१ चे सोव्हिएट रशियाचे विघटन हे देखील अभ्यासले आहे. कुवेतच्या समस्येदरम्यान 'नवीन जागतिक व्यवस्था' हा शब्दप्रयोग पुढे आला होता. पुढे सोव्हिएट रशियाच्या विघटनानंतर 'सोव्हिएट रशियानंतरचे युग' आणि 'शीत युद्धोत्तर कालखंड' हे दोन शब्दप्रयोग वापरात आले. १९९१ नंतरच्या राजकीय आणि सुरक्षाविषयक व्यवस्थेचे वर्णन करणारे हे सर्व शब्दप्रयोग होते. १९९० च्या दशकाच्या सुरवातीच्या काळात एक नवीन शब्दप्रयोग पुढे आला, तो म्हणजे 'जागतिकीकरण'. हा शब्दप्रयोग अधिक व्यापक स्वरूपाचा होता. १९९१ नंतरच्या काळातील राजकीय, सामाजिक, सांस्कृतिक, आर्थिक, तंत्रज्ञान आणि विचारप्रणालीविषयक बदलांचा यात समावेश केला जात होता. आज आपण शीतयुद्धोत्तर कालखंडाचे वर्णन करताना जागतिकीकरण हा शब्दप्रयोग वापरतो.

### जागतिकीकरण म्हणजे काय?

जागतिकीकरणाबद्दल आपण बोलतो तेव्हा परस्परांशी जोडलेल्या जागतिक व्यवस्थेबद्दल आपण बोलत असतो. तंत्रज्ञानातील होणाऱ्या विकासामुळे हे बदल झालेले दिसून येतात. उदा., परदेशातील महाविद्यालयात किंवा विद्यापीठात प्रवेश घेण्यासाठी आता ऑनलाईन प्रवेश घेता येतात. तसेच आपल्याला मित्र-मैत्रिणींशी आणि कुटुंबियांशी जगाच्या कोणत्याही भागातून व्हॉटस्‌ॲप किंवा मोबाइलद्वारे संवाद साधता येतो. आर्थिक व्यवहार आणि व्यापाराच्या संदर्भात देखील बदल झालेले दिसून येतात. भारतातून फुले आणि फळे युरोप, अमेरिकेला निर्यात होतात, तर भारतीय बाजारपेठेत युरोप, अमेरिका किंवा चीनसारख्या देशातून माल येतो.

जागतिकीकरणाने राष्ट्र आणि राष्ट्रातील लोक एकमेकांशी जोडले आहेत. जगात एखाद्या ठिकाणी होणाऱ्या घटनांचा दुसरीकडे प्रभाव पडताना दिसून येतो. या बदलांकडे पाहण्याचे अनेक दृष्टिकोन आहेत. एक मत असे आहे, की जरी आपण जागतिक पातळीवर एकमेकांशी जोडले गेलो असलो, तरी 'राष्ट्र' व्यवस्थेचे महत्त्व कमी झालेले नाही. किंबहुना, राष्ट्रवादाला आजदेखील महत्त्व आहे. काही तज्ज्ञांच्या मते, तंत्रज्ञान आणि अर्थशास्त्राने राष्ट्रांना एकमेकांच्या जवळ आणले आहे. त्यांच्या मते, राष्ट्राचे सार्वभौमत्व तसेच अधिकार क्षेत्राच्या संकल्पनांना आज आव्हान दिले जात आहे. नागरी समाज आणि बिगर राजकीय अभिकर्ते महत्त्वाचे झाले आहेत. आज सामाजिक चळवळी ज्या मानवी समस्यांवर भर देतात, त्या राष्ट्रांच्या सीमा छेदून आंतरराष्ट्रीय पातळीवर कार्य करतात.

आता आपण वेगवेगळ्या क्षेत्रांत होणाऱ्या या बदलांचा स्वतंत्रपणे अभ्यास करू. या बदलांचा भारतावर काय परिणाम होत आहे ते देखील पाहू. आपण प्रत्येक क्षेत्राचा अभ्यास हा स्वतंत्रपणे जरी करत असलो, तरी ही सर्व क्षेत्रे एकमेकांशी जोडलेली आहेत, हे लक्षात ठेवणे गरजेचे आहे. म्हणजेच राजकीय किंवा आर्थिक बदलांचा सामाजिक आणि सांस्कृतिक घटकांवर परिणाम होतो.

### आर्थिक घटक

आर्थिक क्षेत्रात झालेले काही महत्त्वाचे बदल-

(i) भांडवली गुंतवणुकीचा मुक्त संचार : गुंतवणूक हा अर्थव्यवस्थेतील एक महत्त्वाचा घटक आहे. उद्योगधंद्यांना भांडवलाची गरज असते. भांडवली गुंतवणुकीतून उद्योगांची उभारणी करता येते. उद्योगांमध्ये भांडवली गुंतवणूक ही केवळ सरकारी पातळीवरच नव्हे तर खासगी क्षेत्रांतूनदेखील होत असते. टाटा किंवा रिलायन्ससारख्या खासगी कंपन्या भारतातच नव्हे तर अमेरिका, युरोप, आफ्रिका इत्यादी राष्ट्रांतदेखील गुंतवणूक करतात.

ONGC सारख्या सरकारी कंपन्यादेखील परदेशात गुंतवणूक करतात. तसेच अनेक परदेशी कंपन्या भारतात गुंतवणूक करत आहेत. ही गुंतवणूक पायाभूत सुविधा तसेच ग्राहकोपयोगी अशा दोन्ही क्षेत्रांत होताना दिसून येते. परदेशी कंपन्यांनी भारतात विमानतळ, आण्विक प्रकल्प इत्यादींमध्ये गुंतवणूक केली आहे. त्याचबरोबर मॅकडोनल्ड, बर्गर-किंग, पिझ्झाहटसारख्या कंपन्या ग्राहकोपयोगी क्षेत्रात गुंतवणूक करत आहेत.

१९९० च्या दशकापूर्वी अशा तऱ्हेची गुंतवणूक क्वचित होत होती. त्याकाळी सरकारी नियमांचे अडथळे होते. ते अडथळे आता दूर झाले आहेत. हा बदल म्हणजे भांडवली गुंतवणुकीचा मुक्त संचार आहे. भांडवली गुंतवणूक भारतातून परदेशात आणि परदेशातून भारतात दोन्ही बाजूने होते.

भारत हे एक विकसनशील राष्ट्र आहे. भारताला विकास साधण्यासाठी उद्योग क्षेत्रांमध्ये वित्तीय गुंतवणूकीची गरज आहे. भारताच्या देशांतर्गत पातळीवरील गुंतवणुकीला आर्थिक मर्यादा आहेत. म्हणूनच परदेशी गुंतवणूक गरजेची आहे. परंतु अशी गुंतवणूक पायाभूत सेवा सुविधांमध्ये झाली तरच विकासाला मदत होईल. हे क्षेत्र, ग्राहकोपयोगी क्षेत्रापेक्षा महत्त्वाचे आहे. कारण खरा विकास साधण्यासाठी रस्ते, रेल्वे, जलमार्ग, हवाईमार्ग या संपर्क साधनांचा विकास होणे गरजेचे आहे. म्हणूनच या क्षेत्रांतील गुंतवणूक अधिक महत्त्वाची आहे.

## परदेशातील भारतीय गुंतवणुकीची उदाहरणे



टाटा जॅग्वार लँड रोव्हरचा कारखाना, युनाइटेड किंग्डम



ONGC विदेश लि., व्हिएतनाम

## भारतातील परकीय गुंतवणुकीची उदाहरणे




मायक्रोसॉफ्ट, भारत



नेस्ले उद्योग, भारत

(ii) व्यापार या संकल्पनेत झालेले बदल : १९९० च्या दशकानंतर व्यापार या संकल्पनेच्या दृष्टिकोनात अनेक बदल झाले आहेत.

(अ) १९४८ पासून आंतरराष्ट्रीय व्यापारांबाबतचे नियम हे गॅट (GATT) च्या अंतर्गत आखले जात होते. गॅट ही संघटना नव्हती. तो व्यापारासंबंधीचा राष्ट्रांदरम्यान केलेला करार होता. १९९५ मध्ये गॅटच्या जागी जागतिक व्यापार संघटनेची (WTO) निर्मिती केली गेली. आयातीवरील सीमा शुल्क आणि इतर कर रद्द करून जागतिक पातळीवर व्यापार मुक्त करण्यासाठी राष्ट्रांना प्रोत्साहन देणे हे या संघटनेचे कार्य होते. आंतरराष्ट्रीय व्यापारासंबंधी असलेल्या नियमांच्या पालनाबाबत लक्ष ठेवणारी ही एकमेव संघटना आहे. ही संघटना मुक्त व्यापारासाठी प्रोत्साहन देते, देशांदरम्यानचे व्यापारासंबंधीचे विवाद सोडवणे आणि देशादेशांदरम्यान व्यापाराबाबत बोलणी घडवून आणते.

(ब) व्यापार हा साधारणतः वस्तूंचा केला जातो : लोखंड, कोळसा, खनिज तेल यांसारख्या वस्तूंचा असू शकतो किंवा फळे, फुले, बियाणे यांसारख्या नाशवंत वस्तूंचा असू शकतो. १९९० च्या दशकात व्यापार या संकल्पनेला अधिक व्यापक स्वरूप दिले गेले. त्यात सेवा क्षेत्राची भर घातली गेली. म्हणजेच आता बँक, विमा यांसारख्या सेवादेखील व्यापाराचा भाग झाल्या आहेत. आज आपण त्याही पुढे जाऊन बौद्धिक संपदेच्या व्यापाराबाबत बोलतो. यात कॉपीराईट, ट्रेडमार्क, पेटंट यांसारख्या गोष्टींचा समावेश होतो.

**बौद्धिक संपदा अधिकाराची उदाहरणे**

| © | Amul, Vadilal, Nike, McDonald's, Apple, Google |
|---|---|
| कॉपीराईट | ट्रेडमार्क |

(क) व्यापाराबाबत आणखी एक महत्त्वाचा बदल हा कंटेनर कार्गोद्वारे झाला आहे. कंटेनर कार्गोची जहाजे प्रचंड प्रमाणात माल या देशातून त्या देशात नेऊ शकतात. अशा जहाजांसाठी खास बंदरांची व्यवस्था असते. कंटेनर कार्गोच्या क्रांतीने आंतरराष्ट्रीय व्यापाराकडे बघण्याचा दृष्टिकोन बदलला आहे.



कंटेनर कार्गो

**माहीत आहे का तुम्हांला ?**

(i) General Agreement on Trade in Services (GATS) : १९९५ मध्ये जागतिक व्यापार संघटनेअंतर्गत (WTO) हा करार केला गेला. वस्तूंबाबत बहुपक्षीय पातळीवर व्यापाराचे नियोजन गॅटमार्फत केले जात असे. त्याचप्रकारे नियोजन करण्यासाठी सेवा क्षेत्राला यात समाविष्ट केले गेले.

(ii) बौद्धिक संपदेच्या अधिकाराबाबतचा व्यापारी करार Trade Related Aspects of Intellectual Property Rights, (TRIPs) : जागतिक व्यापार संघटनेच्या सदस्यांसाठी बौद्धिक संपदेच्या अधिकाराबाबत काही न्यूनतम निकष त्या करारावद्वारे केले गेले आहेत.

TRIPs मध्ये साधारणतः कॉपीराईट, भौगोलिक संकेत या गोष्टींचा समावेश होतो. औद्योगिक डिझाईन, इंटिग्रेटेड सर्कीट, पेटंट, ट्रेडमार्क इत्यादींचा समावेश होतो. बौद्धिक संपदा अधिकारांची अंमलबजावणी करण्याची प्रक्रिया उपाययोजना आणि विवाद निवारण या गोष्टीदेखील TRIPs मध्ये सांगितल्या आहेत.

(iii) ट्रान्स–नॅशनल कंपन्यांचा उदय : १९९० च्या दशकापर्यंत आर्थिक क्षेत्रावर सरकारी नियंत्रण होते. खासगी उद्योगांना मर्यादित संधी उपलब्ध होती. जागतिकीकरणाच्या युगात यात बदल झालेला दिसून येतो. खासगी उद्योगांमध्ये वाढ झालेली दिसून येते. त्याचबरोबर ज्या खासगी कंपन्या देशांतर्गत कार्य करत होत्या त्या आता परदेशी व्यापार करू लागल्या. त्यांचे रूपांतर बहुराष्ट्रीय कंपन्यांमध्ये झाले. आज आपण ट्रान्स–नॅशनल कंपन्यांचा उदय झालेला देखील पाहतो. हा बदल मुख्यतः खासगी क्षेत्रांत झाला आहे. या सर्वांचा सर्वसामान्य माणसावर काय परिणाम झाला आहे?

(अ) कुशल आणि अर्धकुशल कामगारांचे आज एका राष्ट्रांतून दुसऱ्या राष्ट्रात स्थलांतर होताना दिसून येते. त्याचा परिणाम श्रमिक बाजारावर होतो. उदा., बरेच कुशल आणि अर्धकुशल कामगार आज पश्चिम आशिया, अमेरिका, युरोप इत्यादी ठिकाणी काम करत आहेत. खासगी क्षेत्राच्या वाढीमुळे सेवा क्षेत्रात रोजगाराच्या संधी वाढल्या आहेत. उदा., खानपान, मालवितरण, प्रवासी वाहतूक इत्यादी.

(ब) दुसरा परिणाम हा लहान उद्योग आणि दुकानांवर झालेला दिसून येतो. लहान उद्योगांना बड्या बहुराष्ट्रीय कंपन्यांशी स्पर्धा करावी लागते. जे उद्योग किंवा दुकाने कार्यक्षम पद्धतीने चालविली जातात ती त्या स्पर्धेत टिकून आहेत. आज शहरात मोठी किराणा दुकाने किंवा मॉल्स जरी उभी राहिली असली तरी देखील छोटे दुकानदार, भाजी किंवा फळविक्रेते हे आजदेखील ग्राहक मिळवत आहेत. याचे कारण ते आपल्या ग्राहकाला आवश्यक सेवा देतात.

(क) तिसरा परिणाम शेतीच्या संदर्भात बघायला मिळतो. आज शेतकरी आपला माल मोठ्या कंपन्यांना मध्यस्तीशिवाय थेट विकू शकतात. बहुराष्ट्रीय कंपन्यांनी नवीन तंत्रज्ञान आणले आहे. तसेच भारतीय मालाला नव्या बाजारपेठा खुल्या केल्या आहेत. उदा., भारत समुद्री उत्पादने, मांस, तांदूळ, मसाले, ताजी फळे आणि भाज्या, साखर, कॉफी, भुईमूग, काजू इत्यादी गोष्टी निर्यात करत आहे.



### माहीत आहे का तुम्हांला ?

**बहुराष्ट्रीय कंपनी** अशी कंपनी असते जिचे एका राष्ट्रात मुख्यालय असते, परंतु ती अनेक देशात कार्यरत असते. काही भारतीय बहुराष्ट्रीय कंपन्या : बजाज, डाबर, ONGC, आदित्य बिर्ला, अमूल, गोदरेज, विप्रो इत्यादी.

**ट्रान्स–नॅशनल कॉर्पोरेशन** या बहुराष्ट्रीय कंपन्यांचाच एक प्रकार आहेत. या कंपन्या कोणत्याही एका राष्ट्राला बांधील नसतात. त्यांचे एकाच राष्ट्रात मूळ स्थान नसते. काही ट्रान्सनॅशनल कंपन्या : नेसले, बायर युनिलीव्हर, सीमेन्स, जनरल इलेक्ट्रिक इत्यादी.

**सेवा क्षेत्र** हे तीन पारंपरिक आर्थिक क्षेत्रांपैकी तिसरे आहे. पहिल्या क्षेत्रात शेती, खाणकाम, मासेमारी इत्यादींचा समावेश होतो. दुसरे क्षेत्र हे उत्पादन क्षेत्र आहे. सेवा क्षेत्रामध्ये खानपान, हाऊस कीपींग, सुरक्षा इत्यादी सेवांचा समावेश होतो.

### तुम्हांला काय वाटते ?

भारताची सहकार चळवळ बहुराष्ट्रीय आणि ट्रान्स नॅशनल कंपन्यांच्या वर्चस्वाला उत्तर असू शकते का? सहकार चळवळीचे तत्त्वज्ञान हे त्यातील सामील असलेल्या सभासदांचे सक्षमीकरण करणे आणि त्यांना वित्तीय आधार देणे हे आहे. तर खासगी कॉर्पोरेट कंपन्या या केवळ आर्थिक फायदा बघत असतात. यावर तुमचे मत द्या.

**चर्चा करा!**

भारतीय कृषी क्षेत्रावर विशेषतः लहान शेतकऱ्यांवर जागतिकीकरणाचा काय प्रभाव पडला आहे?

### राजकीय क्षेत्र

जागतिकीकरणाच्या संदर्भात या राजकीय घटकांवर लक्ष केंद्रित करता येते.

(i) लोकशाहीचे महत्त्व : १९८९ ची पूर्व युरोपमधील क्रांती आणि सोव्हिएट रशियाचे विघटन यांच्याकडे कम्युनिझमचा झालेला अंत अशा स्वरूपात बघितले जाते. जग हे लोकशाही व्यवस्थेच्या दिशेने वाटचाल करत आहे असे मानले जाते. 'सहभागी राज्य', 'नागरिक केंद्रित शासन' आणि 'सुशासन' या संकल्पना आता महत्त्वाच्या होत आहेत. लोकशाही व्यवस्थेमध्ये निर्णय हे बहुमताने घेतले जातात. सहभागी शासनव्यवस्थेत त्या पारंपरिक निर्णय प्रक्रियेच्या पलीकडे जाऊन समाजातील सर्व घटकांना निर्णय प्रक्रियेत कसे सामील करता येईल हे बघितले जाते. नागरिक केंद्रित शासन आणि सुशासन व्यवस्थेत नागरी समाजाच्या सहभागावर भर दिला जातो.

(ii) राज्याचे स्थान : जागतिकीकरणाच्या संदर्भात असे मानले जाते, की आता राज्याचे महत्त्व कमी होत चालले आहे. सार्वभौमत्व हा राज्याचा एक महत्त्वाचा घटक आहे. सार्वभौमत्व ही संकल्पना राज्याच्या अधिकार क्षेत्राशी जोडली गेली आहे. त्याच्याच आधारे राज्याला आपल्या अधिकार क्षेत्रात कायदे करण्याचा अधिकार असतो. या सार्वभौमत्वावर आज अंतर्गत तसेच बाह्य घटकांकडून आघात होत आहेत असे मानले जाते. आंतरराष्ट्रीय कायद्याचा विस्तार, प्रादेशिक आर्थिक संघटना, बाजारपेठेचे जागतिकीकरण, पर्यावरण आणि मानवी प्रश्नांबाबतची वाढती चिंता ही सर्व बाह्य आव्हाने आहेत. तर राष्ट्रीय पातळीवरील सहमतीचा अभाव व त्यातून निर्माण होणारे मतभेद, वाढता वांशिक राष्ट्रवाद, बिगर राष्ट्रीय घटकांचे कार्य तसेच पर्यावरण, लिंगभेद आणि मानवतावादी समस्यांना मिळालेले केंद्रस्थान ही सर्व अंतर्गत आव्हाने आहेत.

(iii) बिगर राजकीय घटक : नागरी समाजाला मिळालेल्या वाढत्या महत्त्वामुळे बिगर राजकीय घटक पुढे आले. म्हणूनच स्वयंसेवी संघटना आणि गैर सरकारी संस्थांना (Non-Government Organisations, NGO) महत्त्व प्राप्त झाले आहे. त्या संस्था मानवी समस्यांच्या प्रश्नांवर भर देतात. आज आंतरराष्ट्रीय संबंध हे केवळ राष्ट्रांच्या संबंधांपुरते मर्यादित राहिलेले नाहीत, तर त्यात बिगर राजकीय घटकांचा देखील समावेश झाला आहे. ॲमनेस्टी इंटरनॅशनल, ग्रीन पीस मूव्हमेंटसारख्या संघटनांप्रमाणेच दहशतवादी गट देखील या बिगर राजकीय घटकांमध्ये सामील होतात.

(iv) मानवी हक्क : जागतिकीकरणाच्या युगात मानवाधिकारांचे संरक्षण एक महत्त्वाचा विषय बनला आहे, परंतु विकसित आणि विकसनशील देशांत मानवाधिकारांच्या दृष्टिकोनात फरक करण्याची गरज आहे. तिसऱ्या जगाच्या दृष्टीने नागरी आणि राजकीय हक्कांच्या आधी आर्थिक विकास साधण्याची गरज असते. तसेच वैयक्तिक अधिकारांपेक्षा समाज आणि कुटुंब यांचे महत्त्व अधिक आहे. उदा., भारतीय संविधानाने सामाजिक न्यायावर अधिक भर देऊन अन्न, वस्त्र, निवारा, शिक्षण आणि स्वास्थ्य यांना प्राथमिक महत्त्व दिले आहे. असेही मानले जाते की वितरणात्मक (distributive) न्याय मिळवून देण्यासाठी लोक कल्याणापेक्षा स्वातंत्र्याच्या हक्कांवर जास्त भर दिला जातो म्हणून राष्ट्रांना आपला इतिहास, संस्कृती, राजकीय व्यवस्था आणि अर्थव्यवस्था याआधारे मानवी हक्कांबाबत निर्णय घेण्याचा अधिकार दिला पाहिजे. थोडक्यात नागरी आणि राजकीय हक्क, स्वातंत्र्य या पाश्चात्य दृष्टिकोनाला प्रत्यक्षातील स्थानिक परिस्थितीची सांगड घालण्याची गरज आहे.

वरील सर्व गोष्टी अधिक तपशीलाने समजून

घेण्यासाठी काही उदाहरणे उपयुक्त ठरतील.

• भारत वेगवेगळ्या आंतरराष्ट्रीय करारांचा आणि संघटनांचा सभासद आहे. जागतिक व्यापार संघटनेचा सभासद म्हणून भारताला आंतरराष्ट्रीय व्यापाराबाबत काही नियमांचे पालन करावे लागते. पाकिस्तानबरोबर केलेल्या सिंधू नदीच्या पाणी वाटपाच्या करारामुळे तसेच बांगलादेशाशी केलेल्या फराक्का पाणी वाटप करारामुळे सिंधू आणि गंगा या नद्यांच्या पाणी वाटपाबाबत नियमांचे भारताला पालन करावे लागते.

• ॲमनेस्टी इंटरनॅशनल किंवा ग्रीन पीस यांसारख्या संघटना मानवी समस्यांबाबत प्रश्न उपस्थित करून स्थानिक सरकारांवर दबाव आणतात. काश्मीर संदर्भातील भारताच्या मानवी हक्कांच्या भूमिकेबाबत ॲमनेस्टीने टीका केली आहे.

• चेर्नोबिलच्या दुर्घटनेमुळे युरोपमध्ये रेडिएशन पसरले या पर्यावरणासंदर्भातील आपत्तींना देशांच्या सीमेअंतर्गत ठेवता येत नाही. म्हणूनच युरोपीयन राष्ट्रांना आपल्या जनतेला हानी पोहचू नये म्हणून उपाययोजना करण्यासाठी एकमेकांना सहकार्य करावे लागते.

• मोठ्या धरणांबाबत विरोध करण्यासाठी नर्मदा बचाव आंदोलनाने जागतिक बँकेची मदत घेऊन हे आंदोलन आंतरराष्ट्रीय पातळीवर नेले.

• जैतापूर आणि कुडनकुलम येथील आण्विक प्रकल्पनांना विरोध केला जात आहे. या प्रकल्पांना योग्य त्या परवानग्या मिळूनही काही राजकीय पक्ष आणि NGOs त्यांना विरोध करत आहेत.



कुडनकुलम आण्विक प्रकल्पाविरोधी आंदोलन



अपघातानंतरचा चेर्नोबिल आण्विक प्रकल्प

**शोधा पाहू!**

बिगर राजकीय घटकांकडून राज्यांच्या सार्वभौमत्वाला आव्हान दिले गेले आहे. अशा घटना शोधा.

वरील सर्व प्रकरणांमध्ये राज्याच्या सार्वभौमत्वाला आव्हान दिले गेले आहे. राज्याच्या अंतर्गत आणि बाह्य स्वरूपाच्या आव्हानांची ही उदाहरणे आहेत म्हणून असेही मानले जाते की आता राज्याचे कार्य कमी होत चालले आहे. खासगी क्षेत्राच्या वाढीमुळे आर्थिक क्षेत्रात आणि अंतर्गत आणि बाह्य आव्हानांमुळे राजकीय क्षेत्रात राज्याची भूमिका हळूहळू कमी होत चालली आहे.

जागतिकीकरणाच्या युगात राज्याला किती महत्त्व आहे? राज्य ही संकल्पना आजदेखील महत्त्वाची आहे का? जनकल्याण आणि विकासाच्या कार्यातून राज्यव्यवस्था आता माघार घेत आहे का?

आपण राज्याच्या मुख्य घटकांकडे बघूया. भूप्रदेश, सार्वभौम शासन आणि जनता हे ते घटक आहेत. आज राज्याचा भूप्रदेश अबाधित आहे. आपण आजदेखील राष्ट्रवाद आणि राष्ट्रीय एकात्मतेविषयी बोलतो. सार्वभौम शासन ही संकल्पना देखील अस्तित्वात आहे. आंतरराष्ट्रीय करारांच्या जबाबदाऱ्यांमुळे राज्याची सत्ता कमी झाली असेल, परंतु राज्याचे अधिकार आजदेखील अस्तित्वात आहेत. वांशिक राष्ट्रवाद आणि स्वयंनिर्णयाच्या हक्कांच्या आधारे नवीन राज्यांची निर्मिती होत आहे. आपण आधीच्या प्रकरणात बघितल्याप्रमाणे त्यातून राज्याचा ऱ्हास होताना दिसत नाही, तर नवीन राज्य निर्माण होत आहेत.

जागतिकीकरणाच्या आव्हानांना सामोरे जाऊ शकतील अशा राज्याच्या विधान मंडळ, कार्यकारी मंडळ, न्याय व्यवस्था आणि नोकरशाहीसारख्या सक्षम राजकीय संस्था आहेत. या संस्थाच राज्याच्या मूलभूत मूल्यांचे रक्षण, सामाजिक सुरक्षा देणारी व्यवस्था राखणे आणि आर्थिक विकासाला प्रोत्साहन देणे ही कार्ये करू शकतात. सार्वभौमत्वाच्या संदर्भात शंका असल्या तरीदेखील राज्य देशांतर्गत आणि आंतरराष्ट्रीय पातळीवर कार्य करणारी सर्वांत महत्त्वाची संस्था आहे. म्हणूनच जागतिक नागरी समाजाचे वाढते महत्त्व, वाढता आंतरराष्ट्रीय व्यापार, वित्त आणि भांडवलांचा मुक्त संचार यांमुळे राज्याचे महत्त्व कमी होणार आहे असे मानणे चुकीचे ठरेल.

### विचारप्रणाली

शीत युद्धाच्या काळात विचारप्रणाली हा एक महत्त्वाचा घटक होता. राष्ट्रांचे वर्गीकरण हे एकीकडे साम्यवादी किंवा समाजवादी तर दुसरीकडे भांडवलशाही किंवा मुक्त लोकशाहीप्रधान असे केले जात असे. सोव्हिएट रशिया, चीन आणि पूर्व युरोपीय राष्ट्रे ही साम्यवादी तर उत्तर अमेरिका आणि पश्चिम युरोपीय राष्ट्रे ही भांडवलशाही असे गट केले जात होते. विचारप्रणाली आणि अर्थव्यवस्था यांचा घनिष्ठ संबंध होता. विचारप्रणाली हा राजकीय घटक होता, प्रत्येक राष्ट्राची अर्थव्यवस्था त्या राष्ट्राच्या विचारप्रणालीनुसार आखली जात होती. उदा., पूर्व युरोपमध्ये साम्यवादी विचारप्रणाली होती आणि तिथे साम्यवादी अर्थव्यवस्था होती. अशा अर्थव्यवस्थेत सरकारी किंवा सार्वजनिक उद्योगक्षेत्राला प्राथमिक स्थान होते. पश्चिम युरोपमध्ये भांडवलशाही विचारप्रणाली होती आणि भांडवलशाही अर्थव्यवस्था होती. तिथे अर्थव्यवस्थेत खासगी क्षेत्राला प्राधान्य दिले गेले होते. त्या काळात भारतासारखी राष्ट्र ही लोकशाही समाजवाद असलेली राष्ट्र मानली जात होती. म्हणून येथील अर्थव्यवस्थेत खासगी आणि सार्वजनिक असे दोन्ही उद्योग होते. या व्यवस्थेला 'मिश्र अर्थव्यवस्था' म्हटले जात असे. याचा अर्थ असा की अर्थव्यवस्थेत खासगी आणि सार्वजनिक अशा दोन्ही क्षेत्रांनी महत्त्वाची भूमिका बजावली.

आज जागतिकीकरणाच्या युगात एकच प्रभावी विचारप्रणाली आणि अर्थव्यवस्था दिसून येते. त्या व्यवस्थेचे वर्णन 'बाजारपेठीय अर्थव्यवस्था' असे केले जाते. परंतु सर्वच राष्ट्र एकाच प्रकारच्या बाजारपेठीय अर्थव्यवस्थेचा अवलंब करत नाहीत. त्या बाजारपेठीय अर्थव्यवस्थेचे स्वरूप त्या राज्याच्या विचारप्रणालीवर अवलंबून असते. आपण काही उदाहरणे बघू. अमेरिकेत भांडवलशाही विचारप्रणालीबरोबर भांडवलशाही अर्थव्यवस्था आहे. म्हणून त्याचे वर्णन हे 'भांडवलशाही बाजारपेठीय व्यवस्था' असे केले जाते. पश्चिम युरोपीय राज्यांमध्ये कल्याणकारी विचारसरणी आहे म्हणून त्याचे वर्णन हे 'कल्याणकारी बाजारपेठीय अर्थव्यवस्था' असे केले जाते. चीनी राजकीय व्यवस्था ही साम्यवादी विचारप्रणाली मानते, परंतु १९९० नंतर चीनच्या अर्थव्यवस्थेत बदल झालेला दिसून येतो. आज चीनचे वर्णन हे 'साम्यवादी बाजारपेठीय अर्थव्यवस्था' असे केले जाते. भारतात आपण बाजारपेठीय अर्थव्यवस्था हा शब्दप्रयोग वापरत नाही. आपण 'आर्थिक उदारीकरण' हा शब्दप्रयोग वापरतो.

### तंत्रज्ञान

१९९० च्या दशकात जागतिक संप्रेषणाच्या पद्धतीत आमूलाग्र बदल झाला. उपग्रह संप्रेषण प्रणाली, मोबाइल, टेलिफोन, फॅक्स, इंटरनेट इत्यादींनी जनतेच्या सामाजिक, राजकीय आणि आर्थिक जीवनात क्रांतिकारी बदल घडवून आणले.

आपण भारतातील प्रसारमाध्यमात कसा बदल झाला ते पाहू. १९९० मध्ये CNN ने भारतात प्रवेश केला. परदेशी चॅनेल येईपर्यंत भारतात केवळ दूरदर्शन हे एकमेव दूरचित्रवाणीचे माध्यम होते. उदा., आपण महाराष्ट्रात केवळ मुंबई आणि दिल्ली दूरदर्शची चॅनेल्स बघू शकत होतो. साधारणतः एका दशकात भारतात अनेक सरकारी आणि खासगी चॅनेल्स सुरू झाली. उपग्रह संप्रेषण प्रणालीने भारतात कोणत्याही शहरात, गावात 'डीश ॲंटीना'च्या साहाय्याने कार्यक्रम बघता येऊ लागले.

संप्रेषणाच्या इतर साधनांमध्ये देखील बराच बदल घडून आला. पूर्वी घरोघरी टेलिफोन नसायचे, तातडीच्या कामासाठी लोक पोस्ट ऑफिसमध्ये जाऊन फोन करत

असत. आपल्या शहराबाहेर टेलिफोन करण्यासाठी ट्रंक कॉलची पद्धत होती. त्यानंतरच्या काळात Subscriber Trunk Dialling (STD) ची पद्धत सुरू झाली. आज मोबाइलचा सर्वत्र वापर होताना दिसून येतो. मोबाइल फोन हे सरकारी तसेच खासगी कंपन्यांमार्फत उपलब्ध आहेत.

तंत्रज्ञानातील सर्वांत महत्त्वाची क्रांती ही इंटरनेटची क्रांती होय. जगात कोणाशीही कुठेही तात्काळ संपर्क साधण्याची सोय निर्माण झाली आहे. विचार, संस्कृती आणि माहितीचा जगात प्रसार कोठेही करणे यामुळे शक्य झाले आहे. इंटरनेटच्या 'सर्च इंजिन' च्या माध्यमातून आपल्याला माहिती गोळा करता येते. तसेच 'ट्विटर', 'स्काईप', 'फेसबुक', 'इन्स्टाग्राम', 'व्हॉटस् ॲप'च्या माध्यमातून सोशल 'नेटवर्किंग' ची सोय उपलब्ध झाली आहे.




STD ISD **टेलिफोन बुथ**



**मोबाइल क्रांती**

माहितीच्या युगातील तंत्रज्ञान हे साधारणतः आंतरराष्ट्रीय स्वरूपाचे असते. मोबाइल फोन, इंटरनेट, उपग्रहाद्वारे प्रक्षेपण हे कोणत्याही देशांच्या सीमांना बांधील नसते. यामुळेच सीमापार गट, संस्था आणि बिगर राजकीय घटक; मग त्याचे स्वरूप हे NGO चे असेल, ट्रान्सनॅशनल कॉर्पोरेशनचे असेल किंवा गुन्हेगारी आणि दहशतवादी संघटनांचे असेल; यांच्या वाढीस मदत होते. अशा सीमापार गटांवर नियंत्रण ठेवणे किंवा त्यांच्या कार्यावर मर्यादा आणणे हे राज्यांना अवघड जाते.

**शोधा पाहू!**

आपल्या मागण्यांसाठी सोशल मिडीयाचा वापर करणारी आंदोलने कोणती ते शोधा.

**माहीत आहे का तुम्हांला ?**

इजिप्तमधील 'अरब स्प्रिंग' या क्रांतीला 'फेसबुक क्रांती' असे संबोधित करतात. अरब स्प्रिंग चळवळीचे स्वरूप काय होते आणि त्यांनी सोशल नेटवर्किंगचा कसा वापर केला ते शोधा.

### सामाजिक आणि सांस्कृतिक घटक

जागतिक पातळीवर प्रसारमाध्यमात झालेली क्रांती आणि इंटरनेटच्या सेवेची उपलब्धता यांमुळे लोकांना जगात काय घडत आहे हे जाणून घेणे शक्य झाले आहे. याचबरोबर लोकांचे देशांतर्गत आणि देशाबाहेरचे भ्रमण याचा समाज आणि संस्कृतीवर परिणाम झालेला दिसून येतो. आज आपल्याला 'वैश्विक कॉस्मॉपॉलिटन संस्कृतीचा' उदय होताना दिसत आहे.

या वैश्विक कॉस्मॉपॉलिटन संस्कृतीवर पाश्चिमात्य विचारांचा बराच प्रभाव आहे. आधुनिकीकरण, पाश्चात्यीकरण, सेक्युलरायझेशन ही मूल्ये पारंपरिक मूल्यांपेक्षा महत्त्वाची वाटू लागली आहेत. लोकांच्या वैयक्तिक जीवनावर याचा प्रभाव दिसून येतो. उदा., खाण्यापिण्याच्या सवयीमध्ये बर्गर, पिझ्झा, वडापाव इत्यादी फास्टफूडचे प्रमाण वाढलेले दिसते. नाताळ, दिवाळी यांसारखे सण साजरे करण्याच्या पद्धतीत

पाश्चिमात्य प्रभाव दिसून येतो. 'मदर्स डे', 'फादर्स डे', 'फ्रेंडशिप डे' सारख्या नवीन कल्पना पुढे येतात. तसेच 'वेस्टर्न' पद्‌धतीचे कपडे घालण्याचा कल वाढलेला दिसतो.



फ्रेंडशिप डे




क्रेडिट कार्ड

समाजात वाढत चालेला व्यक्तीवाद आणि भौतिकवाद हा जागतिक संस्कृतीचा आणखी एक भाग आहे. शहरीकरणामुळे पारंपरिक कुटुंब पद्‌धतीत बदल झाला होता. त्यात व्यक्तीवादाने भर घातली आहे. आज आपण 'मला प्रायव्हसी पाहिजे' किंवा 'ही माझी खासगी (private) जागा (space) आहे' अशा स्वरूपाचे उद्‌गार अगदी लहान मुलामुलींपासून वयस्कर लोकांपर्यंत ऐकतो. तसेच क्रेडिट कार्डमुळे आपल्या आवाक्याबाहेर खर्च करण्याची प्रवृत्ती दिसते.

जागतिकीकरणाकडे व्यापक दृष्टीने बघितले तर त्याच्या सकारात्मक आणि नकारात्मक अशा दोन्ही बाजू दिसून येतात. तरुणांसाठी आपल्या देशात नवीन संधी उपलब्ध होणे ही सकारात्मक बाब आहे. आपल्याला जगात काय चालले आहे आणि त्याचा आपल्यावर काय परिणाम होईल याची अधिक चांगली जाणीव होते, आपण अधिक कार्यक्षम पद्‌धतीने जोडले गेलो आहोत. रोजगाराच्या नवीन संधी उपलब्ध होत आहेत, अधिक रोजगार निर्मिती केली जात आहे. हा बदल मुख्यतः खासगी क्षेत्रात होत आहे. कारण या क्षेत्राकडे आर्थिक क्षमता आहे. सरकार किती प्रमाणात सेवा उपलब्ध करू शकते यावर आर्थिक मर्यादा आहेत.

जागतिकीकरणाच्या काही नकारात्मक बाजूदेखील आहेत. राज्याच्या कल्याणकारी योजना थांबतील ही एक भीती आहे. त्याचबरोबर स्थानिक उद्योगधंदे, विशेषतः लहान उद्योग हे जागतिक स्पर्धेमुळे नष्ट होतील ही देखील भीती आहे. शेतीच्या क्षेत्रात लहान आणि किरकोळ शेतकरी मोठ्या कंपन्यांशी स्पर्धा करू शकणार नाहीत.

खरे पाहिले तर भारताची सर्वांत महत्त्वाची समस्या ही मनोवृत्ती आणि मानसिकतेची आहे. भारताने परकीय भांडवल आणि व्यापार हा साम्राज्यवादाच्या इतिहासाशी जोडला आहे. स्वातंत्र्य म्हणजे स्वायत्तता आणि स्वावलंबन आहे. भारतात साम्राज्यवादाविरोधी विचारप्रणालीच्या आधारे उदारीकरणाच्या संकल्पनेला विरोध केला जातो. भारतातील साम्यवादी आणि भांडवलशाही मानणारे, दोघेही उदारमतवादांचा विरोध करतात. साम्यवादी विचारवंतांचा विरोध हा विचारप्रणालीच्या आधारावर असतो, तर गेली अनेक वर्ष पारंपरिक पातळीवर संरक्षण मिळालेले भांडवलशाह आता ते संरक्षण जाईल म्हणून विरोध करतात. शेवटी आपल्या मूलभूत मूल्यांचे संरक्षण करणे, कल्याणकारी व्यवस्था राबवणे आणि परिघावरील तसेच वंचित लोकांचा सांभाळ करणे हे राज्याचे कार्य असते. आजही जागतिकीकरणाच्या युगात राज्याचे हे एक महत्त्वाचे कार्य आहे.

**See the following website for additional information:**

India - A Hub for Globalization, Remarks by Raghuram Rajan, Economic Counsellor and Director of the Research Department, IMF, January 7, 2005, New Delhi, India, International Monetary Fund, https://www.imf.org/en/News/Articles/2015/09/28/04/53/sp010705

## स्वाध्याय

**प्र.१ (अ) दिलेल्या पर्यायांपैकी योग्य पर्याय निवडून विधान पूर्ण करा.**

(१) जागतिकीकरणाच्या युगात आर्थिक क्षेत्रात खालील महत्वाचे बदल झाले.

(i) भांडवल गुंतवणुकीचा मुक्त संचार

(ii) गॅटची निर्मिती

(iii) ट्रान्स–नॅशनल कंपनीचा उदय

(iv) बौद्‌धिक संपदा हक्कावर लक्ष केंद्रित

उत्तर : (अ) फक्त i, ii आणि iii बरोबर आहेत.

(ब) फक्त i, ii आणि iv बरोबर आहेत.

(क) फक्त i, iii आणि iv बरोबर आहेत.

(ड) सर्व बरोबर आहेत.

(२) 'साम्यवादी बाजारपेठीय अर्थव्यवस्था' ही संकल्पना या देशासंदर्भात वापरली जाते.

(अ) भारत (ब) चीन

(क) फ्रान्स (ड) अमेरिका

**(ब) गटात न बसणारा शब्द ओळखा.**

(१) मोबाइल, सॅटेलाईट, इंटरनेट, ग्रामोफोन

**(क) संकल्पना सुचवा.**

(१) आंतरराष्ट्रीय व्यापारासंबंधी एकमेव आंतरराष्ट्रीय संघटना –

(२) अनेक देशांत कार्यरत असलेली कंपनी –

**प्र.२ खालील विधाने चूक की बरोबर सकारण स्पष्ट करा.**

(१) जागतिकीकरणाने बाजारपेठीय अर्थव्यवस्था ही संकल्पना जाणली.

(२) जागतिकीकरणात बिगर सरकारी संस्थांचे महत्त्व कमी झाले आहे.

**प्र.३ सहसंबंध स्पष्ट करा.**

(१) जागतिकीकरण आणि संस्कृती

(२) गॅट आणि जागतिक व्यापार संघटना

**प्र.४ मत नोंदवा.**

सहभागी राज्य समाजासाठी हितकारक आहे.

**प्र.५ पुढील प्रश्नाचे उत्तर लिहा.**

जागतिकीकरणाच्या सकारात्मक व नकारात्मक बाजू कोणत्या आहेत ?

**उपक्रम**

ज्येष्ठ नागरिकांशी चर्चा करून जागतिकीकरणाच्या काळात झालेल्या बदलांची माहिती घ्या.

# ३. १९९१ नंतरच्या महत्त्वाच्या संकल्पना आणि समस्या : मानवतावादी प्रश्न

पहिल्या दोन पाठांमध्ये आपण १९९१ नंतरच्या जगातील बदलांचा अभ्यास केलेला आहे. जागतिकीकरणाच्या प्रक्रियेमध्ये अनेक नव्या संकल्पना अस्तित्वात आलेल्या आपण पाहिल्या, जसे सहभागी राज्य, मानवी हक्कांबाबत जागरूकता, बिगर राजकीय अभिकर्त्यांचे वाढते महत्त्व इत्यादी. आज पर्यावरण, गरिबी आणि विकास योजनांचे दृष्टिकोन, लिंगभावविषयक दृष्टिकोन हे मानवतावादी प्रश्न महत्त्वाचे झाले आहेत. या पाठामध्ये आपण या प्रश्नांचा विचार करून त्या प्रश्नांना भारताने कसे हाताळले आहे हे समजून घेणार आहोत.

### पर्यावरण आणि शाश्वतता

पर्यावरण म्हणजे काय? पर्यावरण म्हणजे आपल्या अवतीभोवती असणारे वातावरण, आपण ज्यामुळे श्वास घेतो ती हवा, पृथ्वीचा बहुतांश भाग व्यापणारे पाणी, प्राणी इत्यादी. पर्यावरण म्हणजे ज्या वातावरणामध्ये माणूस, प्राणी आणि वनस्पती राहतात. नैसर्गिकरीत्या आढळणाऱ्या सर्व सजीव आणि निर्जीव गोष्टी मिळून नैसर्गिक पर्यावरण बनते. यामध्ये माती, हवा, पाणी, खडक, हवामान इत्यादींचा समावेश केला जातो. मानवनिर्मित पर्यावरण हा सुद्धा पर्यावरणाचाच भाग समजला जातो म्हणजेच असे भूप्रदेश ज्याचे परिवर्तन माणसाने शहरी भागांमध्ये किंवा शेतीसाठी केलेले आहे. नैसर्गिक पर्यावरणाचे रुपांतर मानवी पर्यावरणामध्ये केलेले आहे.

१९७२ साली स्टॉकहोम येथे संयुक्त राष्ट्रांच्या मानवी पर्यावरणविषयक परिषदेत पहिल्यांदाच आर्थिक विकास आणि पर्यावरणाचा ऱ्हास यांच्यातील संबंधांचा विचार आंतरराष्ट्रीय स्तरावर केला गेला. या परिषदेचा मुख्य हेतू मानवी पर्यावरणाचे संरक्षण आणि त्यात सुधारणा घडवून आणण्यासाठी देशांना प्रोत्साहन देणे आणि मार्गदर्शन करणे असा होता. १९८३ साली संयुक्त राष्ट्राने जागतिक पर्यावरण आणि विकास आयोगाची स्थापना केली. (ब्रंटलँड कमिशन) या आयोगाने १९८७ साली आपला अहवाल सादर केला. या अहवालामध्ये केवळ आर्थिक वाढीचा नाही तर शाश्वत विकासाचा पर्यायी दृष्टिकोन मांडण्यात आला.

संयुक्त राष्ट्रांच्या आमसभेने संयुक्त राष्ट्रांची पर्यावरण आणि विकास परिषद बोलावली. ही परिषद ब्रंटलँड कमिशनच्या अहवालाचा आढावा घेणार होती. या परिषदेचा हेतू सामाजिक-आर्थिक विकास घडवून आणणारी तसेच पर्यावरणाचा ऱ्हास रोखणारी विकासाची संकल्पना समजून घेण्याचा होता. त्याचबरोबर विकसनशील राष्ट्रे आणि औद्योगिक प्रगत राष्ट्रे यांच्या एकत्रित प्रयत्नांतून पृथ्वीचे सुदृढ भवितव्य साधणे हेदेखील या परिषदेचे उद्दिष्ट होते. ही परिषद १९९२ साली रिओ येथे झाली.

रिओ दे जेनेरियो अर्थ समिट, रिओ समिट, (१९९२) रिओ कॉन्फरन्स किंवा अर्थ समिट अशी या परिषदेची विविध नावे आहेत. या परिषदेने विकासासाठी आंतरराष्ट्रीय सहकार्य निर्माण करण्याचा तसेच पर्यावरण आणि विकास यांचा एकत्रितपणे विचार करण्यासाठी जनजागृती करण्याचा प्रयत्न केला. शासन, उद्योग आणि स्वयंसेवी संस्थांचे नेते २००२ साली जोहान्सबर्ग येथे अर्थ समिटसाठी एकत्र आले. राष्ट्रीय, प्रादेशिक आणि आंतरराष्ट्रीय पातळीवरील संस्थांसाठी शाश्वत

RIO+20
United Nations
Conference on
Sustainable
Development

विकास हे सर्वांत महत्वाचे ध्येय आहे हे ठरले गेले. २०१२ मध्ये रिओ येथे संयुक्त राष्ट्रांची शाश्वत विकासासंदर्भात पुन्हा एकदा परिषद घेतली गेली. त्याला रिओ+२० किंवा रिओ अर्थ समिट २०१२ असे संबोधले जाते.

पर्यावरणीय शाश्वततेचा उद्देश नैसर्गिक संसाधनांचे संरक्षण करणे, ऊर्जेचे पर्यायी स्रोत शोधून काढणे, प्रदूषण आणि पर्यावरणाला पोहचणारी हानी कमी करणे हा आहे. पर्यावरणीय संसाधनांची हानी रोखण्यासाठी पर्यावरणासोबत जबाबदार नाते निर्माण करणे व दीर्घकाळासाठी पर्यावरणीय गुणवत्ता राखणे ही पर्यावरण संसाधनाची व्याख्या आहे. पर्यावरणीय संसाधनाचा उद्देश हा आजच्या पिढीच्या गरजा पूर्ण करताना पुढील पिढीच्या गरजा भागवण्याच्या क्षमतेशी तडजोड न करणे हा आहे.

पर्यावरणाशी निगडित महत्त्वाच्या समस्यांचा खाली उल्लेख केलेला आहे.

**हवामान बदल :** हवामान बदलाचे प्रमुख कारण हरितगृह वायूंचे उत्सर्जन हे आहे. यामुळे दुष्काळ, वणवे, उष्णतेच्या लाटा आणि पूर यांसारख्या तीव्र वातावरणीय समस्या उद्भवतात.

**प्रदूषण :** हवेचे प्रदूषण आणि हवामान बदल यांच्यात निकटचा संबंध आहे. हरितगृह वायूंमुळे पृथ्वीची उष्णता तर वाढतेच त्याशिवाय महानगरांमध्ये दाट धुक्यासारखे प्रदूषण वाढून लोकांच्या आरोग्यास हानी पोहोचते.

**जंगलतोड :** जंगले कार्बन डायॉक्साईड शोषून घेतात, जो एरवी पर्यावरणात मिसळून जागतिक तापमानवाढीत भर घालतो. जंगलतोड झाल्यामुळे जंगलांवर अवलंबून असणारे प्राणी आणि मानवाच्या रोजच्या जगण्याचा प्रश्न निर्माण होऊ शकतो.

**पाण्याची कमतरता :** लोकसंख्यावाढ आणि हवामान बदलामुळे निर्माण होणारी दुष्काळी परिस्थिती यामुळे पाण्याची कमतरता हा आज मोठा प्रश्न उभा राहिला आहे. स्वच्छ आणि सुरक्षित पाणी मिळवणे ही लोकांसमोरील मोठी समस्या आहे.

**जैवविविधतेचा ऱ्हास :** जैवविविधतेच्या ऱ्हासामुळे अन्नसुरक्षेचा आणि लोकांच्या आरोग्याचा प्रश्न उभा राहतो. हवामान बदल हेही जैवविविधतेच्या ऱ्हासाचे प्रमुख कारण आहे.



प्रदूषण



जंगलतोड

**करून पहा :** पर्यावरण संवर्धनासाठी तुम्ही काय करू शकता?

- हवामान बदल : ______________
- प्रदूषण : ______________
- जंगलतोड : ______________
- पाण्याची कमतरता : ______________
- जैवविविधतेचे संवर्धन : ______________

भारताच्या पर्यावरण आणि जंगलांविषयक धोरणांचे नियोजन, प्रोत्साहन, समन्वय आणि कार्यक्रमांची अंमलबजावणी करण्याची जबाबदारी 'पर्यावरण, वने आणि हवामान बदल मंत्रालयाकडे' सोपवली आहे. या मंत्रालयाचे प्राथमिक उद्दिष्ट देशातील तलाव व नद्या, तेथील जैवविविधता, जंगले आणि प्राणीजगत इत्यादी नैसर्गिक संसाधनांचे संरक्षण करणे, प्रदूषण कमी करण्यासाठी तयार करण्यात आलेली धोरणे व कार्यक्रमांची अंमलबजावणी करणे हे आहे. हे करताना मंत्रालय शाश्वत विकास आणि मानवाचे कल्याण या दोन मूल्यांचा आधार घेते.

**हे शोधा.**

पर्यावरणाचे संवर्धन करण्यासाठी भारत सरकारने कोणकोणत्या योजना आखल्या आहेत?



सोलर पॅनेल–अपारंपरिक ऊर्जा स्रोत

## गरिबी आणि विकास

गरिबी म्हणजे काय? गरिबीचा विकासाशी संबंध काय? गरिबी आणि विकास यांच्यातील संबंध समजून घेण्यासाठी आपल्याला कोणकोणत्या विविध दृष्टिकोनांची मदत होते? या भागात वरील नमूद केलेल्या मुद्द्यांची सविस्तर चर्चा केलेली आहे.

गरिबीच्या पारंपरिक दृष्टिकोनामध्ये अन्न, वस्त्र, निवारा, पाणी, स्वच्छता इत्यादींच्या अभावावर भर दिला जातो. गरिबीचा अर्थ शोधताना आर्थिक घटकाचा देखील विचार केला जातो. म्हणूनच गरिबी म्हणजे एखाद्या व्यक्तीची, कुटुंबाची किंवा समाजाची अशी परिस्थिती जिथे लोकांना स्वतःच्या मूलभूत गरजा भागवणे शक्य नसते किंवा कठीण असते. ही संकल्पना व्यक्तीच्या उत्पन्नावर लक्ष केंद्रित करते. उत्पन्नाच्या आधारावर त्या व्यक्तीला तुलनेने सोईस्कर आयुष्य जगता येते. हे जीवनाचे भौतिक घटक आहेत. राज्याने लोकांना जगण्यासाठी लागणाऱ्या मूलभूत गरजांचा पुरवठा व्हावा याची जबाबदारी घेणे अपेक्षित असते.

गरिबीचा एक पर्यायी दृष्टिकोन देखील आहे. हा दृष्टिकोन जीवनाच्या भौतिक व अधिभौतिक घटकांवर भर देतो. यामध्ये शाश्वत समाजातून मानवाच्या सामाजिक, आर्थिक व राजकीय कल्याणावर लक्ष केंद्रित केले जाते. याच्यात मूल्ये, सामाजिक बंध व सामूहिक संसाधनांच्या उपलब्धतेला विशेष महत्त्व दिलेले आहे. असा दृष्टिकोन निर्णय प्रक्रियेच्या सहभागी स्वरूपाला महत्त्व देतो. यामुळे समाजाच्या उपेक्षित घटकाला सार्वजनिक धोरणांमध्ये सहभाग घेता येतो. तसेच राजकीय व आर्थिक विकेंद्रीकरणाला प्रोत्साहनही मिळते.



भारतातील गरिबी : शहर



भारतातील गरिबी : स्थलांतरित

सामान्यतः विकासाचा दृष्टिकोन सामाजिक व राजकीय मूल्यांतून पाहिला जातो. विकासाचा हेतू लोकांचे कल्याण साधण्याचा असतो. उदा., विकासाचा संबंध आर्थिक वाढीशी जोडला जातो. आर्थिक विकासाचा एक पैलू आर्थिक वाढ घडवून आणण्याच्या राज्याच्या प्रमुख भूमिकेवर लक्ष केंद्रित करतो. तसेच

पर्यायी पैलू खुल्या अर्थव्यवस्थेच्या विकासाला प्रोत्साहन देण्याच्या भूमिकेला महत्त्व देतो. पहिला दृष्टिकोन हा 'समाजवादी' आहे तर दुसऱ्या दृष्टिकोनाला 'भांडवलशाही' म्हणता येईल. हे दोन्हीही विकासाचे पारंपरिक दृष्टिकोन आहेत.

विकासाचा पर्यायी अपारंपरिक दृष्टिकोन हा गरिबीच्या भौतिक आणि अधिभौतिक घटकांवर भर देतो. हा दृष्टिकोन समाजाच्या तळागाळातील लोकांच्या राजकीय सहभागाला महत्त्व देतो जेणेकरून निर्णयप्रक्रियेमध्ये समाजाच्या सर्व घटकांना योग्य प्रतिनिधित्व मिळेल. यामध्ये मानवी उपक्रम व निसर्ग यांच्यात योग्य तो समतोल साधण्याचा प्रयत्न केला जातो ज्यामुळे शाश्वत विकासाच्या संकल्पेनला प्रोत्साहन मिळते.

१९९० पर्यंत विकास साधण्याचे दृष्टिकोन मुख्यतः पारंपरिक स्वरूपाचे होते. त्यांचे प्रमुख उद्‌दिष्ट गरिबीची भौतिक समस्या सोडवण्याचे होते. म्हणूनच राज्याचे प्रमुख कार्य औद्योगिकीकरण साधून किंवा शेतीवर भर देऊन आर्थिक सुबत्ता वाढवणे असे होते. यातून रोजगार निर्मिती व दरडोई उत्पन्नाची वाढ होणे अपेक्षित होते. १९९० च्या पुढील काळामध्ये विकासाच्या पर्यायी दृष्टिकोनाला स्वीकारण्यात आले. त्यानुसार सध्याच्या काळात विकासाची संकल्पना समता, सहभाग, सबलीकरण तसेच शाश्वतता या तत्त्वांना महत्त्व देते.

**माहीत आहे का तुम्हांला ?**

**सहस्रक (मिलेनियम) विकास ध्येये :** सप्टेंबर २००० मध्ये संयुक्त राष्ट्रांच्या सदस्य राष्ट्रांनी एकत्र येऊन संयुक्त राष्ट्र सहस्रक जाहीरनामा मंजूर केला. या जाहीरनाम्याने सदस्य राष्ट्रांना २०१५ पर्यंत विकासाच्या आंतरराष्ट्रीय ध्येय साधण्यास बांधील केले. या ध्येयांना सहस्रक विकास ध्येये असे म्हणतात. या यादीतील ३ महत्वाची ध्येये म्हणजे भीषण गरिबीचे आणि उपासमारीचे निर्मूलन, शाश्वत विकास घडवून आणणे आणि विकासासाठी आंतरराष्ट्रीय ऐक्य साधणे. या ध्येयांच्या आधारावर २०१६ साली 'शाश्वत ध्येये' किंवा 'जागतिक ध्येये' अंमलात आली. दारिद्र्य निर्मूलन हे जागतिक ध्येयांतील प्राथमिक उद्‌दिष्ट आहे.

संयुक्त राष्ट्रांच्या आर्थिक व सामाजिक परिषदेने (Economic and Social Council) गरिबीची व्याख्या पुढीलप्रमाणे दिली आहे – गरिबी म्हणजे योग्य संधी व पर्यायांचा अभाव तसेच मानवी प्रतिष्ठेचे उल्लंघन. याचाच अर्थ समाजामध्ये प्रभावीपणे भाग घेण्याच्या क्षमतेचा अभाव, कुटुंबाच्या अन्न व वस्त्र या मूलभूत गरजा पुरवण्याइतक्या संपत्तीचा अभाव, शाळा किंवा दवाखाना नसणे, अन्न उत्पादनासाठी पुरेशी जमीन नसणे, रोजगार नसणे तसेच कर्ज मिळण्याइतकी पत नसणे. याचबरोबर गरिबी म्हणजे व्यक्तीची, कुटुंबाची

**शोधा आणि चर्चा करा.**

संयुक्त राष्ट्रांनी २०१५ मध्ये '२०३० शाश्वत विकासाचा जाहीरनामा' मान्य केला. आजच्यासाठी तसेच भविष्यासाठी लोकांना आणि जगाला शांतता आणि समृद्धीसाठीच्या संदर्भात एक आराखडा तयार करण्यात आला. या आराखड्यात विकसित आणि विकसनशील राष्ट्रांनी एकत्रितपणे साध्य करण्याची १७ उद्दिष्टे निश्चित करण्यात आली. ही उद्दिष्टे कोणती ते शोधून वर्गात चर्चा करा.

**शाश्वत विकासाची ध्येये**




अधिक माहितीसाठी : https://www.un.org/sustainabledevelopment/development-agenda/

तसेच समाजाची असुरक्षितता आणि दुर्बलता होय. याचा अर्थ दुर्बल घटक हिंसेला बळी पडण्याची शक्यता असते. तसेच त्यांना दुर्लक्षित परिस्थितीत जगावे लागते. त्यांना स्वच्छ पर्यावरण, पाण्याचा आणि आरोग्याचा अभाव सहन करावा लागतो. संयुक्त राष्ट्रांच्या आर्थिक व सामाजिक परिषदेने असा युक्तिवाद केला आहे, की गरिबी निर्मूलनासाठी शासन तसेच समाजातील इतर घटकांचा संपूर्ण सहभाग असणे गरजेचे आहे. हे कार्य प्रत्येक राष्ट्राच्या तसेच स्थानिक भागाच्या परिस्थितीचा आढावा घेऊन तेथील गरिबांच्या गरजा लक्षात घेऊन करणे आवश्यक आहे. लोकशाहीकरण आणि मानवी हक्कांचे संरक्षण हे सुशासनाचे मूलभूत घटक गरिबी दूर करण्यासाठी आवश्यक आहेत.

**माहीत आहे का तुम्हांला ?**

**संयुक्त राष्ट्र गरिबी या संकल्पनेकडे कसे पाहते?**

गरिबी म्हणजे शाश्वत जीवनासाठी मिळकतीचा व उत्पादक साधनांचा अभाव या पलीकडे जाऊन उपासमार, कुपोषण, शिक्षणाचा अभाव, इतर मूलभूत सेवांची कमतरता, सामाजिक भेदभाव, निर्णय प्रक्रियेतील सहभाग नसणे असाही होतो.

**माहीत आहे का तुम्हांला ?**

संयुक्त राष्ट्रांच्या आमसभेने २००७ साली एक ठराव मंजूर करून 'संयुक्त राष्ट्र दारिद्र्य निर्मूलनाच्या दुसऱ्या दशकाची' घोषणा केली (२००८-२०१७). या ठरावानुसार दारिद्र्य निर्मूलन हे जगासमोर असणारे सर्वांत मोठे जागतिक आव्हान आहे. शाश्वत विकास घडवून आणणे, विशेषतः विकसनशील राष्ट्रांना खूप गरजेचे आहे. पहिल्या संयुक्त राष्ट्रांच्या दारिद्र्य निर्मूलन दशकाच्या (१९९७-२००६) परिणामस्वरूपी राष्ट्रीय, प्रादेशिक तसेच आंतरराष्ट्रीय स्तरावर गरिबी दूर करण्याचे प्रयत्न झाले.

## भारतातील गरिबी आणि विकास

भारताच्या राष्ट्रीय धोरणाने नेहमी राजकीय स्वातंत्र्याला आर्थिक स्वातंत्र्याशी जोडले आहे. याचा अर्थ राष्ट्रीय सार्वभौमत्वाशी तडजोड न करता आपली धोरणे राबवण्याचे स्वातंत्र्य.

भारताच्या विकासप्रक्रियेचे तीन महत्वाचे पैलू राहिले आहेत :

**(i) अर्थव्यवस्थेचे आधुनिकीकरण :** भारताच्या आर्थिक व्यवस्थेचे आधुनिकीकरण म्हणजे औद्योगिकीकरण होय. औद्योगिकीकरणामुळे रोजगार निर्मिती होईल आणि उत्पादकता वाढेल अशी अपेक्षा होती. लघुउद्योगांपेक्षा मोठ्या प्रमाणातील उद्योगांवर तसेच उत्पादनावर भर देण्यात आला. यामुळे कामगारांच्या वाढत्या संख्येला रोजगार उपलब्ध होणार होता. पं.नेहरूंच्या कार्यकाळात कृषी क्षेत्राऐवजी औद्योगिकीकरणाला महत्त्व देण्यात आले. जमीन सुधारणा व जलसिंचन ही कृषी क्षेत्रांतील प्रगतीची साधने म्हणून पाहिली गेली.




भारतातील आधुनिकीकरणाची प्रतीके

**(ii) आत्मनिर्भरता :** भारताच्या राष्ट्रीय चळवळीचा संबंध 'आत्मनिर्भरता' या संकल्पनेशी जोडण्यात आला. आत्मनिर्भरतेचा एक पैलू म्हणजे भारताचे 'आयात पर्यायी धोरण'. यामध्ये भारताचे स्वदेशी कारखाने/ उद्योग विकसित करण्यावर भर दिला गेला. भारताने इतर राष्ट्रांकडून आर्थिक मदत घेतली पण ती प्रामुख्याने सार्वजनिक क्षेत्रातील उद्योगांसाठी वापरण्यात आली.

**(iii) समाजाची समता व सामाजिक न्याय असणारी 'समाजवादी' पद्धती :** भारताने विकासासाठी नियोजनाचा दृष्टिकोन स्वीकारला. त्यासाठी 'नियोजन आयोग'ची (Planning Commission) निर्मिती करण्यात आली. या नियोजन आयोगाने देशाच्या विकासासाठी पंचवार्षिक योजना तयार करणे अपेक्षित होते. खासगी क्षेत्राऐवजी सार्वजनिक क्षेत्रातील उद्योगाला महत्त्व देण्यात आले. भारताची समाजवादाची संकल्पना कल्याणकारी राज्याला प्रोत्साहन देणे तसेच रोजगार निर्मिती करण्यावर आधारित आहे. भारताच्या दारिद्र्य निर्मूलनासाठी हा मार्ग स्वीकारण्यात आला.

**माहीत आहे का तुम्हांला ?**

**नियोजन आयोग :** मार्च १९५० मध्ये भारत सरकारने लोकांचे राहणीमान सुधारण्यासाठी तसेच विकास घडवून आणण्यासाठी नियोजन आयोगाची स्थापना केली. या आयोगाचे एक उद्दिष्ट म्हणजे भारताच्या संसाधनांचे परिणामकारक आणि संतुलित वापरासाठी नियोजन करणे.

१ जानेवारी २०१५ ला नियोजन आयोगाच्या जागी 'नीति आयोगा'ची (National Institution for Tranforming India) स्थापना करण्यात आली. नीति आयोगाचे कार्य म्हणजे भारत सरकारचा 'विचारगट' म्हणून काम करणे व सरकारला दिशादर्शक आणि धोरणात्मक सल्ले देणे असे आहे.

१९६०-७० च्या दशकांमध्ये काही बदल घडले. १९६० च्या दशकात शेती विकासावर लक्ष केंद्रित केले गेले. या काळात भारतात 'हरित क्रांती' झाली.

**माहीत आहे का तुम्हांला ?**

हरित क्रांती म्हणजे जास्त उत्पन्न देणाऱ्या जातींच्या बियाणांचा विकास, कृत्रिम खतांचे व कीटकनाशकांचे वितरण तसेच सिंचनाच्या पद्धतींचा विस्तार. ही क्रांती १९६० च्या दशकात घडली. तिचे उद्दिष्ट कृषी उत्पादनात वाढ करून भारताला अन्नधान्यात स्वयंपूर्ण करणे असे होते.



हरित क्रांती

१९८० च्या दशकात भारताला आर्थिक संकटाला सामोरे जावे लागले. भारताचे सार्वजनिक क्षेत्र चांगली कामगिरी करू शकत नव्हते. दारिद्र्य निर्मूलन व समाज कल्याणासाठीचे उपक्रम फलदायी ठरत नव्हते. भारतीय राज्यघटनेच्या 'पंचायत राज' घटनादुरुस्तींमुळे निर्णयप्रक्रियेचे विकेंद्रीकरण झाले. पण तेदेखील फार यशस्वी झाले नाही. भारताला या आर्थिक अडचणींमुळे आंतरराष्ट्रीय नाणेनिधी कडून (International Monetary Fund) कर्ज घेणे भाग पडले.

भारताने नेहमीच आर्थिक वाढ व लोकांची जीवनशैली यांच्यातील संबंध समजून घेतला आहे. त्याचबरोबर आर्थिक विकासाच्या जोडीने सामाजिक न्याय साधण्याच्या ध्येयाला महत्त्व दिले आहे. गरिबी निर्मूलन आणि विकासासाठी 'सामाजिक न्याय व समतेवर आधारित विकास' हे भारताचे धोरण राहिले आहे. भारत सरकारने गरिबांच्या मदतीसाठी तसेच समग्र विकास घडवून आणण्यासाठी वेळोवेळी विविध कार्यक्रम योजलेले आहेत.

भारताच्या विकासाचे धोरण काळानुसार बदलत गेले आहे. जागतिक अर्थव्यवस्थेच्या बदलांचा तसेच वाढत्या आर्थिक सत्तेचा प्रभाव भारताच्या विकास धोरणावर पडला आहे. विकास नियोजनाच्या सुरवातीच्या

टप्प्यांमध्ये सार्वजनिक क्षेत्र उद्योगांच्या माध्यमातून सरकारची भूमिका महत्त्वाची होती. १९८० च्या दशकांमध्ये हे धोरण बदलले. या काळात विकासाच्या धोरणातील काही त्रुटी भरून काढण्यासाठी काही बदल १९८० च्या दशकात केले गेले. १९९१ च्या पुढील काळात आर्थिक सुधारणांच्या कार्यक्रमाची सुरवात झाली. पूर्वीचे विकासाचे समाजवादी प्रतिमान सोडून देण्यात आले. भारताने आर्थिक उदारीकरण आणि सार्वजनिक क्षेत्राचे खासगीकरण घडवून आणले. या आर्थिक सुधारणांचा पाठपुरावा पुढील काळातील भारतीय सरकारांनी केला. तसेच या सुधारणांना जनतेचा पाठिंबा देखील मिळाला. या सुधारणांमुळे भारतीय अर्थव्यवस्थेमध्ये बरेच बदल झाले. भारताची आर्थिक व औद्योगिक वाढ झाली आणि भारत एक स्थिर आर्थिक सत्ता असलेला देश म्हणून जगापुढे आला.

या सुधारणांमुळे शासनाच्या भूमिकेतदेखील फरक पडला. आता विकासाचे धोरण म्हणजे खासगी क्षेत्राला उत्पादन वाढवण्यासाठी प्रेरित करणे, रोजगार वाढवणे आणि समाजाच्या मिळकतीची पातळी वाढवणे असे आहे. भारतामध्ये बलाढ्य व क्रियाशील असे खासगी क्षेत्र अस्तित्वात आहे ज्याच्यामध्ये मोठ्या, मध्यम आणि लघु उद्योगांचा समावेश आहे. खासगी क्षेत्राला महत्त्व मिळाले म्हणजे सरकारची विकासातील भूमिका संपली असा होत नाही. आज, नागरी समाजासोबत सरकारची विशेषतः ग्रामीण भागांमध्ये सामाजिक विकासामध्ये महत्त्वाची भूमिका आहे. यामध्ये मूलभूत सेवा जसे, आरोग्य सेवा, शिक्षण, स्वच्छ पाणी इत्यादी सेवा ग्रामीण भागांत उपलब्ध करून देण्याचा समावेश आहे.

२०१८ मध्ये संयुक्त राष्ट्र विकास कार्यक्रमाने आणि ऑक्सफोर्ड पॉव्हर्टी अँड ह्युमन डेव्हलपमेंट इनिशिएटिव्हने प्रसिद्ध केलेल्या बहुआयामी गरिबी निर्देशकांनुसार, अनेक अडचणी आणि त्रुटी असूनदेखील भारताने बहुआयामी दारिद्र्य निर्मूलनात बरीच प्रगती केली आहे. या अहवालानुसार भारतामध्ये गरिबीचे प्रमाण २००५-०६ आणि २०१५-१६ दरम्यान अर्ध्यावर आले आहे. ते ५४.७% पासून २७.५% पर्यंत खाली आले आहे. तरीही, भारताच्या काही प्रदेशांमध्ये भीषण गरिबी आढळून येते.

**शोधा पाहू !**

भारताचे गरिबी निर्मूलनाचे काही कार्यक्रम खाली दिलेले आहेत. त्याविषयी माहिती शोधा. त्यावर वर्गात चर्चा करा. तसेच भारतामधल्या इतर दारिद्र्य निर्मूलनाच्या कार्यक्रमांची माहिती शोधा.

भारतामध्ये गरिबी निर्मूलनाचे कार्यक्रम ग्रामीण आणि शहरी अशा दोन्ही भागांसाठी आखलेले आहेत. त्यातील बहुतांश कार्यक्रम हे ग्रामीण भागांमधील गरिबी दूर करण्याच्या हेतूने राबवले जातात. कारण ग्रामीण भागांमध्ये गरिबीचे प्रमाण अधिक आहे.

**जवाहर ग्रामसमृद्धी योजना :** ही योजना जवाहर रोजगार योजनेची सुधारित आवृत्ती आहे. ती योजना १९९९ साली सुरू करण्यात आली. या योजनेचे प्रमुख उद्दिष्ट म्हणजे ग्रामीण भागातील विविध भागांमध्ये पायाभूत सुविधांचा म्हणजेच रस्ते, शाळा, दवाखाने इत्यादींचा विकास घडवून आणणे.

**एकात्मिक ग्रामीण विकास कार्यक्रम :** ही योजना पहिल्यांदा १९७८-७९ मध्ये राबवण्यात आली. या योजनेचे प्रमुख उद्दिष्ट म्हणजे ग्रामीण भागातील लोकांना स्वयंरोजगारासाठी संधी उपलब्ध करून देणे.

**प्रधानमंत्री ग्रामीण आवास योजना :** ही योजना १९८५ साली सुरू केली गेली. या योजनेचा 'प्रत्येकासाठी घर देणे' हा हेतू होता.

**महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना :** ही योजना २००५ साली कार्यान्वित झाली. या योजनेअंतर्गत प्रत्येक ग्रामीण कुटुंबाला दरवर्षी १०० दिवस रोजगार उपलब्ध करून दिला जातो.

**संसद आदर्श ग्राम योजना :** ही योजना २०१४ साली सुरू झाली. या योजनेनुसार प्रत्येक खासदाराने २०१९ पर्यंत तीन गावांच्या विकासाची जबाबदारी घ्यायची आहे. या योजनेचा हेतू म्हणजे भारताच्या ग्रामीण भागांमध्ये सोयी-सुविधांचा विकास घडवून आणणे असा आहे.

**प्रधानमंत्री कौशल विकास योजना :** ही योजना २०१५ साली सुरू करण्यात आली. या योजनेमुळे युवकांना कौशल्य प्रशिक्षण देण्यात येते.

**शोधा पाहू ?**

उद्योगांचे सामाजिक उत्तरदायित्व म्हणजे काय? विविध कंपन्यांनी व उद्योगांनी तुमच्या परिसरात राबवलेल्या कार्यक्रमांची माहिती मिळवा.

## लिंगभावनिगडित समस्या

### गरिबी आणि स्त्रिया

वेगवेगळ्या समस्या आणि विषय एकमेकांशी अंतर्गतरीत्या जोडलेले असतात. यातील महत्त्वाच्या आंतरसंबंधांपैकी एक म्हणजे गरिबी, मागासलेपण आणि स्त्रिया. जगातील निरनिराळ्या प्रदेशांमधील बहुतेक स्त्रिया सांस्कृतिक नीतिमूल्ये, वस्तू आणि मालमत्तेच्या वाटपातील भेदभाव आणि स्त्रिया व पुरुषांमधील सत्तेची असमान समीकरणे या कारणांमुळे गरिबीत असल्याचे दिसून येते. त्याचप्रमाणे, स्त्रिया आणि मुलींना विनामोबदला घरगुती जबाबदाऱ्याही पार पाडाव्या लागतात. स्त्रियांची संख्या अनौपचारिक कार्यक्षेत्रामध्ये अधिक प्रमाणात दिसून येते.

१९व्या शतकाच्या पहिल्या दशकामध्ये जगात अनेक ठिकाणी स्त्रीवादी चळवळींचा उदय झाला. तेव्हापासून स्त्रियांच्या सामाजिक, राजकीय आणि आर्थिक हक्कांवर सातत्याने भर देण्यात आला. त्यांनी सर्वसाधारणपणे लिंगभाव समानतेवर भाष्य केले. यामध्ये समान हक्क, सामाजिक समानता, राजकीय समानता, लिंगभावप्रति न्याय इत्यादींचा समावेश होतो. १९७० नंतर महिला सक्षमीकरण ही एक महत्त्वाची संकल्पना आणि तत्त्वप्रणाली मानली जाऊ लागली.

**सक्षमीकरण म्हणजे काय?**

सक्षमीकरण म्हणजे अशी प्रक्रिया ज्याद्वारे शोषित व्यक्तींना स्वतःच्या आयुष्यावर ताबा मिळवता येतो. यामुळे जगण्याच्या मूलभूत गरजा त्यांना भागवता येतात. या प्रक्रियेत व्यक्तीस ताकद व आत्मविश्वास प्राप्त होतो, तिचा स्वाभिमान वाढतो आणि अन्यायाविरुद्ध लढा देण्यासाठी बळ निर्माण होते. सक्षमीकरणाच्या प्रक्रियेस सामाजिक, आर्थिक, मानसशास्त्रीय आणि राजकीय अशा बाजू आहेत.

जागतिक राजकारणात १९८० सालापासून लिंगभावनिगडित प्रश्नांचे महत्त्व वाढीस लागले. याचा परिणाम म्हणजे जागतिक राजकारणात लिंगभावनिगडित दृष्टिकोन विकसित झाला. यामध्ये लिंगभावाचे विश्लेषण म्हणजेच पुरुषांच्या आणि महिलांच्या अस्मितांचे विश्लेषण करणे आवश्यक ठरते.



**माहीत आहे का तुम्हांला ?**

लिंगभाव म्हणजे पुरुष आणि स्त्रिया यांना समाजाने बहाल केलेली वैशिष्ट्ये- यामध्ये स्वभाव, नीतिमूल्ये, भूमिका आणि स्त्री-पुरुषांमध्ये असणारे नातेसंबंध यांचा समावेश होतो. लिंगभावनिगडित दृष्टिकोन स्त्रीपुरुषांमधील हितसंबंध, त्यांच्या भूमिका, त्यांचा संसाधनांवर असणारा हक्क, कामाचे विभाजन, मागण्या व समस्या यांवर भाष्य करतो.

स्त्रिया आणि पुरुषांचा जगाकडे पाहण्याचा दृष्टिकोन परस्परांपासून भिन्न असतो हे लिंगभावनिगडित दृष्टिकोनाचे गृहीतक असते. ही भिन्नता या गटांना असलेल्या विभिन्न सामाजिक आणि ऐतिहासिक अनुभवांमुळे येते. महिलांच्या यापूर्वी डावलल्या गेलेल्या योगदानास लिंगभावनिगडित दृष्टिकोनामुळे मान्यता मिळण्यास सुरुवात झाली. महिलांच्या वेगवेगळ्या अदृश्य कार्यभागांचे विश्लेषण होऊ लागले, जसे, घरगुती कामगार, स्थलांतरित कामगार, मुत्सद्द्यांच्या पत्नींचे योगदान इत्यादी. त्याचसोबत या दृष्टिकोनामुळे संपूर्ण जगातील महिलांच्या समस्यांवर लक्ष केंद्रित केले गेले.

लिंगभाव असमानता ही व्यापक समस्या आहे, याची कारणे म्हणजे महिलांसाठी चांगल्या रोजगारसंधींचा अभाव आणि स्त्री-पुरुषांमध्ये असलेली वेतनाची असमानता. जगात जवळपास सगळीकडे महिला आणि बालिकांना रोजच्या जगण्यात चांगले शिक्षण आणि आरोग्यसुविधा नाकारल्या जातात; त्याचप्रमाणे आर्थिक आणि राजकीय निर्णयप्रक्रियांमध्ये त्यांचे प्रतिनिधित्व पुरेसे नसते. त्यांना हिंसा व भेदभावासही सामोरे जावे लागते.

सन १९७६ मध्ये संयुक्त राष्ट्रांचे 'स्त्रियांसाठीचे दशक' सुरू झाले. जगात सर्वत्र स्त्रियांना समान हक्क आणि संधी यांना प्रोत्साहन मिळावे हा या कार्यक्रमाचा हेतू होता. या कार्यक्रमाने स्त्रियांचे प्रश्न विकासाच्या

प्रश्नांशी जोडण्याचा देखील प्रयत्न केला. शिक्षण, आरोग्य, कामांच्या जागा, जमिनीची मालकी आणि मानवी हक्क यांबाबत स्त्रियांना जाणवणारी असमानता यावर लक्ष केंद्रित केले गेले.

### भारतातील महिलांची स्थिती

लिंगभाव समानतेचे तत्त्व भारताच्या संविधानामधील उद्देशिका, मूलभूत तत्त्वे, मूलभूत कर्तव्ये आणि मार्गदर्शक तत्त्वांमध्ये समाविष्ट केले गेले आहे. भारताचे संविधान महिलांना समानतेचे तत्त्व केवळ मूलभूत हक्क म्हणून बहाल करत नाही, तर शासनाला त्यावर आधारित सकारात्मक कृती करण्याची परवानगीदेखील देते. असे असूनसुद्‌धा महिलांना सातत्याने भेदभावाला सामोरे जावे लागते. भारतातील महिलांपुढील काही समस्या खाली दिल्या आहेत.

(i) **आर्थिक असमानता :** भारतातील सगळ्यांत मोठ्या समस्यांपैकी एक म्हणजे स्त्री-पुरुषांमधील वेतनातील दरी. त्याचबरोबर श्रमिकांच्या बाजारपेठेतील महिलांची टक्केवारी २८.२% इतकी कमी आहे, तर तुलनेने पुरुष ७८.८% आहेत.

(ii) **तस्करी आणि शोषण :** २०१३ साली संयुक्त राष्ट्र मादक पदार्थ आणि गुन्हे विभागाने सादर केलेल्या अहवालात भारतातील महिलांचे जबरदस्तीने विवाह करण्यासाठी तस्करी केली जात असल्याचे म्हटले आहे. यात पुढे असे नमूद केले आहे की, 'त्यांचे बहुतेक वेळा शोषण केले जाते, त्यांचे मूलभूत हक्क डावलले जातात, त्यांना मोलकरीण म्हणून राबवून घेण्यात येते आणि कालांतराने परित्यक्त केले जाते.'

(iii) **साक्षरतेचे प्रमाण :** भारतातील महिलांचे साक्षरतेचे प्रमाण पुरुषांच्या तुलनेत कमी आहे. २०११ च्या जनगणनेच्या अहवालानुसार पुरुषांमधील साक्षरतेचे प्रमाण ८२.१४% आहे, तर महिलांमधील प्रमाण ६५.४६% आहे.

(iv) **राजकीय प्रतिनिधित्व :** भारताला स्वातंत्र्य मिळाल्यापासून संसदेत आणि राज्यांतील विधानमंडळांमध्ये महिलांचे असलेले अत्यल्प प्रमाण ही समस्या राहिलेली आहे.

> **शोधा पाहू ?**
> १७ व्या लोकसभेतील महिला खासदार प्रतिनिधींची संख्या किती आहे ते शोधा.

भारतामध्ये लोकशाही कायदे आणि विकासात्मक धोरणांच्या परिघात वेगवेगळ्या क्षेत्रांमध्ये महिलांच्या प्रगतीसाठी धोरणे आणि कार्यक्रम आखण्यात आले आहेत. १९५३ साली केंद्रीय सामाजिक कल्याण मंडळाची (CSWB) स्थापना केली गेली. याचा उद्‌देश कुटुंब, महिला आणि बालकांसाठी कल्याणकारी योजना राबवणे हा होता.

भारतात महिलांच्या समस्यांकडे पाहण्याचा सर्वसाधारण दृष्टिकोन हा 'कल्याणकारी दृष्टिकोन' आहे. याचा मूळ उद्‌देश हा महिला मंडळे स्थापन करून महिलांचा विकास साधणे, धोकादायक कामांपासून महिलांचे संरक्षण, गर्भवती स्त्रिया आणि बालकांसाठी आरोग्य सुविधा उपलब्ध करून देणे इत्यादी होता. १९६० च्या दशकापासून कल्याणकारी योजना म्हणून शिक्षणावर भर देण्यात आला. आरोग्यविषयक कार्यक्रमांचा भर मातृत्व आणि बालकांसाठी आरोग्य सुविधा, आरोग्य शिक्षण व पोषण, कुटुंबनियोजन हा होता.

१९७० च्या दशकापासून महिलांसंदर्भातील 'कल्याणकारी' दृष्टिकोनात बदल घडून 'विकासा'वर भर देण्यात येऊ लागला. १९७० चे दशक हे संयुक्त राष्ट्रांचे महिलांसाठीचे दशक होते. भारतातील महिलांची स्थिती अभ्यासण्यासाठी एक समिती नियुक्त करण्यात आली. त्या समितीने दिलेल्या अहवालात, भारतातील बदलत्या सामाजिक आणि आर्थिक परिस्थितीत महिलांचे हक्क आणि स्थिती यांवर भाष्य केले गेले आहे. या अहवालाचे शीर्षक 'Towards Equality' असे आहे. १९८० साली महिलांच्या संदर्भातील दृष्टिकोनात आणखी बदल घडून आला. आता त्यामध्ये आरोग्य, शिक्षण आणि रोजगार यांवर भर देण्यात आला.

१९९० च्या दशकात 'विकासा'ची जागा 'सक्षमीकरणा'ने घेतली. शासनाला विकासाचे फायदे महिलांनाही करून द्यायचे होते. त्यासाठी नियोजन आणि अंमलबजावणीमध्ये महिलांचा सहभाग महत्त्वाचा मानला जाऊ लागला. १९९० मध्ये कायद्याद्वारे




भारतातील महिला सक्षमीकरण

'राष्ट्रीय महिला आयोगा'ची स्थापना झाली. यात महिलांच्या हक्कांचे व कायदेशीर बाबींचे संरक्षण करण्याची ग्वाही देण्यात आली. भारताच्या संविधानातील ७३व्या व ७४व्या घटनादुरुस्तीमुळे (१९९३) पंचायत समिती आणि नगरपालिकांमध्ये महिलांना आरक्षण देण्यात आले. त्यामुळे स्थानिक पातळीवरील निर्णयप्रक्रियेत महिलांचा सहभाग वाढण्यास मदत झाली.

महिलांसाठीचा सामाजिक-सांस्कृतिक परीघ हा जुन्या व नव्या मूल्यांचे जटील मिश्रण आहे. औद्योगिकीकरण, जागतिकीकरण, शहरीकरण आणि आधुनिकीकरणामुळे महिलांच्या आयुष्यात मोठे बदल झालेले आहेत. एका बाजूला उदारमतवादामुळे महिलांना शिक्षण, रोजगार आणि निर्णयप्रक्रियांमध्ये अनेक संधी मिळत आहेत, तर दुसऱ्या बाजूला अत्याचारांमध्ये झालेली वाढ, वेतनातील दरी आणि भेदभावाचा सामनाही करावा लागत आहे. संस्थात्मक घटकांनी पुढाकार घेतल्यास समाजातील मूल्ये आणि मानसिकता यांत बदल घडून येऊ शकतो. यामध्ये कुटुंब, समुदाय, धर्म आणि शैक्षणिक संस्थांचा समावेश होतो. लिंगभाव समानतेसाठी आर्थिक आणि सामाजिक धोरणांची निर्मिती करणे, त्यांना बळकटी देणे आणि अंमलबजावणी करणे हे त्यांच्यामार्फत होऊ शकते.

२००६ मध्ये भारत सरकारचे महिला आणि बालकल्याण विभाग हे स्वतंत्र मंत्रालय म्हणून अस्तित्वात आले. याआधी १९८५ सालापासून ते मानव संसाधन विकास विभागाच्या अखत्यारीत येत असे. या मंत्रालयाचा प्रमुख उद्देश महिला व बालकांसाठी असलेल्या धोरणांतील त्रुटी शोधणे, लिंगभाव समानतेसाठी व बालकांवर केंद्रित असे कायदे करणे, धोरणे व कार्यक्रम आखणे हा होता. महिलांना सन्मानाने जगता येईल आणि विकासामध्ये समान भागीदार होता येईल; तसेच हिंसा आणि भेदभावरहित वातावरण निर्माण करून सक्षमीकरण साधणे हा या मंत्रालयाचा उद्देश आहे.

मंत्रालयाने २००१ साली महिला सक्षमीकरणासाठी राष्ट्रीय धोरण तयार केले. २०१६ मध्ये महिलांसाठी राष्ट्रीय धोरणाच्या मसुद्याची निर्मिती केली. भारतातील कायदेमंडळाने अलीकडे अनेक महत्वाचे कायदे पारित केले. त्यातील कामाच्या ठिकाणी स्त्रियांचा लैंगिक छळ विधेयक (प्रतिबंधात्मक व निवारण) २०१३; घरगुती हिंसाचार प्रतिबंध कायदा, २००५; मुस्लीम महिला (लग्नासंदर्भात हक्काचे संरक्षण) कायदा, २०१९ हे काही महत्वाचे कायदे आहेत.

**शोधा आणि चर्चा करा.**

राष्ट्रीय महिला धोरण (२०१६) वाचा व त्याची वर्गात चर्चा करा.

१९९० सालापासूनच्या तीन महत्वाच्या मानवतावादी समस्यांचा आपण या पाठात अभ्यास केला. या समस्या जागतिक आहेत, कारण त्या जगात कुठेही उद्‌भवू शकतात. या समस्यांवर उपाय शोधण्यास भारत सरकारने काय पावले उचलली आहेत हेही आपण पाहिले. पुढच्या पाठात आपण शांतता, स्थैर्य आणि विकास साधण्यामध्ये शासनाची काय भूमिका असते हे जाणून घेऊया.

**See the following website for additional information:**

1. National Policy for Women, 2016: 'Articulating a Vision for Empowering of Women'. Government of India, Ministry of Women and Child Development
https://wcd.nic.in/sites/default/files/draft%20national%20policy%20for%20women%202016_0.pdf\
2. Voluntary National Review Report on the Implementation of Sustainable Development Goals, United Nations High Level Political Forum, 2017.
https://www.niti.gov.in/writereaddata/files/India%20VNR_Final.pdf

## स्वाध्याय

**प्र.१ (अ) दिलेल्या पर्यायांपैकी योग्य पर्याय निवडून विधाने पूर्ण करा.**

(१) रिओ दी जानेरिओ अर्थ समिट (१९९२) यावर लक्ष केंद्रित करतो.
(अ) पर्यावरण आणि विकास
(ब) आण्विक प्रसारबंदी
(क) आंतरराष्ट्रीय व्यापार
(ड) लिंगभाव निगडित समस्या

(२) आज भारताचा लिंगभाव निगडित दृष्टिकोन यावर लक्ष केंद्रित करतो.
(अ) शिक्षण
(ब) लोककल्याण
(क) विकास
(ड) सक्षमीकरण

**(ब) दिलेल्या विधानांसाठी समर्पक संकल्पना लिहा.**

(१) जास्त उत्पन्न देणाऱ्या जातीच्या बियाणांचा विकास सिंचन पद्धतीचा विस्तार –

(२) भारतीय सरकारचा विचारगट म्हणून काम करणे व सरकारला निर्देशक आणि धोरणात्मक सल्ले देते –

**प्र.२ खालील विधाने चूक की बरोबर सकारण स्पष्ट करा.**

(१) नियोजन आयोगाची निर्मिती कृषी विकासाला प्रोत्साहन देण्यासाठी झाली.

(२) राष्ट्रीय महिला आयोगाची स्थापना महिला हक्क संरक्षणासाठी करण्यात आली.

**प्र.३ सहसंबंध स्पष्ट करा.**

(१) महिला सक्षमीकरण आणि शाश्वत विकास

(२) गरिबी आणि विकास

**प्र.४ आपले मत नोंदवा.**

पर्यावरण संरक्षण ही काळाची गरज आहे.

**प्र.५ पुढील प्रश्नांची उत्तरे लिहा.**

(१) हरित क्रांती म्हणजे काय?

(२) सक्षमीकरण म्हणजे काय ते सांगून सक्षमीकरणासाठी उपाय सूचवा.

**प्र.६ दिलेल्या मुद्द्यांच्या आधारे प्रश्नाचे सविस्तर उत्तर लिहा.**

भारतातील महिलांची स्थिती

(अ) आर्थिक असमानता (ब) तस्करी व शोषण
(क) साक्षरतेचे प्रमाण (ड) राजकीय प्रतिनिधित्व

**उपक्रम**

(१) १७ व्या लोकसभेतील दिव्यांग व्यक्तींच्या मतांची टक्केवारी शोधा. टक्केवारी वाढवण्यासाठी उपाय सूचवा.

(२) पर्यावरणीय समतोलाशी निगडित आंतरराष्ट्रीय करारांविषयी माहिती संकलित करा.

# ४. समकालीन भारत : शांतता, स्थैर्य आणि राष्ट्रीय एकात्मतेसमोरील आव्हाने

लोकशाही समाजरचनेमध्ये वैचारिक विविधता असते. ही विविधता सामाजिक, आर्थिक, राजकीय आणि सांस्कृतिक वैविध्यांमुळे येते. भारतातील स्थिती जात, धर्म, गरिबी, निरक्षरता, लोकसंख्येचा दबाव, भाषिक आणि वांशिक विविधता यांमुळे अधिक गुंतागुंतीची झाली आहे. शेतकरी असंतोष, कामगार आणि विद्यार्थी आंदोलने, जातीय दंगली आणि जातीय हिंसाचार यांमुळे उद्‍भवलेला विक्षोभ भारताने अनेकदा अनुभवला आहे. सुशासन आणि कायदा अंमलबजावणीतील कमतरता ही सार्वजनिक अराजकाची (public disorder) प्रमुख कारणे आहेत.

सार्वजनिक सुव्यवस्था, स्थैर्य आणि शांतता यांसाठी सुसंवादी समाज अभिप्रेत असतो. यामध्ये शांतताभंग, दंगली, उठाव आणि नियमभंग यांना स्थान नसते. कायदा आणि सुव्यवस्था राखणे हे राज्याचे प्राथमिक कर्तव्य आहे. राज्याच्या राजकीय, आर्थिक, सामाजिक, सांस्कृतिक प्रगतीसाठी शांतता आणि स्थैर्य याची नितांत आवश्यकता असते. याच्या अभावी देशात फुटीरतावादी प्रवृत्ती वाढीस लागतात. त्यामुळे राष्ट्रात एकी, शांतता व स्थैर्य राखणे ही राज्याची प्राथमिक जबाबदारी आहे. समाजात विविध गट असतातच, परंतु सर्व गटांमध्ये सामंजस्य राखण्यासाठी राज्याने पुढाकार घ्यावा अशी अपेक्षा असते. राष्ट्र उभारणीची आणि राष्ट्रीय एकात्मता निर्माण करण्याची ही प्रक्रिया आहे.

राष्ट्र, राष्ट्रवाद आणि राज्य या राज्यशास्त्रातील प्रमुख संकल्पना आहेत. त्या आपण इयत्ता ११ वी मध्ये अभ्यासल्या आहेत. त्यांतील काही महत्त्वाच्या मुद्द्यांची फेरउजळणी करूया.

- राष्ट्र हा एकीच्या भावनेने बांधलेला एक समुदाय आहे. या एकीसाठी काही आधारभूत घटक असतात. स्वतःची वेगळी सामाजिक, सांस्कृतिक, राजकीय ओळख असलेला हा लोकसमुदाय स्वतःचे वेगळेपण स्थापित करू इच्छितो. संस्कृती, वंश, धर्म, भाषा, इतिहास यांतील साधर्म्यामुळे या समुदायात एकीची भावना निर्माण होते.
- राष्ट्रवाद ही राजकीय अस्मिता निर्माण होण्याची भावना आहे. त्यांच्यात स्वतःच्या या अस्मितेतून स्वत्वाची जाणीव निर्माण होते. राष्ट्रवाद वांशिक, धार्मिक, भाषिक इत्यादी समुदायांमध्ये एकीची भावना निर्माण करणारा घटक आहे.
- जेव्हा राष्ट्रातील लोक सार्वभौम राज्याची मागणी करतात, म्हणजेच स्वयंनिर्णयाच्या हक्काची मागणी करतात तेव्हा ती स्वयंनिर्णयाची आस राष्ट्राला राज्याच्या दिशेने घेऊन जाते. राष्ट्राचे राज्यात रूपांतर कधी होते? 'राज्य' म्हणवून घेण्यासाठी सार्वभौमत्व, स्वतंत्र शासन व्यवस्था, भूप्रदेश आणि लोकसंख्या या घटकांची आवश्यक असते.
- राज्यामधील लोक विविध वंश, धर्म आणि भाषा असणारे असू शकतात. त्या लोकांमध्ये स्वतःची वेगळी ओळख असण्याची जाणीवही असू शकते. परंतु राज्य निर्माण करण्यासाठी ते एकदिलाने एकत्र येतात. जगातील अनेक देश बहुवांशिक, बहुधर्मीय व बहुसांस्कृतिक आहेत. त्यामुळे कोणत्याही राज्याला राष्ट्रीय ऐक्य, एकता आणि सबलीकरणाच्या समस्येला सामोरे जावे लागते. ही समस्या राष्ट्रीय एकात्मता साध्य करण्याची आहे.

यामध्ये राज्याची भूमिका कोणती? राष्ट्रवाद, धर्मनिरपेक्षता, लोकशाही यांसारखी मूल्ये तसेच आर्थिक प्रगती आणि समाज परिवर्तन यांसारखी उद्दिष्टे राज्याची भूमिका स्पष्ट करतात. ही भूमिका खालील मुद्द्यांच्या आधारे स्पष्ट करता येते.

(i) **शांतता आणि सुव्यवस्था :** राज्य समाजात शांतता आणि सुव्यवस्था प्रस्थापित करते. राज्याचा मूळ हेतू देशाचे संरक्षण हा आहे. या कार्याला 'राष्ट्र उभारणीचे' कार्य असे संबोधले जाते. राजकीय व्यवस्थेचे अस्तित्व आंतरराष्ट्रीय

वा देशांतर्गत परिस्थितीमुळे धोक्यात येऊ शकते. देशाचे संरक्षण करणे, अस्तित्व टिकवणे, संविधान आणि राजकीय व्यवस्था टिकवणे यांत राज्याची प्रमुख भूमिका असते.

(ii) **आर्थिक प्रगती :** देशाच्या औद्योगिक, कृषी विकास आणि आर्थिक प्रगतीसाठी राज्याने महत्त्वाची भूमिका बजावणे अपेक्षित आहे. आर्थिक स्थैर्य आणि वाढ यांतून लोकांचे आर्थिक हित साध्य करता येते. याचा अर्थ समाजवादी व्यवस्था निर्माण करणे नव्हे, तर राज्याने आर्थिक प्रगतीसाठी आवश्यक सुविधा उपलब्ध करून देणे होय.

(iii) **राष्ट्र उभारणी :** समाजातील विविधतेमुळे राज्याचे विघटन होणार नाही याची काळजी राज्याने घ्यायची असते. राष्ट्रीय एकात्मतेच्या संकल्पनेचा राष्ट्र उभारणीशी अत्यंत जवळचा संबंध आहे.

(iv) **शासन :** समाजातील लोकांचा राज्याच्या निर्णय प्रक्रियेमधील सहभाग हे सुशासनाचे लक्षण आहे. यालाच 'लोकशाहीकरण' अथवा 'लोकसहभागी राज्य' असे म्हणतात.

(v) **लोककल्याण :** सामाजिक न्याय, वाजवीपणा (fairness), समानता या तत्त्वांचा वापर लोककल्याणासाठी करणे, समाजातील असमतोल दूर करून दुर्लक्षित घटकांचे दुःख दूर करणे ही राज्याची जबाबदारी आहे.

राष्ट्रवाद, धर्मनिरपेक्षता, लोकशाहीची मूल्ये, आर्थिक प्रगती आणि समाज परिवर्तन यांचा राष्ट्र उभारणीशी जवळचा संबंध आहे.

राष्ट्रीय एकात्मतेची समस्या सार्वत्रिक आहे. देशाची एकसमान ओळख निर्माण करण्यासाठी समाजातील विविध घटकांमध्ये संवाद साधून सलोखा निर्माण करणे महत्त्वाचे असते. ही विविधता सामाजिक, सांस्कृतिक, प्रादेशिक, धार्मिक, भाषिक व आर्थिक स्वरूपाची असू शकते, परंतु तरीही एक राष्ट्रीय ओळख असणे म्हणजेच राष्ट्रवाद होय. अशी एक ओळख निर्माण होण्यासाठी राष्ट्रवाद राष्ट्रीय एकतेचा पुरस्कार करतो. आपापसातील भेदभाव विसरून सलोखा निर्माण करतो. संकुचित दृष्टिकोन न ठेवता (sectoral perspective) राष्ट्रीय दृष्टिकोन निर्माण करतो.

> राष्ट्रीय एकात्मता ही विटा अथवा सिमेंटने निर्माण करता येत नाही, ती छिन्नी वा हातोड्यानेही निर्माण करता येत नाही, तर ती शांतपणे लोकांच्या मनात आणि हृदयात निर्माण व्हावी लागते.
>
> **– डॉ.सर्वपल्ली राधाकृष्णन**

राष्ट्रीय एकात्मता व्यक्ती अथवा गटांची ओळख पुसून टाकत नाही. ती एकसंध समाज निर्माण करण्याचाही प्रयत्न करत नाही, तर ती फक्त गटांच्या ओळखीपेक्षा राष्ट्रीय ओळख निर्माण करण्याचा प्रयत्न करते. उदा., जेव्हा आपण म्हणतो, की मी भारतीय आहे. तेव्हा ती राष्ट्रीय ओळख असते. तेव्हा मराठी, तमिळ, पंजाबी, हिंदू, शीख, मुसलमान, ख्रिश्चन या दुय्यम ओळखी पुसून टाकल्या जात नाहीत, परंतु त्या राष्ट्रीय ओळखीपेक्षा गौण ठरतात. अमेरिकेत या सामाजिक-राजकीय व्यवस्थेला 'कोशिंबिरीचा वाडगा' (Salad Bowl) असे म्हणतात. प्रादेशिक, वांशिक, भाषिक, धार्मिक विविधता राष्ट्र मान्य करते आणि त्याचबरोबर एकीची भावना जतन, दृढ आणि बळकट करते. हेच राष्ट्रीय एकात्मता या संकल्पनेचे सार आहे.



**राष्ट्रीय एकात्मता**

### माहीत आहे का तुम्हांला ?

**Melting Pot आणि Salad Bowl**

अमेरिकी समाजाचे वर्णन करण्यासाठी Melting Pot ही संकल्पना वापरली जात होती. यामागची मूळ कल्पना अशी, की पूर्ण राष्ट्र हे एका मोठ्या घड्यासारखे आहे. अमेरिकेत प्रवेश करणारी व्यक्ती या मोठ्या घड्यामध्ये येते आणि कालांतराने अमेरिकी व्यवस्था आणि तेथील समाज यांच्याशी एकरूप होते. प्रत्येक व्यक्तीची सांस्कृतिक ओळख (इटालियन, फ्रेंच, जर्मन, आफ्रिकन, आशियाई इत्यादी) विरघळून जाते आणि एक नवीन अमेरिकी संस्कृती तयार होते. Salad Bowl ची संकल्पना मात्र या सांस्कृतिक एकत्रीकरणाला न मानता असे मानते, की प्रत्येकाची वेगळी संस्कृती जणू कोशिंबिरीतील वेगवेगळ्या घटकांसारखी आहे. जे कोशिंबिरीला वेगळी चव देतात; परंतु स्वतःचे वेगळे अस्तित्वही जपतात. कोशिंबिरीचा वाडगा हे वर्णन या वैविध्यपूर्ण संस्कृतीचे आणि बहुविध समाजाचे आहे.

**चर्चा करा.**

भारताचे वर्णन Melting Pot किंवा Salad Bowl कसे कराल ?

राष्ट्रीय एकात्मतेशी संबंधित समान मूल्ये खालीलप्रमाणे आहेत.

(i) समान नागरिकत्व

(ii) विविधतेतील एकता

(iii) राष्ट्राप्रती निष्ठा

(iv) भिन्न समुदायांबद्दल बंधुत्वाची भावना

(v) धर्मनिरपेक्षता

(vi) सामाजिक-आर्थिक व राजकीय न्याय

(vii) समानता

राष्ट्रीय एकात्मतेमध्ये राज्याची भूमिका कोणती? ही भूमिका खालील संदर्भानुसार समजून घेता येईल. राष्ट्रीय एकता साध्य करणे; राष्ट्रउभारणीच्या कार्यात सहभाग घेणे व ज्या मूल्यांसाठी राष्ट्र तयार झाले त्याला प्रोत्साहन देणे; समाजात शांतता आणि सलोखा राखणे; सामाजिक-राजकीय स्थैर्य देणे; आर्थिक प्रगतीस प्रोत्साहन देणे आणि नागरिकांचे अंतर्गत आणि परकीय आक्रमणांपासून संरक्षण करणे.

राष्ट्रीय एकात्मता साधण्याच्या प्रक्रियेमध्ये राज्य खालील भूमिका बजावते.

(i) सांस्कृतिक व सामाजिकदृष्ट्या भिन्न गटांना एकत्र आणून त्यांची एक राष्ट्रीय ओळख निर्माण करणे.

(ii) लहान-लहान प्रदेश अथवा राजकीय, सामाजिक वा सांस्कृतिक गटांवर एक राष्ट्रीय सत्ता प्रस्थापित करणे.

(iii) राज्य आणि जनता यांमध्ये सुसंवाद घडवून आणणे जेणेकरून लोकांची स्थिती व त्यांच्या इच्छा/आकांक्षा जाणून घेता येणे.

(iv) सामाजिक सुव्यवस्था राखण्यास मदत करतील अशी काही उद्‌दिष्टे व मूल्ये विकसित करणे.

नागरिक ज्या वेळी समान मूल्ये आणि प्राधान्यक्रम जपतात आणि परस्परांशी संवाद साधतात त्या वेळी राष्ट्र एकसंध राहते. नागरिकांमधील एकी आणि त्यांची कायदा व सुव्यवस्थेप्रतीची निष्ठा राष्ट्राला बळकट करते. राष्ट्रीय एकात्मता म्हणजे एकजिनसीपणा नव्हे. राष्ट्रीय एकता समुदायांच्या समुदायाचे (community of communities) समर्थन करते आणि त्यांच्यातील विविधतेचा सन्मान करते. परस्परांची मूल्ये, अनुभव व भौगोलिक सहसंबंध यांचा आदर करते. ही एक प्रकारची वांशिक, भाषिक आणि धार्मिक सहिष्णुता आहे. समाजातील शांततेसाठी टाकलेले हे एक पाऊल आहे. एका सुसंवादी आणि क्रियाशील समाजासाठी राष्ट्रीय एकता अत्यंत आवश्यक आहे. राष्ट्रीय एकता आणि सामाजिक स्थैर्य राष्ट्रउभारणीसाठी हातभार लावतात.

**भारत**

१९४७ साली भारत स्वतंत्र झाला तेव्हा भारतासमोर अनेक समस्या होत्या. उदा., आर्थिक मागासलेपण,

गरिबी, निरक्षरता, सामाजिक विषमता इत्यादी. स्वातंत्र्य चळवळीने भारतीयांसमोर काही मूल्ये व उद्‌दिष्टे ठेवली होती. तीच मूल्ये स्वातंत्र्यानंतर राष्ट्रउभारणीचा पाया ठरली. ती मूल्ये म्हणजे राष्ट्रवाद, धर्मनिरपेक्षता आणि लोकशाही. त्याचबरोबर काही उद्‌दिष्टे ठेवली. उदा., आर्थिक प्रगती आणि सामाजिक परिवर्तन. स्वातंत्र्यानंतर भारताची एकता जपणे आणि ती बळकट करणे हे महत्त्वाचे कार्य होते. भारतीयांमध्ये एकता आपोआप निर्माण होणार नव्हती तर भारतातील प्रादेशिक, वांशिक आणि भाषिक विविधता मान्य करून एकता वाढवण्यासाठी प्रयत्न करावे लागणार होते. ही समस्या राष्ट्रीय एकात्मतेशी आणि एक राजकीय समुदाय म्हणून भारतीय लोकांमध्ये एकता निर्माण करण्याशी संबंधित होती.

राष्ट्रीय एकात्मता प्रस्थापित करण्यासाठी आणि समाज परिवर्तनासाठी लोकशाही आवश्यक होती. सामाजिक बदल, लोकशाही व्यवस्था आणि आर्थिक प्रगती यांच्या साहाय्याने भारतातील गरिबी, जात आणि लिंगभेद दूर करता येतील असा विश्वास होता.

स्वातंत्र्यानंतर भारत या नवजात राष्ट्रात एकात्मता निर्माण करण्यासाठी जाणीवपूर्वक प्रयत्न करावे लागले. प्रथमतः संरचनात्मक अखंडत्व आणण्यासाठी संवैधानिक प्रक्रियेतून प्रयत्न करावे लागले. भारतीय संविधानाने केलेल्या महत्त्वाच्या तरतुदींमुळे राष्ट्रीय एकता आणि राष्ट्रीय अस्मिता निर्माण करणे शक्य झाले. दुसरे महत्त्वाचे होते ते मानसिक परिमाण. ज्यायोगे भारतीयांमध्ये राष्ट्रवादाची भावना निर्माण करणे हे एक आव्हान होते. १९व्या शतकाच्या उत्तरार्धात विविध प्रकारचे लोक एकाच राष्ट्रीय छत्राखाली येण्यास सुरुवात झाली. याच वेळेस वेगवेगळी ओळख असलेले लोक स्वतःची ‘भारतीय’ म्हणून ओळख निर्माण करू लागले. स्वातंत्र्य चळवळीच्या काळात हळूहळू भारतीय संस्कृती ही ‘भारत’ या राष्ट्रामध्ये परिवर्तित होण्यास सुरुवात झाली.

### संरचनात्मक परिमाण

संरचनात्मक दृष्टीने राष्ट्रीय एकता आणि प्रादेशिक अस्मिता यांमध्ये साधलेला समतोल खालील वैशिष्ट्यांमधून स्पष्ट होतो.

(i) सार्वत्रिक प्रौढ मातधिकारासहित लोकशाही व्यवस्था निर्माण करून राष्ट्र बळकट करणे हे संरचनात्मक दृष्टीने महत्त्वाचे होते. लोकशाही आणि राष्ट्रीय एकीकरण हे एकमेकांना पूरक होते. विविध गटांचा शासनामधील सहभाग प्रातिनिधिक लोकशाहीमुळे शक्य झाला.

(ii) संविधानाने प्रबल केंद्रशासनासहित संघराज्य व्यवस्था स्वीकारली. त्यामुळे प्रादेशिक गरजा आणि राष्ट्रीय गरजा यांमध्ये समतोल साधता आला. १९९० च्या दशकात केलेल्या घटनादुरुस्तीमुळे (७३ व ७४ वी घटनादुरुस्ती) पंचायत व्यवस्थेतून स्थानिक शासन संस्थांचा सहभाग अधिक वाढला.

(iii) सांस्कृतिक ओळख निर्माण करण्यात भाषेला महत्त्वाचे स्थान आहे. भारतीय संविधानाने प्रादेशिक भाषांना अधिकृत भाषांची मान्यता दिली आणि भारतात भाषावार प्रांतरचना करण्यात आली.

(iv) प्रशासकीय पातळीवर भारतीय प्रशासकीय सेवा (IAS, IPS, IFS, IRS इत्यादी) अस्तित्वात आल्या. यातून एक केंद्रीय प्रशासकीय व्यवस्था निर्माण झाली. त्याचप्रमाणे राज्यस्तरावर राज्य प्रशासकीय सेवा अस्तित्वात आल्या.

(v) १९६१ साली पहिली राष्ट्रीय एकात्मता परिषद घेण्यात आली. यामध्ये जमातवाद, जातीवाद, प्रादेशिकवाद, भाषावाद यांसारख्या संकुचित प्रवृत्तींशी लढण्यासाठी मार्ग शोधून देशाला प्रगतीच्या वाटेवर चालण्यासाठी तयार करण्यावर विचार झाला. यावेळी राष्ट्रीय एकात्मतेशी निगडित विषयांचा आढावा घेऊन त्यासंबंधी शिफारस करण्यासाठी ‘राष्ट्रीय एकात्मता परिषद’ स्थापन करण्याचे ठरले.

(vi) भारतीय संविधानामध्ये भारतीयांसाठी काही मूलभूत कर्तव्यांचा समावेश करण्यात आला.

**शोधा पाहू.**

भारतीय संविधानातील मूलभूत कर्तव्ये कोणती?

**माहीत आहे का तुम्हांला ?**

**राष्ट्रीय एकात्मता परिषद (१९६२) :** राष्ट्रीय एकात्मतेशी निगडित सर्व विषयांचा आढावा घेण्यासाठी या परिषदेची स्थापना झाली. १९६२ मध्ये त्याची पहिली सभा घेतली गेली.

**राष्ट्रीय एकात्मता परिषदेची उद्दिष्टे :** समान नागरिकत्व, विविधतेत एकता, धार्मिक स्वातंत्र्य, धर्मनिरपेक्षता, समानता, सामाजिक-आर्थिक आणि राजकीय न्याय, बंधुत्व ही आपल्या देशाची बलस्थाने आहेत. राष्ट्रीय एकात्मता परिषद या सर्व मूल्यांवर दृढ विश्वास ठेवून ती मूल्ये साध्य करण्यासाठी प्रयत्न करते.

**माहीत आहे का तुम्हांला ?**

डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी भारताच्या संदर्भात लोकशाही आणि संविधानाचे महत्त्व याबाबत पुढील मत व्यक्त केले : सामाजिक आणि आर्थिक उद्दिष्टे साध्य करण्यासाठी आपण संवैधानिक मार्गाचा वापर करावा व रक्तरंजित क्रांतीच्या मार्गाचा त्याग करावा.

## मानसिक परिमाण

भारत हा असा भौगोलिक आणि आर्थिक भूप्रदेश आहे की जिथे विविधतेमध्ये एकसमान संस्कृती आहे आणि ही समान संस्कृतीच सर्व लोकांना एकत्र बांधून ठेवते.

भारतीय लोकांना राजकीय आणि भावनिकदृष्ट्या एकत्र आणून एक राष्ट्र निर्माण करून त्यांच्यामध्ये राजकीय ओळख व राष्ट्रनिष्ठा निर्माण करण्याचे महत्त्वाचे काम स्वातंत्र्य चळवळीने केले.

भावनिक अथवा मानसिक एकात्मता, राष्ट्रगान, राष्ट्रध्वज, राष्ट्रगीत, राष्ट्रीय चिन्ह, राष्ट्रीय पक्षी, राष्ट्रीय प्राणी इत्यादी प्रतीकांतून प्रदर्शित होते.

**हे करून पहा.**

जवाहरलाल नेहरू यांच्या ***Discovery of India*** या पुस्तकातील भारताचा शोध या तिसऱ्या प्रकरणातील 'भारतमाता' हा भाग वाचा व त्यावर चर्चा करा.

**माहीत आहे का तुम्हांला ?**

संस्कृतीच्या प्रारंभापासून भारतीय लोकांच्या मनात एकतेचे एक स्वप्न होते. बाह्य दबाव, परकीय मानके आणि परकीय श्रद्धा यांच्या दबावातून हे ऐक्य निर्माण झालेले नव्हते. हे ऐक्य आपल्या संस्कृतीत खोलवर रुजलेल्या श्रद्धा आणि सहिष्णुतेची परंपरा यांमुळे सर्व वैविध्यांना असलेली मान्यता आणि प्रोत्साहन यामुळे निर्माण झाले होते.

– **जवाहरलाल नेहरू यांचे** Discovery of India

## आव्हाने

स्वातंत्र्यानंतर सर्वांत पहिले आव्हान होते ते म्हणजे सर्व संस्थानांचे भारतीय संघराज्यात विलीनीकरण करून घेणे. जम्मू-काश्मीर, हैदराबाद आणि जुनागढ या संस्थानांबाबत काही समस्या होत्या, परंतु त्या सोडवल्या गेल्या. १९४७-४८ मध्ये जम्मू-काश्मीरच्या संदर्भात प्रथमच पाकिस्तानशी संघर्ष झाला आणि तेव्हापासून जम्मू-काश्मीरमध्ये स्थैर्य आणि शांतता राखणे हे एक आव्हान आहे. ईशान्य भारतात नागालँडमध्ये समस्या निर्माण झाली परंतु तीही सोडवली गेली. पोर्तुगीज आणि फ्रेंच वसाहतींचे प्रदेश कालांतराने भारतीय संघराज्यात सामील झाले.

भारताने संविधानाच्या चौकटीत राहून धोरणे ठरवली व राजकीय, सामाजिक आणि सांस्कृतिक प्रगती साध्य केली. भारतीय संविधानाने भारतातील प्रादेशिक आणि भाषिक विविधतेला मान्यता दिली व लोककल्याणाच्या

तरतुदी समाविष्ट करून समाज परिवर्तनाची गरज असल्याचे मान्य केले. आर्थिक क्षेत्रात उद्योगांसाठी संमिश्र अर्थव्यवस्था स्वीकारून आर्थिक प्रगतीच्या मार्गात शासनाचा सहभाग अधोरेखित केला. पंचवार्षिक योजना तयार करून भारतीय अर्थव्यवस्थेला दिशानिर्देशन करण्याच्या कार्यासाठी नियोजन आयोगाची निर्मिती केली गेली. भारताच्या नियोजनाचे उद्‌दिष्ट हे आर्थिक विकास, रोजगाराच्या संधी वाढवणे आणि दारिद्र्य निर्मूलन करणे हे होते. आज नियोजन आयोगाची जागा नीति आयोगाने घेतली आहे.

१९६० च्या दशकात नवीन आव्हाने उभी राहिली. नेहरू युगाच्या नंतर लालबहादूर शास्त्री आणि नंतर श्रीमती इंदिरा गांधी यांनी प्रधानमंत्रीपद स्वीकारले. या दशकात राजकीय वर्तुळात प्रादेशिक पक्षांचा उदय झाला. १९६० च्या दशकात नक्षलवादी चळवळीला सुरुवात झाली. ही चळवळ १९६० च्या दशकात फोफावली व १९७० च्या दशकाच्या सुरुवातीला कमी झाली. परंतु १९८० च्या दशकात ती परत हिंसक स्वरूपात पुढे आली. ही चळवळ भारतासमोरील सर्वांत मोठे आव्हान ठरले.

ईशान्य भारतातील ८ राज्ये सांस्कृतिक आणि वांशिकदृष्ट्या भिन्न आहेत. तेथे २०० पेक्षा जास्त वांशिक गट आहेत. त्यांच्या वेगवेगळ्या भाषा, बोलीभाषा आणि वेगळी सांस्कृतिक ओळख आहे. तेथे शांतता आणि स्थैर्य राखणे आणि आर्थिक आणि औद्योगिक प्रगती साध्य करणे हे भारतीय राज्यव्यवस्थेसमोरील एक मोठे आव्हान आहे. नागालँड हे भारतीय स्वातंत्र्यापासूनच संघर्ष करणारे राज्य आहे, तर मणिपूर, मिझोरम, मेघालय आणि त्रिपुरामध्ये १९६० च्या दशकापासून बंडखोरी कारवायांचा सामना करावा लागत आहे. आसाममध्ये प्रादेशिक विकासाची कमतरता (lack of development) आणि आसाममधील संसाधनांचा इतरत्र केलेला वापर ही मोठी समस्या होती. आसाममधील तेलाची केलेली कोंडी (१९८०) (Assam Oil blockade) हे पहिले आंदोलन होते, ज्यायोगे प्रादेशिक विकासाची मागणी पुढे आली. त्यानंतर झारखंडमध्येही अशीच आंदोलने झाली.

१९७० च्या दशकात जेव्हा आणीबाणी जाहीर झाली तेव्हा भारतीय लोकशाही शासन व्यवस्था काही काळासाठी स्थगित करण्यात आली. १९६० च्या उत्तरार्धात पूर्व पाकिस्तानातून निर्वासितांचे लोंढे भारतात येण्यास सुरुवात झाली. त्यात १९७० मध्ये वाढ झाली आणि त्यातून उद्‌भवलेल्या संघर्षातून बांगलादेश या नवीन राज्याची निर्मिती झाली. पंजाबमधून केलेल्या खलिस्तानच्या मागणीने आणखी एक मोठे संकट उभे राहिले. या फुटिरतावादी आंदोलनाविरुद्‌ध बळाचा वापर करणे शासनाला भाग पडले. पंजाबमधील आंदोलनाविरुद्‌ध केलेल्या बळाच्या वापराचा थेट परिणाम म्हणजे प्रधानमंत्री श्रीमती इंदिरा गांधी यांची झालेली हत्या होय. अशीच दुसरी राजकीय हत्या झाली ती प्रधानमंत्री राजीव गांधी यांची. श्रीलंकेतील तमिळ प्रश्नावर, लिबरेशन टायगर्स ऑफ तमिळ इलम (LTTE) यांच्याविरुद्‌ध घेतलेल्या भूमिकेचा परिणाम म्हणजे आत्मघाती हल्ल्यात त्यांची हत्या झाली. १९८० च्या दशकात धार्मिक संघर्ष वाढीस लागला. बाबरी मशिद घटना (१९९२) आणि मुंबई दंगलीतून (१९९३) उमटलेल्या प्रतिक्रियेने भारतातील आक्रमकतेला (militancy) नवीन परिमाण दिले.

१९८० च्या दशकाच्या शेवटी आणि १९९० च्या दशकात जम्मू-काश्मीरमधील समस्या पुन्हा एकदा समोर आली. 'आझादी'च्या चळवळीसाठी काश्मीर खोऱ्यात दहशतवादाने डोके वर काढले. या आंदोलनात सशस्त्र आक्रमकतेचे नवीन स्वरूप दिसून आले. राज्यकेंद्रित दहशतवादापुरते ते मर्यादित न राहता त्याचे आधुनिक अमूर्त दहशतवादी संघर्षामध्ये रूपांतर झाले. १९९० च्या दशकात भारतात आर्थिक स्थित्यंतर झाले. भारताने समाजवादी आर्थिक विकासाचा मार्ग सोडून आर्थिक उदारीकरण स्वीकारले. भारताच्या आर्थिक विकासाची समस्या सोडवण्यासाठी हा नवीन दृष्टिकोन स्वीकारण्यात आला. याचा आर्थिक लाभ झाला आणि यामुळेच स्थिर आणि उच्च आर्थिक प्रगतीचा भक्कम पाया घातला गेला.

**शोधा आणि त्यावर चर्चा करा.**

खालील घटनांचा तपशील मिळवा आणि त्यावर वर्गामध्ये चर्चा करा.

(१) आसाममधील तेलकोंडी (१९८०)

(२) राजीव गांधी यांची हत्या (१९९१)

गेल्या दशकभरापेक्षा जास्त काळापासून भारतातील स्थैर्य आणि शांततेसमोर अनेक आव्हाने उभी राहिली आहेत. ही आव्हाने प्रामुख्याने आर्थिक विकास, सामाजिक आणि सांस्कृतिक समस्या या क्षेत्रांतील आहेत. जातीय आणि धार्मिक अस्थैर्य, प्रादेशिक वादाबाबत टोकाची भूमिका, आर्थिक असमतोल इत्यादी आव्हानेदेखील भारतासमोर आहेत.

भारताच्या सामाजिक, आर्थिक प्रगतीच्या आड येणाऱ्या, स्थैर्य आणि शांततेच्या प्रश्नांशी निगडित काही गोष्टी या प्रकरणात आपण पाहणार आहोत. हे प्रश्न राष्ट्रनिर्मिती आणि राष्ट्रीय एकात्मतेच्या प्रक्रियेतही आव्हाने निर्माण करतात. उदा., (१) जम्मू-काश्मीरमधील सीमापार दहशतवाद (२) काही प्रदेशात डाव्या उग्रवाद्यांच्या अतिरेकी कारवाया (३) दहशतवाद.

## जम्मू-काश्मीरमधील सीमापार दहशतवाद

भारतीय स्वातंत्र्याच्या कायद्यानुसार (Indian Independence Act, 1947) संस्थानांना भारतात किंवा पाकिस्तानात सामील होण्याचा निर्णय घ्यावयाचा होता. जम्मू-काश्मीर पाकिस्तानात सामील करण्यासाठी तेथील महाराजा हरिसिंग यांच्यावर दबाव टाकण्याकरता, पाकिस्तानी लष्कराच्या मदतीने टोळीवाले काश्मीरमध्ये पाठवण्यात आले आणि तिथूनच जम्मू-काश्मीरमधील समस्येला सुरुवात झाली. हरिसिंग यांनी भारतात सामील होण्याच्या करारावर सही केली आणि जम्मू-काश्मीर भारतात सामील झाले. मग भारताने काश्मीरच्या संरक्षणाकरता आपले सैन्य पाठवले. यातूनच १९४७-४८ मध्ये पहिले भारत-पाक युद्ध झाले. जम्मू-काश्मीरमधील नागरिकांना भारताविरुद्ध भडकवण्याच्या उद्देशाने १९६५ मध्ये पाकिस्तानने घुसखोर पाठवले. १९६५ मध्ये पाकिस्तानने भारतावर प्रत्यक्ष आक्रमण केले तेव्हा स्थानिकांनी त्यांना सहकार्य केले नाही.

१९६५ मध्ये अमानुल्ला खान यांनी पाकव्याप्त काश्मीरमध्ये Plebiscite Front ची स्थापना केली. या आघाडीचा एक अनधिकृत लष्करी गट नॅशनल लिबरेशन फ्रंटने जम्मू-काश्मीरमध्ये घातपाती कारवाया घडवून आणल्या. १९७७ मध्ये या Plebiscite Front ला जम्मू-काश्मीर लिबरेशन फ्रंट (Jammu-Kashmir Liberation Front) असे नवीन नाव देण्यात आले. १९८९ मध्ये नॅशनल कॉन्फरन्सच्या कार्यकर्त्याची हत्या करण्यात आली आणि JKLF ने तत्कालीन गृहमंत्र्यांच्या कन्या रुबिया सैद यांचे अपहरण केले. जम्मू-काश्मीरच्या स्वातंत्र्याची मागणी ही JKLF ची प्रमुख मागणी होती.

काश्मीरमधील पाकिस्तानवादी गनिमी गटांना मदत करण्यासाठी पाकिस्तानने हिज्बूल मुजाहिद्दींना तेथे पाठवण्याचा निर्णय घेतला. काश्मीर खोऱ्यात, पाकिस्तानातून आलेल्या Pan-Islamist लढवय्यांच्या प्रवेशाने तेथील बंडखोरीचे स्वरूप पालटले. वाढलेल्या इस्लामी आक्रमतेमुळे १९९० च्या दशकात काश्मिरी पंडितांवर जो अत्याचार झाला त्यामुळे काश्मिरी पंडितांनी काश्मीरमधून स्थलांतर केले.

भारत-पाक संबंधांमध्ये सीमापार दहशतवाद हा नेहमीच सर्वांत महत्त्वाचा मुद्दा राहिला आहे. सीमेपलीकडून होणारी घुसखोरी ही जम्मू-काश्मीरमधील हिंसाचाराला जबाबदार आहे असे शासनाचे म्हणणे आहे. २०१६-१७ च्या गृहमंत्रालयाच्या वार्षिक अहवालानुसार गेल्या पंचवीसपेक्षा जास्त वर्षांमध्ये काश्मीरमधील फुटीरतावादी हिंसाचार आणि दहशतवादाला सीमेपलीकडून मदत पुरवली जाते. यात असेही म्हटले आहे की समाज माध्यमे व विशिष्ट गटांचा वापर करून लोकांमध्ये मूलगामी विचार रुजवण्याचे प्रयत्न पाकिस्तानने केले आहे. जम्मू-काश्मीरमध्ये सातत्याने अस्थिरता निर्माण करण्यासाठी हुरियतसारख्या विभाजनवादी गटांना सीमेपलीकडून राजकीय मदत पुरवली जाते. या संघर्षात दगडफेकीसाठी मुलांचा केलेला वापर व शाळांची केलेली जाळपोळ या अस्वस्थ करणाऱ्या घटना आहेत.



काश्मीरमधील शाळांची जाळपोळ



काश्मीरमधील दगडफेक करणारी मुले


**शासनाने लोकसभेत दिलेली माहिती :**

पाकव्याप्त काश्मीर किंवा पाकिस्तानात दहशतवाद्यांनी निर्माण केलेल्या तयारीचा फायदा घेऊन घुसखोर जम्मू-काश्मीरसहित भारतात दहशतवादी हल्ले करतात.

संयुक्त राष्ट्रांच्या सुरक्षा परिषदेतील संबंधात तरतूद ठराव क्र. १२६७ मध्ये पाकिस्तानातील हाफीज सईद आणि झाकीर-उर-रहमान लकवी यांसारख्या व्यक्ती अथवा लष्कर-ए-तोयबा, जमात-उद-दावा यांसारख्या संघटनांची यादी दिली आहे. त्याचा योग्य पाठपुरावा शासनाने केला आहे.

भारतविरोधी दहशतवादाचा मुद्दा आंतरराष्ट्रीय समुदायासमोर आणि पाकिस्तानशी द्विपक्षीय चर्चेत अनेकदा मांडला आहे.

(राज्यमंत्री, परराष्ट्र व्यवहार खाते, प्रश्न क्र.२०४१, पाकपुरस्कृत दहशतवाद, मार्च ९, २०१६, लोकसभा)




**चर्चा करा.**

ऑगस्ट २०१९ मध्ये जम्मू-काश्मीर संदर्भात भारताच्या संविधानातील कलम ३७० नुसार जम्मू-काश्मीर राज्याला असलेला विशेष दर्जा रद्द केला गेला. जम्मू-काश्मीरचे दोन केंद्रशासित प्रदेश म्हणून विभाग केले गेले :

(i) जम्मू-काश्मीर (ज्याला विधिमंडळ असेल)

(ii) लडाख (ज्याला विधिमंडळ नाही).

### काही प्रदेशांतील डाव्यांचा उग्रवाद

नक्षलवादी चळवळ जी माओवादी चळवळ अथवा डाव्यांची उग्रवादी चळवळ म्हणूनही ओळखली जाते तिला शेतमजूर, दलित आणि आदिवासी लोकांचे समर्थन आहे. ती चळवळ शहरी भागात विशेषतः कामगार वर्गात पसरली आहे. जिथे अन्याय, शोषण, दमन आणि राज्याकडून दुर्लक्षिले गेल्याची भावना असते, तेथे ही चळवळ यशस्वी होते.

नक्षलवादी चळवळीची मुळे तेलंगणा चळवळीत (१९४६-५१) सापडतात. तेथील शेतकऱ्यांच्या सरंजामशाही विरुद्धच्या चळवळीला प्रथमच भारतीय कम्युनिस्टांनी पाठिंबा दिला होता. सुरुवातीला या चळवळीला यश आले. परंतु भारत सरकारने जमीन सुधारणांसाठी योजलेल्या कार्यक्रमांमुळे या चळवळीचा जोर कमी झाला. १९६७ मध्ये भारतातील सरंजामशाही पद्धतीच्या विरोधात पश्चिम बंगालमधील नक्षलबारी येथे आंदोलन करण्यात आले. त्या चळवळीची वैचारिक बैठक ही मार्क्स-लेनिन-माओ यांच्या विचारसरणीवर आधारित असलेल्या चारू मुजुमदार यांच्या लिखाणात सापडते. शासनाने या चळवळीविरुद्ध उचललेली पावले आणि मुजुमदार यांच्या अटकेनंतर १९७० च्या दशकात या चळवळीचा जोर कमी झाला. पुढे १९८० च्या दशकात ही चळवळ उग्रवादी स्वरूपात पुन्हा उदयाला आलेली दिसते.

२००४ मध्ये वेगवेगळे नक्षलवादी गट, कम्युनिस्ट पार्टी ऑफ इंडिया (मार्क्स-लेनिनवादी) आणि इतर गट एकत्रित येऊन कम्युनिस्ट पार्टी ऑफ इंडिया (माओवादी) CPI (Maoist) स्थापन केली. मार्क्स-लेनिन-माओ यांच्या वैचारिक बैठकीच्या आधारे एकत्रित येऊन कम्युनिस्ट पार्टी ऑफ इंडिया (माओवादी) ही राजकीय पक्षाची संघटना म्हणून पुढे आली आहे.

गृहमंत्रालयाच्या निरिक्षणानुसार जहालवादी डावे गट रेल्वे, रस्ते, वीज आणि दूरसंचार यांसारख्या पायाभूत विकास कामांमध्ये दहशतीच्या वा हिंसक मार्गाने अडथळे आणतात जेणेकरून शासनाच्या योजना या भागात कशा कुचकामी ठरतात याचा प्रचार ते करू शकतात. सामान्यतः जंगले अथवा दुर्गम प्रदेशात दळणवळणाची साधने नसतात. त्यामुळे तिथे सक्षम सुरक्षा व्यवस्था पोहचू शकत नाही आणि याच भागात नक्षलींचा वावर अधिक असतो.

**डाव्यांचा उग्रवाद म्हणजे काय?**

२००४ साली People's War (PW) ही आंध्रप्रदेशातील संघटना आणि भारतीय माओवादी केंद्र (MCCI) या बिहार आणि परिसरात वावर असणाऱ्या संघटना एकत्र आल्या आणि त्यांनी CPI (Maoist) माओवादी पक्ष स्थापन केला. हा पक्ष डावा उग्रवादी पक्ष आहे. या पक्षाचा समावेश बेकायदा कारवाई प्रतिबंध कायदा, १९६७ च्या तरतुदीनुसार (Unlawful Activities (Prevention) Act 1967) दहशतवादी संघटनेत केला आहे. CPI च्या माओवादी विचारसरणीचा वापर सशस्त्र बंडाने शासन उलथवून टाकण्यासाठी केला जातो.



नक्षलवादी हल्ला, गडचिरोली

त्यांचे काही व्यापक डावपेच खालीलप्रमाणे :

(१) प्रचारकी घोषणांचा वापर (२) जनचळवळींची उभारणी (३) महिला, आदिवासी आणि अल्पसंख्याकांना या क्रांतिकारी चळवळीकडे वळवणे. (४) जनतेच्या प्रश्नांवर शहरी भागातील लोकांचे लक्ष वेधणे. (५) सैनिकी संघटनांचा विकास करणे.

संयुक्त राष्ट्राच्या अहवालानुसार नक्षलवादी आणि तत्सम संघटना या ६ वर्षांच्या मुलांनादेखील त्यांच्या सैनिकी गटात सामील करून घेतात. मुलांना बालगटात (बालदस्ता) सामील होण्यासाठी बळजबरी केली जाते. या मुलांचा वापर टपाल वा माल पोहचवणे, माहिती काढणे, स्फोटके पेरणे इत्यादींसाठी केला जातो. लहान मुलांचे विशेषतः मुलींचे अपहरण केले जाते. या गोष्टींची गंभीर दखल या अहवालात घेतली आहे.

### दहशतवाद

दहशतवाद म्हणजे समाजात भीती निर्माण करण्यासाठी हिंसाचाराचा केलेला वापर होय. दहशतवाद हा जाणीवपूर्वक, राजकीय हेतूने प्रेरित नागरी भागात केलेला हल्ला होय. या नागरी लक्ष्यांना soft targets असे म्हणतात. बस, रेल्वे, बसस्थानके, विमानतळ, सिनेमागृह, मॉल, बाजार इत्यादींवर हल्ला करण्याचे डावपेच यात वापरले जातात. याचा मुख्य उद्देश लोकांमध्ये दहशत निर्माण करणे हा असतो.

दहशतवाद हा युद्धाचा एक प्रकार आहे. याला 'असमनित'(asymmetric) युद्ध तंत्र असे म्हणतात. कारण या युद्धतंत्रात हल्ला करण्याची वा हिंसाचाराची निश्चित अशी एक पद्धत नसते. पारंपरिक प्रकारात दहशतवाद हा राज्यकेंद्रित होता. तसाच तो राज्याच्या विरोधात होता. काही विशिष्ट लोक त्यांच्या हक्कांसाठी राज्याविरोधात लढत असत. उदा., LTTE ही तमिळवाद्यांची संघटना श्रीलंकेतील तमिळ लोकांच्या हक्कासाठी लढत होती. आयरिश प्रजासत्ताक आर्मी (IRA) ही आयरिश लोकांच्या हक्कासाठी लढत होती. स्पेनमधील सरकारच्या विरोधात Basque Fatherland and Liberty या फुटीरतावादी गटाने हक्कांसाठी संघर्ष केला.

आधुनिक दहशतवाद हा केवळ राज्याच्याच विरोधात नसतो. आधुनिक दहशतवादी हे एखाद्या अमूर्त विचारसरणी अथवा ध्येयासाठी लढतात. हे ध्येय धार्मिकही असू शकते. ते सामान्यतः एखाद्या आंतरराष्ट्रीय संघटनेचे सदस्य असतात. न्यूयॉर्क शहरावर ११ सप्टेंबर २००१ (९/११ म्हणून प्रसिद्ध) रोजी झालेला हल्ला ही आधुनिक दहशतवादाची सुरुवात समजली जाते. नायजेरियातील 'बोकोहराम' आणि 'अफगाणिस्तानातील तालिबान' ही अशा गटांची उदाहरणे आहेत.

#### भारतातील काही दहशतवादी हल्ले

- १२ मार्च १९९३ रोजी एकाच दिवशी मुंबईमध्ये १२ ठिकाणी एकामागोमाग बॉम्बस्फोट झाले ज्यात ७१७ लोक जखमी झाले आणि २५७ लोकांचा मृत्यू झाला. हे स्फोट प्रामुख्याने व्यापारी ठिकाणे आणि मुंबईतील महत्त्वाची केंद्रे जसे, एअर इंडिया इमारत, शेअर बाजार, सीरॉक हॉटेल, जुहू सेंटॉर हॉटेल, एअरपोर्ट सेंटॉर हॉटेल, प्लाझा सिनेमा इत्यादी. याशिवाय माहिमच्या हिंदू मच्छीमार वसाहत व सहार विमानतळ येथे हातबॉम्ब फेकण्यात आले.
- १४ फेब्रुवारी १९९८ रोजी कोईम्बतूर शहरात ११ ठिकाणी बॉम्बस्फोट झाले ज्यात २०० जण जखमी तर ५८ जण मृत्यू पावले.
- १३ डिसेंबर २००१ रोजी जैश-ए-मोहम्मद आणि लष्कर-ए-तोयबाच्या ५ दहशतवाद्यांनी भारतीय संसदेवर हल्ला केला.
- २४ सप्टेंबर २००४ रोजी गुजरातमधील गांधीनगर येथील अक्षरधाम मंदिर परिसरात दोन दहशतवाद्यांनी हल्ला केला. यात ८० जण जखमी झाले तर ३० जणांचा मृत्यू झाला.
- ११ जुलै २००६ रोजी मुंबई येथील लोकल ट्रेनमध्ये ११ मिनिटांत ७ ठिकाणी गर्दीच्या वेळी बॉम्बस्फोट झाले. पश्चिम रेल्वेच्या डब्यात कुकरमध्ये हे बॉम्ब ठेवण्यात आले होते. यात ७०० जण जखमी तर २०९ लोक मृत्यू पावले.

- ८ फेब्रुवारी २००७ रोजी दिल्ली ते लाहोर या दरम्यान आठवड्यातून दोनदा धावणाऱ्या समझौता एक्सप्रेसमध्ये बॉम्बस्फोट झाला. यात अनेकजण जखमी झाले तर ६८ लोकांचा मृत्यू झाला.
- २६ नोव्हेंबर २००८ रोजी मुंबईत दहशतवादी हल्ल्यांची मालिका झाली. छत्रपती शिवाजी महाराज रेल्वे टर्मिनस, ओबेरॉय ट्रायडंट आणि ताज पॅलेस हॉटेल, लिओपोल्ड कॅफे, कामा इस्पितळ, नरिमन हाउस, मेट्रो सिनेमा आणि इतर काही ठिकाणी हल्ले झाले. हे हल्ले लष्कर-ए-तोयबा या पाकिस्तानातील संघटनेने घडवून आणले.
- १८ सप्टेंबर २०१६ रोजी काश्मीरमधील उरी येथे जैश-ए-मोहम्मद या संघटनेने लष्करावर हल्ला केला.
- १४ फेब्रुवारी २०१९ रोजी जम्मू-काश्मीरमधील पुलवामा जिल्ह्यात केंद्रीय सुरक्षा दलाच्या (CRPF) वाहनांच्या ताफ्यावर आत्मघातकी हल्ला करण्यात आला.
- १ मे २०१९ रोजी गडचिरोली येथे पोलिसांवर भूसुरूंगाने हल्ला झाला. यात १५ पोलीस शहीद झाले. नक्षलवाद्यांनी हा हल्ला केला असा पोलिसांचा आरोप आहे.





मुंबई येथील दहशतवादी हल्ले : जुलै २००६, नोव्हेंबर २००८

## राज्याची भूमिका

प्रगतीसाठी शांतता, स्थैर्य आणि नागरी सुव्यवस्था यांची नितांत गरज असते. अनियंत्रित समाज हा आर्थिक अरिष्टाला कारणीभूत असतो. नागरिकांच्या जीवनमानाचा दर्जा हा प्रामुख्याने सुव्यवस्थेवर अवलंबून असतो. संघर्ष निवारण आणि सुव्यवस्था राखणे यामध्ये अतूट संबंध आहे. जर संघर्ष योग्यरीत्या हाताळले गेले तर शांतता, सुव्यवस्था आणि स्थैर्याला धक्का कमीत कमी पोहचतो.

शांतता, स्थैर्य आणि राष्ट्रीय एकात्मता यांमधील राज्याची भूमिका खालील चौकटीवरून समजून घ्या. यातील पहिली पायरी ही भारतीय संविधानाने निश्चित केलेल्या उद्दिष्टांची आहे. दुसरी पायरी ही समस्येच्या सुरुवातीच्या स्तरांवर राज्याची भूमिका दर्शवते आणि तिसऱ्या पायरीवर समस्येच्या गंभीर स्वरूपाला राज्याला तोंड द्यावे लागते.

**राज्याची भूमिका**

**पहिली पायरी :** प्रतिनिधित्वाच्या घटनात्मक यंत्रणेचा वापर करून राज्याने राजकीय स्थैर्य देणे. सर्व प्रदेशांच्या एकात्म आणि सर्वांगीण प्रगतीतून आर्थिक भरभराट साधणे, लोककल्याणाच्या माध्यमातून सामाजिक, सांस्कृतिक विकास साधणे, ही सर्व मूल्ये व ध्येये भारतीय संविधानात नमूद केली आहेत.

**दुसरी पायरी :** (या स्तरावर समस्यांची सुरुवात होते. उदा., एखाद्या प्रदेशाने भाषा अथवा वांशिक आधारावर केलेली राज्याची मागणी, आर्थिक निर्णयांच्या विकेंद्रीकरणाची मागणी, आरक्षणाची मागणी) या ठिकाणी राज्याने परिषदा, प्रतिनिधी मंडळे इत्यादींच्या माध्यमातून अधिक प्रतिनिधित्व देऊन मागणीची तीव्रता कमी करावी, मागास भागांमध्ये उद्योगनिर्मिती करावी, रोजगार निर्मितीच्या योजना सुरू कराव्यात, ग्रामीण भागात खासगी उद्योगांना आणि Public-Private Partnership ला प्रोत्साहन द्यावे.

**तिसरी पायरी :** (ज्या वेळी समस्या हिंसक स्वरूप घेते. उदा., गोरखाभूमीचे आंदोलन, झारखंडचे आंदोलन इत्यादी)

राज्याने संघर्षाचे व्यवस्थापन आणि निराकरण करावे. हे करताना गरजेनुसार बळाचा वापर करावा (पोलीस अथवा लष्कर), विकास मंडळे स्थापन करावीत, केंद्रसरकारने मदत द्यावी, प्रादेशिक स्वायत्तता देण्यासाठी स्वायत्त मंडळे स्थापन करावी इत्यादी.

पुढील पाठात आपण समकालीन भारताच्या संदर्भात आणखी एका विषयाची माहिती घेणार आहोत. हा विषय म्हणजे नागरिक केंद्रित प्रशासन ही संकल्पना जी सुशासनाचा एक भाग आहे.

**See the following website for additional information:**

1. Second Administrative Reforms Commission Reports:
   5th Report: Public Order
   8th Report: Combating Terrorism – Protecting by Righteousness.
   https://darpg.gov.in/arc-reports
2. Background Note on National Integration Council
   https://mha.gov.in/sites/default/files/NICBackG-171013.pdf
   https://www.niti.gov.in/writereaddata/files/India%20VNR_Final.pdf

## स्वाध्याय

**प्र.१ (अ) दिलेल्या पर्यायांपैकी योग्य पर्याय निवडून विधान पूर्ण करा.**

(१) विविधतेत एकता हे महत्वपूर्ण भारतीय मूल्य याच्याशी निगडित आहे –
(अ) पंचायती राज
(ब) राष्ट्रीय एकात्मता
(क) राष्ट्र ही संकल्पना
(ड) Melting pot ही संकल्पना

(२) चारू मुजुमदार यांच्याशी निगडित आहेत–
(अ) JKLF (ब) नक्षलवादी चळवळ
(क) हिजबुल मुजाहिद्दीन
(ड) आसाम तेल कोंडी

(ब) चुकीची जोडी दुरुस्त करून लिहा.

१. (i) जवाहरलाल नेहरू – Discovery of India
(ii) तमिळ लोकांच्या हक्कांसाठी लढा – LTTE
(iii) राष्ट्रीय एकात्मता परिषद – कलम ३७०


प्र.२ (अ) गटात न बसणारा शब्द ओळखा.

दहशतवाद, नक्षलवाद, राष्ट्रवाद, उग्रवाद

(ब) दिलेल्या विधानांसाठी समर्पक संकल्पना लिहा.

(१) समाजात भीती / घबराट / धास्ती निर्माण करण्यासाठी हिंसाचाराचा केलेला वापर –
(२) लोकांचा राज्याच्या निर्णय प्रक्रियेतील सहभाग –

प्र.३ (अ) संकल्पना चित्र पूर्ण करा.




(ब) खालील विधाने चूक की बरोबर सकारण स्पष्ट करा.

(१) राष्ट्रीय एकात्मता प्रस्थापित करण्यासाठी आणि समाज परिवर्तनासाठी लोकशाही आवश्यक आहे.
(२) भारतीय स्वातंत्र्य चळवळ राष्ट्रीय एकात्मतेस पोषक ठरली.

प्र.४ सहसंबंध स्पष्ट करा.

राष्ट्रीय एकता आणि प्रादेशिक अस्मिता

प्र.५ तुमचे मत नोंदवा.

शांतता, स्थैर्य यांची राष्ट्राच्या प्रगतीसाठी गरज असते.

प्र.६ पुढील प्रश्नांची उत्तरे लिहा.

(१) भारतातील डाव्यांचा उग्रवाद म्हणजे काय?
(२) जम्मू-काश्मीरमधील सीमापार दहशतवाद स्पष्ट करा.

उपक्रम

भारतीय संविधानातील कलम ३७० मध्ये झालेल्या बदलांची माहिती गोळा करा.

# ५. समकालीन भारत : सुशासन

या प्रकरणात आपण जागतिकीकरणाच्या बदलत्या काळात लोकप्रशासनाच्या बदलत्या स्वरूपाशी संबंधित सुशासन आणि नागरिक केंद्रित प्रशासन या संकल्पनांची चर्चा करणार आहोत.

आपण काही प्रश्नांनी सुरवात करूया. शासन म्हणजे काय ? प्रशासन म्हणजे काय ? नागरी जीवनात प्रशासनाची भूमिका काय असते ? नागरिकांनी प्रशासनात सहभाग घ्यावा का आणि तो कसा घ्यावा ?

आपण नागरिक म्हणून प्रशासकीय यंत्रणेच्या दैनंदिन संपर्कात येतो. उदा., तुम्हांला जन्म-मृत्यूचा दाखला, आधार कार्ड, पॅनकार्ड, रेशन कार्ड इत्यादी तयार करून घ्यावे लागते. रस्त्याची दुरुस्ती न होणे, कचरा उचलला न जाणे अशा प्रकारच्या स्थानिक प्रशासनाच्या विरोधातील तक्रारी असू शकतात. नागरिकांच्या विविध प्रकारच्या मागण्या आणि गरजा यांची पूर्तता करताना प्रशासकीय यंत्रणा कशा प्रकारे प्रतिसाद देते यावर प्रशासनाचे यश-अपयश अवलंबून असते.

१९८० पासून प्रशासकीय संस्थांच्या कामगिरीवर भर दिला जाऊ लागला. प्रशासनाने योग्य प्रकारे कामगिरी करावी यासाठी उत्तरदायित्व, जबाबदारी, पारदर्शकता आणि नागरिकांचा अभिप्राय जाणून घेणे अशा बाबी लोकप्रशासनाच्या संस्थांमध्ये लागू केल्या जाण्याची आवश्यकता भासली.

राज्यसंस्थेची नागरिकांप्रती कोणती जबाबदारी असते ? इयत्ता ११वी मध्ये आपण लोकप्रशासनाच्या भूमिकेविषयी चर्चा केलेली आहे. यामध्ये लोकप्रशासनाच्या दोन प्रकारच्या स्वरूपाविषयी चर्चा केलेली आहे. लोकप्रशासनाची एक भूमिका जी लोकप्रशासनाकडे मर्यादित भूमिकेतून पाहते (ज्याला POSDCORB म्हणतात) आणि दुसऱ्या व्यापक भूमिकेत शासनाच्या तीनही शाखांचा विचार आपण करतो.

विकास प्रशासनाच्या संकल्पनेमुळे लोकप्रशासनाच्या पारंपरिक भूमिकेत कसा बदल घडवून आणला ते आपण पाहिले. विकासाभिमुख प्रशासनानुसार लोकप्रशासनातील नागरिकांची भूमिका महत्त्वाची असते हेही आपण पाहिले.

आज शासनाव्यतिरिक्त अनेक बिगरशासकीय घटक, स्वयंसेवी संस्था या लोकप्रशासनासाठी साहाय्यकारी भूमिका बजावताना दिसतात. लोकप्रशासनातील शासकीय संस्था आणि बिगरशासकीय संस्था यांच्या अशा सहकार्यात्मक प्रयत्नांचे वर्णन म्हणजे 'प्रशासन' होय. हा लोकप्रशासनाकडे बघण्याचा व्यापक दृष्टिकोन आहे. म्हणजेच प्रशासन ही शासनापेक्षा व्यापक संकल्पना आहे. यामध्ये शासनाच्या केवळ औपचारिक शाखाच (उदा., कायदे मंडळ, कार्यकारी मंडळ, नोकरशहा) नाहीत तर अनौपचारिक शाखा (उदा., बिगरशासकीय संस्था, नागरी समाज, खासगी संस्था) यांचाही समावेश केला जातो. प्रशासनाच्या संकल्पनेचे उद्दिष्ट नागरिकांवर लक्ष केंद्रित करून सार्वजनिक संस्थांची कामगिरी सुधारणे हे आहे.

**करून पहा.**

तुमच्या परिसरात/शहरात/राज्यात कार्य करणाऱ्या बिगर राजकीय संघटना शोधा. त्या कोणत्या समस्यांवर काम करत आहेत ते बघा. कोणत्या संघटनेत तुम्हांला काम करायला आवडेल ?

### उत्पत्ती आणि अर्थ

१९९० च्या दशकात जगभरात अनेक बदल झाले त्यांतील काही पुढीलप्रमाणे :

(i) **जागतिक अर्थव्यवस्थेचे जागतिकीकरण :** जागतिकीकरणाचे अनेक पैलू आहेत – (अ) दूरसंचार क्षेत्रातील तंत्रज्ञानाच्या क्रांतीमुळे इंटरनेट, मोबाइल संपर्कयंत्रणा, टीव्ही यांत विकास झाला आणि सोशल नेटवर्किंगमुळे (सामाजिक

जालातील अभिसरण) तात्काळ संपर्क करता येऊ लागला आणि प्रशासकीय यंत्रणेत पारदर्शकता आली. (ब) आंतरराष्ट्रीय आर्थिक संबंध बदलले, व्यापार आणि गुंतवणूक यांवर भर दिला गेला. यामुळे आंतरराष्ट्रीय निधी पुरवणाऱ्या संस्थांचे महत्त्व वाढले.

(ii) **आंतरराष्ट्रीय संस्था :** आंतरराष्ट्रीय नाणेनिधी, जागतिक बँक, आशियाई विकास बँक, संयुक्त राष्ट्र विकास कार्यक्रम, संयुक्त राष्ट्र पर्यावरण कार्यक्रम, संयुक्त राष्ट्र बालकांसाठीचा आकस्मिक निधी इत्यादी आंतरराष्ट्रीय निधी पुरवणाऱ्या संस्थांचा प्रभाव वाढला. या निधी पुरविणाऱ्या संस्थांनी तिसऱ्या जगातील राष्ट्रांच्या धोरणांवर प्रभाव टाकला. या संस्थांना मदत घेणाऱ्या राष्ट्रांच्या पारंपरिक प्रशासकीय व्यवस्थेत सुधारणा हव्या होत्या.

(iii) **बिगर राजकीय अभिकर्ते :** स्वयंसेवी संस्था आणि बिगर शासकीय संस्थांनी लोकप्रशासनात मोठी भूमिका बजावण्यास सुरुवात केली.


या बदलांमुळे लोकप्रशासनाकडे बघण्याचा दृष्टिकोन बदलला. असे लक्षात आले की लोकप्रशासनातील पारंपरिक दृष्टिकोन नागरिकांच्या गरजा भागवण्यास पुरेसे ठरत नाहीत. यामुळे लोकप्रशासनाकडे प्रशासन म्हणून बघण्याच्या दृष्टिकोनात बदल झाला. लोकप्रशासनाच्या पारंपरिक दृष्टिकोनापासून झालेली ही फारकत होती.

दिरंगाई, लाल फितीचा कारभार आणि भ्रष्टाचार ही वैशिष्ट्ये असलेल्या पारंपरिक, कालबाह्य आणि महाकाय लोकप्रशासनात सुधारणा घडवून त्या जागी प्रतिसाद देणारे, जबाबदार, सहभागास वाव देणारे आणि समतेवर आधारित असे लोकप्रशासन निर्माण करणे असा याचा हेतू होता. हा नवा दृष्टिकोन 'सुशासन' म्हणून ओळखला जातो. हा दृष्टिकोन राज्यसंस्था आणि नागरी समाज यांच्यातील आंतरसंबंधांचा विचार करतो. हा दृष्टिकोन प्रशासन हे नियमांनी बांधलेले न राहता ते नागरिककेंद्री होण्याची गरज प्रतिपादित करते.

**नागरी समाज म्हणजे काय ?**

नागरी समाज म्हणजे विविध प्रकारच्या संस्थांचा अंतर्भाव. ज्यात सामाजिक गट, बिगर शासकीय संस्था, कामगार संघटना, धर्मादाय संघटना, स्वदेशी गट, सांस्कृतिक संघटना, व्यावसायिक संस्था अशा स्वयंसेवी संस्थांचा समावेश होतो.

पुढील तक्ता या दृष्टिकोनातील मूल्यांची कल्पना देतो.




**महाराष्ट्र राज्य सुशासन आराखडा**

- माहितीच्या अधिकाराचा कायदा आणि अधिनियम २००५
- महाराष्ट्र सार्वजनिक अभिलेख कायदा २००५
- महाराष्ट्र कार्यालयीन कर्तव्यात दिरंगाई प्रतिबंधक कायदा २००५
- महाराष्ट्र नागरिकांसाठी सेवेची हमी देणारा कायदा २०१५

आता आपण सुशासनाची विविध मूल्ये समजून घेणार आहोत.

### सुशासनाची मूल्ये

**सहभागात्मक :** हा सुशासनातील महत्त्वाच्या घटकांपैकी एक घटक आहे. कोणत्याही लोकशाही व्यवस्थेच्या परिणामकारक कार्यासाठी लोकसहभाग आवश्यक असतो. जनतेचा आवाज (विचार) आणि मागण्या शासनापर्यंत पोचवल्या जातात. शासनाची निर्णय प्रक्रिया आणि अंमलबजावणीमध्ये सहभागी होण्याची लोकांना संधी मिळते.

**कायद्याचे राज्य :** संविधान म्हणजेच देशाच्या सर्वोच्च कायद्याचे राज्य हे सुशासनाचे दुसरे महत्त्वाचे मूल्य आहे. संविधानातील मूल्ये प्रशासनाला मार्ग दाखविण्याचे कार्य करतात. कायद्यासमोर सर्वांना समानतेची वागणूक मिळते. न्याय्य आणि योग्य राज्यव्यवस्थेत लोकांच्या हक्काची हमी दिली जाते.

**पारदर्शकता :** पारदर्शकता या मूल्यामुळे गुप्ततेच्या प्रक्रियेला आव्हान मिळाले आहे. यामुळे सरकारच्या कामावर लक्ष ठेवणे लोकांना शक्य झाले आहे. २००५ पासून भारतात माहितीचा अधिकार कायदा लागू करण्यात आला. त्यामुळे नागरिकांना शासकीय कामकाजाविषयी माहिती मिळवणे शक्य झाले आहे.

**प्रतिसादात्मक :** सुशासनामध्ये विविध संस्थांमार्फत आणि प्रक्रियांमध्ये सर्व भागधारकांना ठराविक कालमर्यादेत सेवा देणे आवश्यक आहे. नागरिकांच्या समस्या आणि प्रश्नांबाबतीत शासन संस्था त्वरेने निर्णय घेते आणि त्यानुसार धोरणांची आखणी करते.

**सहमतीदर्शक :** प्रत्येक समाजात कोणत्याही मुद्द्यांवर वेगवेगळे दृष्टिकोन आढळतात.सुशासनामध्ये समाजातील विविध घटकांमध्ये सुसंवाद होणे अभिप्रेत आहे. यामुळे संपूर्ण समाजाचे हित कशात आहे आणि ते कसे साध्य करता येईल त्याबाबत एक व्यापक सहमती तयार करण्यास मदत होते. शाश्वत मानवी विकास घडवून आणण्यासाठीची उद्दिष्टे कशी साध्य करता येतील याबाबतही व्यापक आणि दीर्घकालीन दृष्टिकोन स्वीकारता येतो.

**समता आणि समावेशकता :** समाजाचे हित हे सर्व सदस्यांच्या मनात आपण या समाजाचे भाग आहोत ही भावना रुजवण्यावर अवलंबून असते. कोणाच्याही मनात आपण समाजाच्या मुख्य प्रवाहापासून बाजूला आहोत अशी भावना नसावी. यासाठी सर्व गटांना विशेषतः दुर्बल घटकांचे हित साधण्याकरिता आणि सुधारणा करण्यासाठी त्यांना संधी दिली जावी.

**परिणामकारकता आणि कार्यक्षमता :** सुशासन म्हणजे समाजातील संस्थांनी आणि प्रक्रियांनी साधनसंपत्तीचा सुयोग्य वापर करून समाजाच्या गरजा पूर्ण करणे. सुशासनात अंतर्भूत असलेली कार्यक्षमतेची संकल्पना म्हणजे नैसर्गिक साधनसंपदेचा सुयोग्य वापर आणि पर्यावरण रक्षण होय.

**उत्तरदायित्व :** सुशासनात उत्तरदायित्व या संकल्पनेला खूप महत्त्व आहे. केवळ शासकीय संस्थाच नव्हेत तर खासगी क्षेत्रांतील कंपन्या आणि नागरी समाजातील स्वयंसेवी संस्था या जनता आणि आपापल्या भागधारकांप्रती उत्तरदायी असायला हव्यात. निर्णय कोणी घेतले किंवा कार्यवाही कोणी केली आणि घेतलेले निर्णय संस्थांतर्गत घेतले की बाह्य घटकांनी यावर कोण कोणाला उत्तरदायी आहे हे अवलंबून असते. एकूणच कोणतीही संस्था ही त्यांना उत्तरदायी असते, ज्यांच्यावर संस्थेच्या निर्णयाचा आणि कार्यवाहीचा परिणाम होऊ शकतो. उत्तरदायित्वासाठी पारदर्शकता आणि कायद्याचे राज्य असण्याची गरज असते.

**सुशासनासाठीचा पुढाकार आणि भारतातील नागरिककेंद्री प्रशासन :**

स्वातंत्र्योत्तर काळात भारताने समाजवादी आणि कल्याणकारी विकासाचा आराखडा/विकासाचे धोरण स्वीकारले. विकासाभिमुख प्रशासनाचा भर जरी लोकसहभागावर असला तरी नियमितपणे प्रयत्न करून आणि कार्यक्रम घेऊनसुद्‌धा प्रशासकीय प्रक्रियेमध्ये जनतेचा खराखुरा सहभाग मिळवता आला नाही.

भारत सरकारच्या सार्वजनिक कार्मिक जनशिकायत (लोकतक्रार) आणि पेन्शन मंत्रालयांतर्गत प्रशासकीय सुधारणा आणि जनशिकायत (लोकतक्रार) विभाग भारतातील प्रशासकीय सुधारणांकडे लक्ष देते. त्याची उद्दिष्टे पुढीलप्रमाणे : (i) शासनाची धोरणे संरचना आणि प्रक्रियांमध्ये प्रशासकीय सुधारणांना चालना देणे. (ii) तक्रार निवारणावर भर देऊन नागरिककेंद्री प्रशासनास प्रोत्साहन देणे (iii) ई-प्रशासनामध्ये (ई-गव्हर्नन्समध्ये) नावीन्यपूर्ण सुधारणा घडवून आणणे.

दुसऱ्या प्रशासकीय सुधारणा आयोगाची नेमणूक भारतातील लोकप्रशासनाच्या व्यवस्थेत परिपूर्ण बदल घडवून आणण्यासाठी करण्यात आली होती. हा आयोग शासनाच्या सर्व स्तरांवर पुढाकार घेणारे, प्रतिसाद देणारे,

उत्तरदायी, टिकाऊ आणि कार्यक्षम असे प्रशासन देशभरात असावे याकरता उपाययोजना सुचवेल अशी अपेक्षा होती. नागरिककेंद्री प्रशासन हे आयोगाच्या प्रमुख कार्यांपैकी महत्वाचे कार्य होते.

**माहीत आहे का तुम्हांला ?**

नागरिककेंद्री प्रशासनाबाबत पं.जवाहरलाल नेहरू यांचा अभिप्राय ''प्रशासन म्हणजे केवळ हस्तीदंती मनोऱ्यात बसून राहणे, विशिष्ट प्रक्रियांचे पालन करणे, नार्सिससप्रमाणे स्वतःतच मशगुल असणे (स्वबाबत समाधानी असणे) हा नसून काही मिळवण्याचा प्रयत्न करणे होय. प्रशासनाचा शेवटी कस लागणार आहे तो मानवी कल्याणासाठीच.''

आयोगाने अशी भूमिका घेतली की जर प्रशासन नागरिककेंद्री असायला हवे असेल, तर ते सहभागास प्रवृत्त करणारे आणि पारदर्शक असायला हवे. ते परिणामकारक, कार्यक्षम आणि नागरिकांना प्रतिसाद देणारे हवे. त्यापुढे जाऊन नागरिकांना सेवा देण्याचा गुणविशेष हा सर्व शासकीय संस्थांमध्ये झिरपला जायला हवा. शासकीय संस्था या जनतेप्रती उत्तरदायी असायला हव्यात. राज्यसंस्थेच्या प्राथमिक कामांपैकी एक म्हणजे लोककल्याण साधणे हे होय आणि म्हणून जर प्रशासकीय संस्थांचे मूल्यमापन करण्याची वेळ आली तर सरतेशेवट ते नागरिकांना किती समाधान मिळाले यावर आधारित असायला हवे आणि यासाठी नागरिकांच्या आवाजाला महत्त्व द्यायला हवे.

दुसऱ्या प्रशासकीय सुधारणा आयोगाने भारतातील पारंपरिक लोकप्रशासनात सुधारणा घडवून आणण्यासाठी खालील मुद्द्यांकडे विशेषत्वाने लक्ष वेधले आहे :

(i) **उत्तरदायी आणि पारदर्शक शासन :** प्रशासनासाठी उत्तरदायी आणि पारदर्शक व्यवस्था निर्माण करण्यावर भर देण्यात आला आहे. सेवा-सुविधा देताना विलंब टाळण्याची गरज असते.

(ii) **प्रशासनाला अधिकाधिक परिणामाभिमुख करणे :** अनेक प्रशासकीय प्रक्रिया वापर करणाऱ्यांना त्या अनुकूल आणि सुलभ केल्या जाव्यात.

(iii) **नागरिककेंद्री प्रशासन :** कार्यक्रमांची आखणी आणि अंमलबजावणी करत असताना लोकप्रतिनिधींचा आणि जनतेचा वाढता सहभाग राहील याची खात्री करणे.

भारतातील लोकप्रशासनात बदल घडवून आणण्यासाठीच्या सुधारणा —

प्रशासन आणि जनतेतील अंतर कमी करण्यासाठी मोठ्या प्रमाणावर सुधारणा घडवून आणण्यात आल्या. त्यांत पुढील ठळक उपक्रमांचा समावेश आहे.

(i) लोकांना अधिकार देणारे कायदे संमत करणे.

(ii) नागरिकांच्या तक्रारींचे निवारण करण्यासाठी नवीन संस्थात्मक यंत्रणा उभारणे.

(iii) नागरिकांना मिळणाऱ्या सेवांमध्ये सुधारणा व्हावी यासाठी त्यांना पोहचता येईल अशा ठिकाणी कार्यालयांची स्थापना करणे.

(iv) नोकरशाहीमुळे होणारा विलंब टाळण्यासाठी प्रक्रियांमध्ये सुलभता आणणे.

(v) अंतर्गत बाबींत कार्यक्षमता वाढवण्यासाठी तंत्रज्ञानाचा वापर करणे.

(vi) चांगली कामगिरी केली आहे अशा कर्मचाऱ्यांना सन्मानित करणे.

(vii) संस्थेतील अंतर्गत शिस्तपालन सुधारणे.

(viii) नियमन आणि नियंत्रण कमी करणे.

(ix) सार्वजनिक कार्यक्रम आयोजित करणे.

**करून पहा.**

वरीलपैकी प्रत्येक सुधारणांबाबत उदाहरणे शोधा. उदा., (१) लोकांना अधिकार देणारे कायदे संमत करणे; केलेली सुधारणा - माहितीचा अधिकार २००५



भारतातील प्रशासकीय सुधारणा : जिल्हाधिकारी कार्यालयात आयोजित जनता दरबारात नागरिकांशी संवाद.



भारतातील प्रशासकीय सुधारणा : जिल्हाधिकारी कार्यालयात आधार कार्डाची दुरुस्ती

**भारतातील प्रशासकीय सुधारणा :** भारतात सुशासन निर्माण करण्यासाठी तयार केलेल्या विशेष कार्यक्रमांची चर्चा करूयात.

### (१) लोकपाल आणि लोकायुक्त

द लोकपाल अँड लोकायुक्त ॲक्ट २०१३ हा कायदा २०१४ मध्ये लागू झाला. या कायद्यान्वये केंद्रासाठी 'लोकपाल' तर राज्यांसाठी 'लोकायुक्त' या संस्थांची स्थापना करण्यात आली. हे कार्यालय शासकीय अधिकाऱ्यांविरोधातील भ्रष्टाचाराशी संबंधित आरोपांची चौकशी करू शकते. यातून शासनाची स्वच्छ आणि प्रतिसाद देणाऱ्या प्रशासनाविषयीची कटिबद्‌धता दिसून येते.

लोकपाल ही संकल्पना स्वीडन या देशाकडून घेण्यात आली आहे. स्वीडनमध्ये या कार्यालयास 'ऑम्बुडसमन' असे म्हणतात. ऑम्बुडसमनचे विशिष्ट कार्य म्हणजे शासकीय अधिकाऱ्यांविरोधातील भ्रष्टाचाराशी संबंधित तक्रारींची चौकशी करणे आणि त्यांचे निवारण करण्यासाठी प्रयत्न करणे.

महाराष्ट्र हे भारतातील पहिले राज्य आहे जिथे लोकायुक्त ही संकल्पना राबवली गेली आहे. १९७२ साली महाराष्ट्र लोकायुक्त संस्था अस्तित्वात आली. कार्यकारी मंडळ सदस्य, कायदेमंडळ सदस्य, राज्य सरकार, स्थानिक शासन संस्था, सार्वजनिक उद्योग आणि इतर शासकीय संस्थामधील अधिकारी अशा सार्वजनिक कर्मचाऱ्यांच्या वर्तणुकीमुळे आलेल्या तक्रारींची दखल घेण्याचे काम लोकायुक्त करतात. सर्वसामान्य लोक केवळ शासकीय कर्मचाऱ्यांच्याच विरोधातील आरोपांची चौकशी लोकायुक्तांकडे करू शकतात. लोकायुक्त स्वतःहून (सुओ मोटो स्वाधिकारात) शासकीय कर्मचाऱ्याची चौकशी करू शकतात.

भारत सरकारने पिनाकी चंद्र घोष यांची पहिले लोकपाल म्हणून २०१९ मध्ये नियुक्ती केली.



**माहीत आहे का तुम्हांला ?**

सुओ मोटो ही लॅटिन भाषेतील संज्ञा आहे. याचा अर्थ आहे स्वाधिकार किंवा स्वतःहून केलेली कार्यवाही. जिथे शासनसंस्था स्वतःहून कार्यवाही करते अशा वेळेस या संज्ञेचा वापर होतो.

### (२) नागरिकांची सनद

नागरिकांची सनद ही संकल्पना नागरिक हा 'राजा' असून शासन संस्था या नागरिकांची सेवा करण्यासाठी आहेत या संकल्पनेवर आधारित आहे. सेवा पुरवणारी संस्था आणि नागरिक या दोघांनाही कळावे की सार्वजनिक संस्था या सेवा देण्यासाठीच आहेत, याकरता प्रत्येक संस्थेने ती कोणत्या सेवा-सुविधा देणार हे स्पष्ट करावे आणि त्या सुविधासांठीचा दर्जाही ठरवून घ्यावा. एकदा हे झाले आणि जर दिलेल्या सेवेची गुणवत्ता ठरवलेल्या दर्जाप्रमाणे नसेल तर संस्थांना उत्तरदायी धरता येते. भारत सरकारने नागरिकांची सनद तयार करण्याचा उपक्रम १९९६ मध्ये सुरू केला.

महाराष्ट्र शासन

**नोंदणी व मुद्रांक विभाग**

# नागरिकांची सनद

## नोंदणी व मुद्रांक विभागातर्फे नागरिकांना देण्यात येणाऱ्या सेवांबाबतची सनद

| अ. क्र. | सेवेचा तपशील | अर्ज कोणत्या कार्यालयात सादर करावा | अर्ज मंजूर करणारे/ निर्णय घेणारे अधिकारी | सेवा पुरवण्यास लागणारा कालावधी |
|---|---|---|---|---|
| | **दुय्यम निबंधक कार्यालयामार्फत पुरवण्यात येणाऱ्या सेवा** | | | |
| १. | दस्त नोंदणी करणे. | दुय्यम निबंधक | दुय्यम निबंधक | 30 मिनिटे |
| २. | दस्ताच्या सूचीची प्रमाणित नक्कल देणे.<br>(अ) फेब्रु. 2002 नंतरच्या दस्ताबाबत<br>(ब) फेब्रु. 2002 पूर्वीच्या दस्ताबाबत | दुय्यम निबंधक | दुय्यम निबंधक | <br>5 दिवस<br>15 दिवस |
| ३. | दस्ताची प्रमाणित नक्कल देणे.<br>(अ) फेब्रु. 2002 नंतरच्या दस्ताबाबत<br>(ब) फेब्रु. 2002 पूर्वीच्या दस्ताबाबत | दुय्यम निबंधक | दुय्यम निबंधक | <br>5 दिवस<br>15 दिवस |
| ४. | शोध उपलब्ध करणे. | दुय्यम निबंधक | दुय्यम निबंधक | त्याच दिवशी |
| ५. | नोटीस ऑफ इंटिमेशन फाईल करून घेणे. | दुय्यम निबंधक | दुय्यम निबंधक | 2 तास |
| ६. | जुना मूळ दस्त नोंदणी करून परत देणे. | दुय्यम निबंधक | दुय्यम निबंधक | 5 दिवस |
| ७. | मुद्रांक शुल्क भरण्याचे प्रयोजनार्थ मूल्यांकन अहवाल देणे. | दुय्यम निबंधक | दुय्यम निबंधक | 3 दिवस |
| ८. | दस्त नोंदणी संदर्भात गृहभेट देणे. | दुय्यम निबंधक | दुय्यम निबंधक | 3 दिवस |
| ९. | विशेष कुलमुखत्यारपत्राचे अधिप्रमाणन करून देणे. | दुय्यम निबंधक | दुय्यम निबंधक | त्याच दिवशी |
| १०. | मृत्युकर्त्याच्या मृत्यूनंतर मृत्यूपत्र नोंदणी करणे. | दुय्यम निबंधक | दुय्यम निबंधक | त्याच दिवशी |
| | **सह जिल्हा निबंधक कार्यालयामार्फत देण्यात येणाऱ्या सेवा** | | | |
| ११. | नोंदणी झालेल्या दस्तविषयक अभिलेख दुरूस्तीस परवानगी देणे. | दुय्यम निबंधक | सह जिल्हा निबंधक | 14 दिवस |
| १२. | दस्त नोंदणीस सादर करण्यासाठी किंवा कबुलीजबाब देण्यासाठी झालेला विलंब क्षमापित करणे. | दुय्यम निबंधक | सह जिल्हा निबंधक | 30 दिवस |
| १३. | दस्त नोंदणीदरम्यान खोटे निवेदन किंवा तोतयेगिरी संदर्भातील तक्रारींवरील कार्यवाही करणे. | सह जिल्हा निबंधक | सह जिल्हा निबंधक | 45 दिवस |
| १४. | दस्त नोंदणी नाकारण्याच्या आदेशाविरुद्ध अपिलावरील कार्यवाही करणे. | सह जिल्हा निबंधक | सह जिल्हा निबंधक | 45 दिवस (सुनावणीनुसार) |
| १५. | सह जिल्हा निबंधक कार्यालयात नोंदणी झालेल्या दस्ताची/त्या दस्ताच्या सूचीची प्रमाणित नक्कल देणे. | सह जिल्हा निबंधक | सह जिल्हा निबंधक | 15 दिवस |
| १६. | दस्त नोंदणी न केलेल्या प्रकरणांमध्ये, ई-पेमेंट पद्धतीने भरलेल्या नोंदणी फी चा परतावा देणे. | दुय्यम निबंधक | सह जिल्हा निबंधक | 22 दिवस |
| १७. | नोंदणी झालेल्या दस्तास जादा भरलेल्या नोंदणी फी चा परतावा देणे. | दुय्यम निबंधक | सह जिल्हा निबंधक | 30 दिवस |
| १८. | मृत्युपत्राचा सीलबंद लखोटा जमा करणे, परत घेणे किंवा उघडणे. | सह जिल्हा निबंधक | सह जिल्हा निबंधक | त्याच दिवशी |
| | **मुद्रांक जिल्हाधिकारी कार्यालयामार्फत देण्यात येणाऱ्या सेवा** | | | |
| १९. | दस्ताचे मुद्रांक शुल्काबाबत अभिनिर्णय करणे. | मुद्रांक जिल्हाधिकारी | मुद्रांक जिल्हाधिकारी | 45 दिवस |
| २०. | मुद्रांक शुल्काचा परतावा देणे. | मुद्रांक जिल्हाधिकारी | मुद्रांक जिल्हाधिकारी | 35 दिवस |

- **नागरिकांच्या सविस्तर माहितीसाठी सनदेची संपूर्ण प्रत सह जिल्हा निबंधक यांच्याकडे पाहणीसाठी उपलब्ध आहे.**
- **'नागरिकांची सनद' व 'सारथी' ही पुस्तके** www.igrmahhelpline.gov.in **या वेबसाईटवर उपलब्ध आहेत.**
- **सनदेच्या अंमलबजावणीबाबत प्रतिक्रिया नोंदवण्यासाठी** feedback@igrmaharashtra.gov.in **या ई-मेल चा वापर करा.**
- **दस्त नोंदणी व मुद्रांक शुल्काबाबत अडचण आल्यास कॉल करा - सारथी हेल्पलाईन - फोन क्र.** 8888007777

**नोंदणी महानिरीक्षक व मुद्रांक नियंत्रक,**
**महाराष्ट्र राज्य, पुणे**

**तुम्ही शोधू शकाल का?**

भारत सरकारच्या आणि महाराष्ट्र शासनाच्या वेबसाईटला भेट द्या. नागरिकांची सनद मिळवा. तुमच्या वर्गात त्यातील माहितीची चर्चा करा.

### (३) ई-प्रशासन (ई-गव्हर्नन्स)


माहिती आणि संपर्क तंत्रज्ञान क्षेत्रातील क्रांतीत प्रशासनाला एका वेगळ्या उंचीवर नेण्याचे सामर्थ्य आहे. त्यामुळेच जगभरातील अनेक देश मोठ्या प्रमाणावर ई-प्रशासनाकडे (ई-गव्हर्नन्सकडे) वळत आहेत. गेल्या काही दशकांमध्ये प्रशासन गुंतागुंतीचे आणि वैविध्यपूर्ण होत चालले आहे. नागरिकांच्या शासनाकडून असणाऱ्या अपेक्षाही अनेक पटीने वाढल्या आहेत. माहिती आणि संपर्क तंत्रज्ञानामुळे कार्यक्षम पद्धतीने माहिती साठवणे, हवी असेल तेव्हा ती परत मिळवणे, जलदगतीने पाठवणे शक्य झाले आहे. माहितीवर स्वहस्ते प्रक्रिया करण्याच्या पद्धतीपेक्षा वेगवानपणे प्रक्रिया करता येणे सुलभ झाले आहे. यातून शासनाच्या कार्यपद्धतींना वेग येण्यास, निर्णय त्वरेने आणि न्यायपूर्ण पद्धतीने होण्यास, पारदर्शकता वाढण्यास आणि उत्तरदायित्व लागू करण्यास मदत झाली आहे. भौगोलिक आणि लोकसंख्येच्या दृष्टीने शासनाची व्याप्ती वाढण्यासही साहाय्य झाले आहे.

गेल्या काही वर्षांत राज्यशासन आणि केंद्रशासन यांनी ई-प्रशासनासंदर्भात अनेक पुढाकार घेतले आहेत. सार्वजनिक सेवा पुरवण्यात सुधारणा करण्यासाठी आणि त्या मिळवण्याची प्रक्रिया सुलभ करण्यासाठी अनेक स्तरांवर प्रयत्न केले गेले आहेत. भारतातील ई-प्रशासनाची सुरुवात शासकीय विभागांच्या संगणकीकरणापासून झाली. आता ती नागरिककेंद्रित, सेवाभावी आणि पारदर्शक झाली आहे.

भारत सरकारच्या राष्ट्रीय ई-प्रशासन (नॅशनल इ-गव्हर्नन्स प्लॅन) योजनेचे उद्दिष्ट सार्वजनिक सुविधा नागरिकांच्या जवळ घेऊन जाणे हे आहे. हे उद्दिष्ट देशभर पायाभूत सेवा सुविधा (इन्फ्रास्ट्रक्चर) उभारून दूरपर्यंतच्या ग्रामीण भागात पोहचवणे, मोठ्या प्रमाणावर नोंदींचे डिजिटायझेशन करून आणि माहितीजालाच्या (इंटरनेटच्या) साहाय्याने सहज आणि खात्रीशीर पद्धतीने त्या नोंदी उपलब्ध करून देऊन साधायचे आहे. आज जन्माचा दाखला, मृत्यूचा दाखला, पॅनकार्ड किंवा पासपोर्टही ऑनलाईन पद्धतीने मिळवणे शक्य झाले आहे. यामुळे प्रशासन जनतेच्या जवळ आले आहे.

**तुम्ही शोधू शकाल का?**

महाराष्ट्र शासनाचे ई-प्रशासनाचे (ई-गव्हर्नन्स) उपक्रम शोधा.




**प्रादेशिक परिवहन कार्यालयाचे संकेतस्थळ**

### (४) माहितीचा अधिकार

माहितीचा अधिकार हा सुशासनाचा एक महत्त्वाचा पैलू आहे. यातून सार्वजनिक धोरण आणि कार्यवाही या विषयी माहिती मिळते. सहभागी लोकशाही बळकट करण्यासाठी आणि जनकेंद्रित प्रशासनाची सुरवात करण्यासाठीची ही महत्त्वपूर्ण बाब आहे. शासकीय संस्थांमधील पारदर्शकतेमुळे कामकाज वस्तुनिष्ठ पद्धतीने होते आणि कामकाजाबद्दल निश्चितता येते. नागरिकांना परिणामकारक रीतीने प्रशासनात सहभागी होता येते. अर्थात माहितीचा अधिकार ही सुशासनाची मूलभूत गरज आहे. २००५ च्या माहिती अधिकाराच्या कायद्यामुळे नागरिकांना शासनाबद्दलची सार्वजनिक माहिती मिळवता येणे शक्य झाले आहे.


### (५) नागरिकांचा प्रशासनातील सहभाग

हा सुदृढ लोकशाहीला बळकट करतो. पारंपरिक प्रातिनिधिक लोकशाही व्यवस्था सुधारण्यास आणि तिचे रूपांतर जास्त प्रतिसादात्मक आणि सहभागात्मक लोकशाहीमध्ये होण्यास हातभार लावतो.

वरील सर्व योजना नागरिकांचा प्रशासनातील सहभाग सुनिश्चित करतात. नागरिकांकडे केवळ विकासाचे लाभार्थी म्हणून बघितले जाऊ नये, तर ते विकास प्रक्रियेतील सहभागी घटक म्हणून समजले जावेत. हा मूलतः 'बॉटम अप' (कनिष्ठ स्तराकडून वरिष्ठ स्तराकडे जाणारा) दृष्टिकोन असून 'टॉप डाऊन' (वरिष्ठ स्तरावरून कनिष्ठ स्तराकडे जाणारा) दृष्टिकोन नाही. हा नागरिकांनी प्रभावित केलेल्या साधनसंपत्तीविषयक नियंत्रण करण्याच्या आणि विकासाबाबतचे निर्णय घेण्याच्या कार्यपद्धती ध्वनीत करतो. हा दृष्टिकोन नागरिकांना स्वतःच्या भवितव्याविषयीचे निर्णय घेण्याचा कायदेशीर अधिकार आहे हे मान्य करतो.

**करून पहा.**

माहितीच्या अधिकाराचा अर्ज कसा भरतात ते शोधा. शासकीय कार्यालयातून एखाद्या गोष्टीची माहिती मिळवण्यासाठी नमुना अर्ज तयार करा.



### ई-प्रशासनाच्या उद्‌दिष्टांचे सहा स्तंभ

महाराष्ट्र शासनाने ई-प्रशासन सक्रिय आणि प्रतिकारात्मक करण्याच्या दृष्टीने उद्‌दिष्टांचे सहा स्तंभ निश्चित केले आहेत.

**स्तंभ-१ धोरण आणि कायद्याची चौकट :** बदलत्या काळानुसार आणि तंत्रज्ञानानुसार कायद्याच्या चौकटीत नियमितपणे सुधारणा करणे.

**स्तंभ-२ क्षमता बांधणी :** कार्यालयीन कर्मचाऱ्यांची क्षमता वाढवणे गरजेचे असते.

**स्तंभ-३ वित्त पुरवठा :** वेळेवर आणि पुरेसा वित्त पुरवठा करण्याची यंत्रणा सुनिश्चित करणे.

**स्तंभ-४ संस्थात्मक चौकट :** ई-प्रशासनाच्या योजना निर्माण करून त्यांचे निर्देशन करण्यासाठी प्रशासकीय यंत्रणा विकसित करणे.

**स्तंभ-५ ई-प्रशासनाची एकत्रित पायाभूत सेवा यंत्रणा :** ई-प्रशासनासाठी डेटा सेंटर, समान सेवा केंद्र आणि राज्यव्यापी एरिया नेटवर्क विकसित करणे.

**स्तंभ-६ समान राज्यव्यापी प्रकल्प :** शासनाच्या विभागांसाठी ई-टेंडर, एसएमएस गेटवे, पेमेंट गेटवे इत्यादी सुविधा निर्माण करणे आणि त्यांच्यात समन्वय साधणे.

### तुम्ही शोधू शकाल का?

ग्राहकांच्या हिताचे संरक्षण करण्याच्या उद्देशाने १९८६ मध्ये ग्राहक संरक्षण कायदा मंजूर करण्यात आला. तुम्ही ग्राहक न्यायालयांविषयी कधी ऐकले किंवा वाचले आहे का ? ग्राहक न्यायालये कशी काम करतात याविषयी माहिती शोधा. जर एखाद्या दुकानदाराने तुम्हांला फसवले, तर तुम्ही ग्राहक न्यायालयात दाद मागाल का ? या विषयावर तुमच्या वर्गात चर्चा करा.

### विशेष संस्थात्मक यंत्रणा

सुशासनाचे फायदे समाजातील सर्व घटकांना मिळायला हवेत. समाजातील काही दुर्बल घटकांसाठी संविधानात सामाजिक, आर्थिक आणि राजकीय स्वरूपाच्या संरक्षक तरतुदी केल्या आहेत. शासनाने या संरक्षक तरतुदींशिवाय समाजातील विविध घटकांचे हक्क जपण्याच्या दृष्टीने खालील काही आयोगांची निर्मिती केली आहे :

(i) **राष्ट्रीय अनुसूचित जातींसाठीचा आयोग :** हा आयोग अनुसूचित जातींसाठीच्या संवैधानिक संरक्षक उपाययोजनांच्या संदर्भात काम करतो, अनुसूचित जातींना अधिकारापासून वंचित ठेवले गेले असेल तर अशा प्रकरणांची चौकशी करतो.

(ii) **राष्ट्रीय अनुसूचित जमातींसाठीचा आयोग :** हा आयोग संविधानाने हमी दिलेल्या संरक्षक उपाययोजनांच्या संदर्भात काम करतो, प्रामुख्याने अनुसूचित जमातींसाठीचे अधिकार हिरावून घेतल्या गेलेल्या प्रकरणांची चौकशी करतो.

(iii) **राष्ट्रीय मानवाधिकार आयोग :** संविधानाने हमी दिलेल्या जीविताचा हक्क, स्वातंत्र्याचा हक्क, समता आणि प्रतिष्ठेच्या अधिकारांच्या संरक्षणासाठी सदर आयोग काम करतो.

(iv) **राष्ट्रीय महिला आयोग :** सदर आयोगाची स्थापना महिलांच्या तक्रारींचे निवारण करण्यासाठी तसेच महिलांच्या सामाजिक आणि आर्थिक विकासास चालना देण्यासाठी केली आहे.

(v) **राष्ट्रीय बालहक्क संरक्षण आयोग :** देशभरात बालकांच्या हक्कांचे संरक्षण करणे, बालहक्कांना प्रोत्साहन देणे आणि त्यांचा बचाव करणे यासाठी



### माहीत आहे का तुम्हांला ?

राष्ट्रीय अल्पसंख्याक आयोगानुसार मुस्लीम, शीख, ख्रिश्चन, बौद्ध, पारशी आणि जैन या धार्मिक गटांना अल्पसंख्याक गट म्हणून मान्यता मिळाली आहे.

हा आयोग कार्यरत आहे. आयोगाच्या व्याख्येप्रमाणे ० ते १८ वयोगटांतील व्यक्तींना बालक समजले जाते.

(vi) **राष्ट्रीय मागासवर्गीय आयोग :** हा आयोग सामाजिक आणि आर्थिकदृष्ट्या मागासवर्गीयांच्या कल्याणावर भर देतो.

(vii) **राष्ट्रीय अल्पसंख्याक आयोग :** अल्पसंख्याकांचे संरक्षण करण्यासाठी संसद आणि राज्यांच्या विधीमंडळांनी पारित केलेले कायदे आणि संविधानाने दिलेल्या संरक्षणविषयक तरतुदींच्या कार्यावर देखरेख करण्याचे काम हा आयोग करतो.

(viii) **राष्ट्रीय ग्राहक वाद निवारण आयोग :** हा आयोग ग्राहकांच्या वादांचे निवारण करतो.

**चर्चा करा.**

वरीलपैकी कोणत्याही एका आयोगाची रचना आणि कार्ये यांवर वर्गात चर्चा करा.

भारतीय संविधानाने मूलभूत अधिकार आणि राज्य धोरणाच्या मार्गदर्शक तत्वांद्वारे सुशासनाच्या चौकटीची मांडणी केली आहे. त्यावर आधारित सुशासनासाठीची संस्थात्मक चौकट विकसित करण्याचा शासनाने प्रयत्न केला आहे. प्रशासनाकडे बघण्याचा लोकाभिमुख दृष्टिकोन हा सुशासनाचा गाभा आहे. हा अशा वातावरणाची निर्मिती करतो, ज्यात सर्व वर्गातील नागरिकांना त्यांच्यातील क्षमतांचा पूर्ण विकास घडवता येतो. भारताला एक प्रतिसाद देणारे, उत्तरदायी, टिकाऊ आणि कार्यक्षम प्रशासन निर्माण करायचे आहे.

**See the following website for additional information:**

1. Ministry of Electronics and Information Technology, Government of India. https://meity.gov.in/divisions/national-e-governance-plan
2. Citizen Centric Administration (12th Report), 2009 Second Administrative Commission: Reports. Department of Administrative Reforms and Grievances, Government of India https://darpg.gov.in/arc-reports
3. Government of Maharashtra, E Governance Policy, 23 September 2011 https://www.maharashtra.gov.in/PDF/e_governance_policy.pdf

## स्वाध्याय

**प्र.१ (अ) दिलेल्या पर्यायांपैकी योग्य पर्याय निवडून विधाने पूर्ण करा.**


(१) लोकपाल ही संकल्पना येथून घेण्यात आली.
- (अ) अमेरिका
- (ब) युनायटेड किंग्डम
- (क) स्वीडन
- (ड) रशिया

(२) नागरिकाची सनद ही संकल्पना याचा भाग आहे –
- (अ) POSDCORB
- (ब) विकास प्रशासन
- (क) सुशासन
- (ड) बिगर सरकारी उपक्रम

**(ब) योग्य संकल्पना सुचवा.**

शासकीय अधिकाऱ्यांच्या विरोधातील तक्रारींची चौकशी करणारी व्यक्ती –

**प्र.२ (अ) संकल्पनाचित्र पूर्ण करा.**




**(ब) चूक की बरोबर सकारण लिहा.**

(१) राजकीय कार्यकारी प्रमुखांविरोधात लोकायुक्त चौकशी करू शकतात.

(२) सुशासनामध्ये नैसर्गिक संसाधनांचा कुशलतेने वापर केला जातो.

**प्र.३ सहसंबंध स्पष्ट करा.**

सुशासन आणि ई-प्रशासन

**प्र.४ तुमचे मत नोंदवा.**

(१) ई-प्रशासनामुळे शासकीय प्रक्रिया जलद झाली.

(२) ई-प्रशासनाने प्रशासनाला जनतेच्या जवळ आणले आहे.

**प्र.५ उत्तर लिहा.**

समाजातील विविध घटकांचे हक्क सुरक्षित करणाऱ्या भारतातील विविध संस्था स्पष्ट करा.

**प्र.६ दिलेल्या मुद्द्यांच्या आधारे प्रश्नाचे सविस्तर उत्तर लिहा.**

सुशासनाची पुढे दिलेली मूल्ये सविस्तरपणे स्पष्ट करा.

(अ) सहभागात्मक (ब) पारदर्शकता

(क) प्रतिसादात्मक (ड) उत्तरदायित्व

**उपक्रम**

(१) समाजातील विविध घटकांचे हक्क सुरक्षित करणाऱ्या राज्यस्तरावरील आयोगांची माहिती संकलित करा.

(२) 'ऑम्बुडसमन'विषयी माहिती संकलित करा.

# ६. भारत आणि जग

भारताच्या परराष्ट्र धोरणाचा उगम स्वातंत्र्यपूर्व काळात झाला. भारत ब्रिटिश वसाहत असतानाही भारताचा आंतरराष्ट्रीय संबंधांमध्ये सहभाग होता. आंतरराष्ट्रीय नाणेनिधी आणि आंतरराष्ट्रीय पुनर्निर्माण आणि विकास बँक यांची निर्मिती जिथे झाली त्या ब्रेटन वूड्स परिषदेमध्ये भारत सहभागी झाला होता. तसेच संयुक्त राष्ट्रांच्या सनदेला अंतिम स्वरूप जिथे दिले गेले त्या सॅन फ्रान्सिस्को परिषदेतही भारताने भाग घेतला होता. स्वातंत्र्यानंतरचे भारताचे परराष्ट्र धोरण हे काही बाबतीत ब्रिटिश धोरणाप्रमाणेच राहिले, तर काही बाबतीत ब्रिटिश धोरणापेक्षा वेगळे झाले.

या प्रकरणाच्या सुरुवातीला आपण भारतीय परराष्ट्र धोरणाची उद्‌दिष्टे आणि तत्त्वे, तसेच परराष्ट्र धोरणावर परिणाम करणारे घटक समजून घेणार आहोत.

### भारताच्या परराष्ट्र धोरणाची उद्‌दिष्टे

आंतरराष्ट्रीय शांतता आणि सुरक्षा कायम ठेवणे हे भारताच्या परराष्ट्र धोरणाचे एक महत्त्वाचे उद्‌दिष्ट आहे. संविधानाच्या भाग IV कलम ५१ मधील मार्गदर्शक तत्त्वांमध्ये त्याचा समावेश केला आहे. त्यात असे म्हटले आहे, की भारताचे शासन आंतरराष्ट्रीय शांतता आणि सुरक्षेचे रक्षण आणि संवर्धन करण्यासाठी विशेष प्रयत्न करील. तसेच, स्वातंत्र्य मिळाल्यापासूनच आंतरराष्ट्रीय राजकारणातील एक महत्त्वाची सत्ता बनून प्रभावशाली भूमिका पार पाडण्याच्या आकांक्षेचाही भारताने नेहमी पाठपुरावा केला आहे.

भारताच्या परराष्ट्र धोरणाच्या उद्‌दिष्टांमध्ये देशाचे सार्वभौमत्व आणि एकात्मता यांचे संरक्षण करणे, आर्थिक वृद्‌धी आणि विकासाला चालना देणे, व्यापक अर्थाने राष्ट्रीय सुरक्षेचे जतन करणे, यांचा समावेश होतो. १९९०च्या दशकापासून आर्थिक वृद्‌धीचा चढा दर कायम राहावा यासाठी भारताने जागतिक अर्थव्यवस्थेशी अधिक एकात्मीकरण साधण्याचे धोरण अवलंबिले आहे. या कारणामुळे, शेजारी देशांबरोबर चांगले संबंध राखणे, क्षेत्रीय गटांबरोबरील (उदा., आसियान, युरोपीय युनियन) संबंध बळकट करणे, हिंदी महासागर क्षेत्र आणि इंडो-पॅसिफिक क्षेत्रामध्ये शांतता आणि सुव्यवस्था राखणे, हीदेखील समकालीन भारतीय परराष्ट्र धोरणाची महत्त्वाची उद्‌दिष्टे आहेत.

### भारताच्या परराष्ट्र धोरणाची तत्त्वे

भारताच्या परराष्ट्र धोरणकर्त्यांना काही मूलभूत तत्त्वे नेहमीच मार्गदर्शक राहिली आहेत. ती खालीलप्रमाणे :

- राज्यांची सार्वभौम समानता.
- सर्व राज्यांच्या सार्वभौमत्वाचा आणि प्रादेशिक एकात्मतेचा आदर.
- इतर राज्यांच्या अंतर्गत बाबींमध्ये हस्तक्षेप न करणे.
- आंतरराष्ट्रीय कायद्याचा सन्मान.
- आंतरराष्ट्रीय आणि क्षेत्रीय संघटनांमध्ये सक्रिय सहभाग.
- शांततापूर्ण सहजीवन आणि आंतरराष्ट्रीय विवादांचे शांततामय मार्गाने निराकरण यांवर विश्वास.

७ सप्टेंबर १९४६ रोजी ऑल इंडिया रेडिओवर दिलेल्या भाषणात पंडित जवाहरलाल नेहरू यांनी भारतीय परराष्ट्र धोरणाची वैशिष्ट्ये स्पष्ट केली. ते म्हणाले, "ज्यांच्यामुळे भूतकाळात जागतिक युद्‌धे झाली, आणि जे भविष्यात त्याहूनही मोठ्या विनाशास कारणीभूत ठरतील अशा, परस्परविरोधी लष्करी करारांच्या आणि गटांच्या राजकारणापासून आपल्याला शक्यतो दूर ठेवावे, असे आम्ही प्रस्तावित करत आहोत." इंग्लंडबरोबर मैत्रीपूर्ण संबंध राहतील अशी आशा व्यक्त करून त्यांनी अमेरिका आणि सोव्हिएट रशिया यांनाही मैत्री करण्यासाठी आमंत्रित केले. चीनबरोबर असलेली मैत्री पूर्वीप्रमाणेच कायम राहिल अशी आशा त्यांनी व्यक्त केली. आशिया खंडातील भारताच्या स्थानाबद्‌दल ते म्हणाले, ''आम्ही

आशियाई आहोत आणि आशियातील लोक आम्हांला इतरांपेक्षा जास्त जवळचे आहेत. भारताचे स्थान पश्चिम, दक्षिण आणि आग्नेय आशियासाठी महत्वाचे आहे.''

### अलिप्ततावाद

अलिप्ततावाद हे भारतीय परराष्ट्र धोरणाचे एक महत्वाचे वैशिष्ट्य आहे. अलिप्ततावादाचा शब्दशः अर्थ 'कोणत्याही लष्करी कराराचा भाग होण्यास नकार' असा आहे. युरोप, आशिया आणि जगातील इतर भागांतील देशांशी लष्करी करार करून अमेरिका आणि सोव्हिएट रशिया आपापले प्रभावक्षेत्र विस्तारण्याचा प्रयत्न करत होते.


अलिप्ततावादी राष्ट्रांची पहिली शिखर परिषद, बेलग्रेड १९६१

**माहीत आहे का तुम्हांला ?**

**शीतयुद्धाच्या काळातील काही महत्वाचे लष्करी करार**

**अमेरिकेचे लष्करी करार :**

- North Atlantic Treaty Organisation in 1949 (NATO)
- ANZUS in 1951 (US, Australia, New Zealand)
- South East Asia Treaty Organisation (SEATO) in 1954
- Central Treaty Organisation (CENTO) in 1955.

**सोव्हिएट रशियाचे लष्करी करार :**

- The Soviet Union and China signed a military alliance in 1950.
- Warsaw Pact in 1955.

या दोन महासत्तांपैकी कोणाही एकाच्या नेतृत्वाखालील लष्करी कराराचा भाग होण्यास नकार देऊन भारताने अलिप्ततावादाचा मार्ग निवडला. दोन्ही महासत्तांपासून समान अंतर राखण्याचे धोरण भारताने अवलंबिले. अलिप्ततावादाची संकल्पना आणि धोरण हे तत्कालीन प्रधानमंत्री जवाहरलाल नेहरू यांचे योगदान आहे. शीतयुद्ध संपल्यानंतर अलिप्ततावादाच्या प्रस्तुततेबद्दल प्रश्न उभे राहिले, परंतु अलिप्ततावादाच्या धोरणातील मूलभूत मुद्दे, म्हणजे स्वतंत्र परराष्ट्र धोरण आणि शांततेचा मार्ग, हे आजही प्रस्तुत आहेत.

**शोधा पाहू.**

१९६१ मध्ये बेलग्रेड येथे झालेल्या अलिप्ततावादी देशांच्या पहिल्या शिखर परिषदेत अलिप्ततावादाचे निकष ठरवण्यात आले. ते निकष कोणते, ते शोधा

### भारताच्या परराष्ट्र धोरणाला प्रभावित करणारे घटक

● **भौगोलिक घटक :** दक्षिण भारताची मोठी किनारपट्टी, तसेच उत्तर आणि ईशान्येकडील हिमालय पर्वताच्या रांगा यांनी भारताच्या परराष्ट्र आणि सुरक्षा धोरणाविषयीच्या दृष्टिकोनाला आकार दिला आहे. त्याचप्रमाणे जवळजवळ संपूर्ण उत्तर आणि ईशान्य सीमेपलीकडे चीनसारखा मोठा देश असणे, याचाही परराष्ट्र धोरणावर परिणाम झाला आहे. दक्षिण आशियात भारताच्या सर्व शेजारी देशांची भारताबरोबर सीमा आहे, पण त्यांपैकी कोणत्याही देशाची एकमेकांबरोबर सीमा नाही. दक्षिण आशियाच्या या वैशिष्ट्यपूर्ण भौगोलिक परिस्थितीचाही भारताच्या परराष्ट्र धोरणावर परिणाम होतो. भारताचे हिंदी महासागरात महत्वाचे स्थान आहे. भारताला विस्तृत सागरी किनारा आहे. तसेच पश्चिमेकडे लक्षद्वीप आणि पूर्वेकडे अंदमान आणि निकोबार बेटे आहेत.

● **ऐतिहासिक घटक :** यात शांतता आणि सहजीवन या भारताच्या पारंपरिक सांस्कृतिक मूल्यांचा समावेश होतो. पश्चिम, मध्य आणि आग्नेय आशियातील देशांबरोबरील ऐतिहासिक, सांस्कृतिक संबंधांचा भारतीय

परराष्ट्र धोरणावर झालेल्या परिणामांचाही यात समावेश होतो. वसाहतवाद तसेच वर्णभेदाला विरोध यांसारखी मूल्ये ही भारताच्या स्वातंत्र्यलढ्यादरम्यान आखली गेली होती.

● **आर्थिक घटक :** अलिप्ततावादी धोरणाचा राजकीय, सामरिक, तसेच आर्थिक संदर्भही आहे. वासाहतिक काळापासून चालत आलेल्या गरिबी आणि मागासलेपणातून बाहेर येण्याची तीव्र गरज भारताला जाणवत होती. आर्थिक मदतीबरोबर जर अटी लादल्या जात असतील तर अशी मदत भारताने नाकारली आहे. आयात-पर्यायी धोरण आणि सार्वजनिक क्षेत्राचे महत्त्व यांचा भारताच्या परराष्ट्र धोरणावर मोठा परिणाम झाला. १९९१ नंतर उदारीकरण, खासगीकरण आणि जागतिकीकरणाचे धोरण अवलंबिल्यानंतर भारतीय परराष्ट्र धोरणात अनेक मूलभूत बदल घडून आले.

● **राजकीय घटक :** भारताचे परराष्ट्रधोरण बनवण्यात आणि राबवण्यात शासनाचे कार्यकारी मंडळ महत्त्वाची भूमिका बजावते, तर संसद 'जागल्या'ची (watch dog) भूमिका बजावते. राजकीय नेतृत्वाचा परराष्ट्र धोरणावर मोठा प्रभाव असतो. जवाहरलाल नेहरू, लालबहादूर शास्त्री, इंदिरा गांधी, राजीव गांधी, पी.व्ही.नरसिंहराव, अटलबिहारी वाजपेयी, मनमोहन सिंग आणि नरेंद्र मोदी या प्रधानमंत्र्यांनी भारताचे परराष्ट्र धोरण घडवण्यात निर्णायक भूमिका बजावली आहे. परराष्ट्र धोरणाचा आराखडा बनवणे आणि राजकीय नेतृत्वाला त्याविषयी सल्ला देणे, यात परराष्ट्र मंत्रालय महत्त्वाची भूमिका निभावते. त्याशिवाय राष्ट्रीय सुरक्षा सल्लागार यांचाही परराष्ट्र धोरण ठरवण्यात महत्त्वाचा सहभाग असतो.

● **आंतरराष्ट्रीय व्यवस्था :** शीतयुद्धाच्या काळात द्विध्रुवीय व्यवस्था आणि महासत्तांचे राजकारण यांचा भारतीय परराष्ट्र धोरणावर प्रभाव पडला. त्याचप्रमाणे, शीतयुद्ध संपल्यानंतर भारताच्या परराष्ट्र धोरणात मोठे बदल घडले. आंतरराष्ट्रीय व्यवस्थेप्रमाणे क्षेत्रीय व्यवस्थेचाही भारताच्या परराष्ट्र धोरणावर प्रभाव पडला आहे. शीतयुद्धोत्तर काळातील भारत-अमेरिकेदरम्यानचा संवाद, १९६० च्या दशकानंतरचा चीन-पाकिस्तान संवाद आणि १९९० नंतर रशिया आणि चीन यांच्यातील सुधारलेले संबंध यांचा भारताच्या परराष्ट्र धोरणावर परिणाम झालेला दिसून येतो.

### भारताचे जगाबरोबरील संबंध

प्रत्येक देशाचे परराष्ट्र धोरण हे जगातील इतर देशांशी संबंध स्थापन करून ते वाढवण्याचे साधन आहे. स्वातंत्र्यानंतर भारताने जगातल्या बहुतेक देशांशी संबंध प्रस्थापित केले आहेत. सर्वच देशांशी सारखेच चांगले आणि जवळचे संबंध असणे हे शक्यही नसते आणि आवश्यकही नसते. काही देशांबरोबरील संबंध इतर देशांपेक्षा जवळचे अथवा चांगले असतात. सामान्यपणे एखाद्या देशासाठी शेजारी देशांबरोबरील संबंध महत्त्वाचे असतात. मोठ्या सत्तांबरोबरील संबंध सर्व देशांसाठी महत्त्वाचे असतात.

या भागात आपण तीन मोठ्या देशांबरोबरच्या, तसेच भारताच्या शेजारी राष्ट्रांबरोबरच्या संबंधांचा आढावा घेणार आहोत.

### मोठ्या सत्ता

अमेरिका ही शीतयुद्धकाळातील दोन महासत्तांपैकी एक होती. आज शीतयुद्धोत्तर जगातील ती एकमेव महासत्ता आहे. शीतयुद्धकाळात सोव्हिएट रशिया ही दुसरी महासत्ता होती. रशिया हा तिचा वारसदार देश एकविसाव्या शतकात एक मोठी प्रभावशाली सत्ता म्हणून उदयास आला आहे. याच काळात चीनचाही मोठी सत्ता म्हणून उदय झाला आहे. एकविसाव्या शतकात उदयाला आलेल्या नवीन सत्तांपैकी भारत हाही एक आहे, असे म्हटले जाते.

**अमेरिका :** भारत देश स्वतंत्र झाला तेव्हा भारताचे अमेरिकेबरोबरील संबंध चांगले होते. ब्रिटनचे प्रधानमंत्री चर्चिल यांच्याशी अटलांटिक सनदेविषयी वाटाघाटी करताना अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष एफ.डी. रूझवेल्ट यांनी भारताच्या स्वातंत्र्याच्या मागणीला पाठिंबा दर्शविला होता. मात्र, शीतयुद्धातील घटनांविषयी भारत आणि अमेरिका यांची मते अगदीच भिन्न होती. त्यामुळे शीतयुद्धाच्या काळात त्या दोघांतील संबंध बहुतांशी तणावाचे राहिले.

हंगेरी आणि चेकोस्लोव्हेकिया येथील पेचप्रसंगाविषयी भारताचे स्वतंत्र मत आणि अमेरिकेच्या व्हिएतनाममधील हस्तक्षेपाचा भारताने केलेला निषेध, ही अमेरिकेच्या नाराजीची काही कारणे होती, तर दुसऱ्या बाजूला, अमेरिकेची काश्मीरच्या पेचप्रसंगाविषयीची भूमिका ही भारतासाठी सततची डोकेदुखी होती. १९७०च्या दशकापासून अमेरिका, पाकिस्तान आणि चीन यांची जवळीक ही भारताची मोठी समस्या होती.

शीतयुद्ध संपल्यानंतर आणि सोव्हिएट रशियाचे विघटन झाल्यानंतरही भारत–अमेरिका संबंध लगेच सुधारले नाहीत. भारताला अवकाश तंत्रज्ञानातील मदत थांबवावी याकरिता अमेरिकेने नव्याने जन्मास आलेल्या रशियावर दबाव आणला. १९९८ मधील भारताच्या दुसऱ्या अणुचाचणीनंतर अमेरिकेने भारतावर निर्बंध लादले होते.

विसाव्या शतकाच्या शेवटी भारत–अमेरिका संबंधांचे स्वरूप बदलू लागले. भारताने राष्ट्राध्यक्ष जॉर्ज बुश यांच्या दहशतवादविरोधी युद्धाच्या भूमिकेला पाठिंबा दिला. अमेरिकेची काश्मीर प्रश्नाविषयीची भूमिका हळूहळू भारताला अनुकूल होत गेली. पाकिस्तानस्थित दहशतवादी गटांनी २००१ मध्ये भारतीय संसदेवर हल्ला केला, तेव्हा पाकिस्तानने अशा प्रकारे सीमापार दहशतवादाला पाठबळ देणे थांबवावे असे अमेरिकेने पाकिस्तानला बजावले. २००८ मधील भारत–



अमेरिकन डाक सेवेचे दिवाळी निमित्त काढलेले पोस्टाचे तिकीट

अमेरिका नागरी आण्विक सहकार्य करारामुळे या दोन्ही देशांच्या संबंधांना वेगळे वळण मिळाले.

अमेरिकेसाठी भारत हा इंडो–पॅसिफिक क्षेत्रातील एक महत्वाचा भागीदार आहे. भारतासाठी अमेरिका हा गुंतवणुकीचा मोठा स्रोत आणि व्यापारातील मोठा भागीदार आहे. या दोन देशांतील संरक्षणविषयक संबंधांमध्ये सातत्याने वाढ होत आहे. तसेच हे दोन्ही देश भारत–अमेरिका – जपान, भारत – अमेरिका – जपान – ऑस्ट्रेलिया अशा बहुअक्षीय व्यासपीठांवरील भागीदार आहेत.

**सोव्हिएट रशिया/रशिया :** सोव्हिएट रशियाबरोबरील संबंध हे शीतयुद्धकाळातील भारताचे सर्वाधिक टिकाऊ संबंध होते. भारताच्या सार्वजनिक क्षेत्रातील अवजड उद्योगांसाठी सोव्हिएट रशियाने तंत्रज्ञान आणि कमी व्याजदराचे कर्ज अशी मदत देऊ केली. भारताच्या संरक्षण दलांना महत्वाची शस्त्रास्त्रे पुरवली, तसेच यांपैकी काही शस्त्रास्त्रांचे भारतात उत्पादन करण्याचे कराराही केले. या दोन देशांतील संबंधांमध्ये १९७१ चा भारत–सोव्हिएट मैत्री करार हा एक महत्त्वाचा टप्पा होता.



भारत–रशिया संयुक्त पोस्टाचे तिकीट

सोव्हिएट रशियाच्या विघटनानंतरच्या सुरवातीच्या काही वर्षांमध्ये भारत आणि नव्याने निर्माण झालेला रशिया यांचे संबंध चांगले नव्हते. १९९०च्या दशकाच्या शेवटी ते सुधारायला लागले. सुखोई लढाऊ विमाने


**माहीत आहे का तुम्हांला ?**

२००८ च्या नागरी आण्विक सहकार्य करारान्वये भारताने अणुप्रकल्पांचे 'नागरी' आणि 'लष्करी' असे विभाजन करून नागरी अणुप्रकल्प आंतरराष्ट्रीय अणुउर्जा आयोगाच्या देखरेखी खाली आणले. त्याबदल्यात अमेरिकेने भारताच्या नागरी अणुप्रकल्पांबरोबर संपूर्ण सहकार्य करण्याचे मान्य केले; ज्यामुळे भारत हा अण्वस्त्र प्रसारबंदी कराराच्या बाहेर राहूनही अण्वस्त्र क्षमता बाळगू शकणारा आणि आण्विक व्यापारात सहभागी होऊ शकणारा एकमेव देश झाला आहे.

आणि ब्रम्होस क्षेपणास्त्रे यांच्या एकत्रित उत्पादनासाठी रशियाने भारताबरोबर करार केले. कुडनकुलम येथील अणुउर्जा प्रकल्पासाठी अणुभट्ट्या देण्याचेही त्याने मान्य केले. रशियाने आपली "ॲडमिरल गोर्शकॉव" नावाची विमानवाहू युद्धनौका भारताला विकत दिली, जी आज "आयएनएस विक्रमादित्य" या नावाने ओळखली जाते. रशियातून येणारी शस्त्रास्त्रे हा आजही दोन देशांतील संबंधांचा पाया आहे. त्याशिवाय रशियातील साखालीन-१ येथील तेलक्षेत्रात दोन्ही देशांची गुंतवणूक आहे, ज्यातून भारताची ऊर्जा सुरक्षेची गरज अधोरेखित होते.

**चीन :** १९४९ मध्ये चीनमध्ये कम्युनिस्ट क्रांती झाली. कम्युनिस्ट चीनला मान्यता देणाऱ्या सुरुवातीच्या काही देशांपैकी भारत हा एक होता. त्यानंतर या दोन देशांमध्ये मैत्रीपूर्ण संबंध प्रस्थापित झाले. १९५४ मध्ये या दोन देशांनी व्यापार आणि सहकार्याचा करार केला, ज्यायोगे भारताने तिबेटवरील चीनच्या सार्वभौमत्वास मान्यता दिली.

मात्र १९५० च्या दशकाच्या अखेरीस भारत आणि चीन यांतील संबंध ताणले जाण्यास सुरुवात झाली. त्याचे एक कारण होते या दोन देशांतील सीमा विवाद – ज्यात भारतातील लडाख राज्यातील अक्साई चीनचा भाग आणि ईशान्येकडील 'नेफा' म्हणजेच आजचा अरुणाचल प्रदेश, यांचा समावेश होतो. त्यावरून १९६२ मध्ये झालेल्या भारत-चीन युद्धात भारताचा पराभव झाला. त्यानंतर दोघांनी आपापसांतील राजनयिक संबंध तोडले. भारत आणि चीन यांचे तिबेटच्या दर्जाबाबत देखील मतभेद आहेत. दलाई लामा यांना भारतात राजकीय आश्रय देण्यावरून चीनने भारताविरुद्ध टीका केली आहे.

१९७६ मध्ये भारत आणि चीनमधील राजनयिक संबंध पुन्हा प्रस्थापित झाले. प्रधानमंत्री मोरारजी देसाई आणि राजीव गांधी यांच्या काळात द्विपक्षीय संबंध सुधारण्याचे प्रयत्न झाले. दीर्घकालीन सीमा विवाद सोडवण्यासाठी संयुक्त कार्यगटांची स्थापना करण्यात आली. दोन्ही देशांदरम्यान प्रत्यक्ष नियंत्रण रेषेवर शांतता व सौहार्दपूर्ण वातावरण राखण्याचा करार झाला.



**भारत-चीन दरम्यानच्या सीमेलगतचा व्यापार, नथू ला**

एकविसाव्या शतकातील भारत-चीन संबंधांचे स्वरूप खूप गुंतागुंतीचे आहे. एका बाजूला, दोन्ही देशांतील सीमा विवादाचे अजूनही निराकरण झालेले नाही, त्यामुळे दोहोंदरम्यान अधूनमधून तणाव निर्माण होतच असतो. दुसऱ्या बाजूला भारताच्या सिक्कीम राज्यातील नथू ला रस्ता द्विपक्षीय व्यापारासाठी खुला करण्यात आला आहे. गेल्या दोन दशकात दोहोंदरम्यानचे व्यापारी संबंध वृद्धिंगत झाले आहेत. आज चीन भारताच्या सर्वांत मोठ्या व्यापारी भागीदारांपैकी एक आहे. चीनच्या महत्त्वाकांक्षी "बेल्ट अँड रोड" प्रकल्पाविषयी भारताच्या काही शंका आणि आक्षेप आहेत. तरीही जागतिक व्यापारी संघटना आणि वातावरण बदलाविषयीच्या वाटाघाटी यांत भारत आणि चीन एकमेकांचे भागीदार आहेत. चीनचा पाकिस्तानला असलेला पाठिंबा हीदेखील भारतासाठी एक समस्याच आहे.

### भारत-एक उगवती सत्ता

आज चीन आणि भारत हे आंतरराष्ट्रीय संबंधाना आकार देऊ शकणाऱ्या देशांमध्ये गणले जातात. लोकसंख्येच्या दृष्टीने भारत हा जगात दुसरा मोठा देश आहे, तो जगातल्या सर्वांत मोठ्या अर्थव्यवस्थांपैकी एक आहे. तसेच भारत हा जगातला सर्वांत मोठा लोकशाही देश आहे.

आण्विक, अवकाश आणि इलेक्ट्रॉनिक्स तंत्रज्ञानाच्या क्षेत्रात भारताने लक्षणीय प्रगती केली आहे. यामुळेच

जगातल्या सर्वांत मोठ्या वीस अर्थव्यवस्थांच्या व्यासपीठावर, म्हणजेच 'जी-२० फोरम' मध्ये भारताला स्थान मिळाले आहे. सर्वाधिक दराने वृद्धिंगत होणाऱ्या जगातील चार अर्थव्यवस्थांमध्ये (ब्राझील, रशिया, भारत आणि चीन - BRIC) भारत एक आहे. त्यानंतर या गटात २०१० साली दक्षिण आफ्रिकेचा समावेश झाला. या गटाला आता 'BRICS' असे म्हटले जाते. १९९०च्या दशकाच्या अखेरीस रशियाचे परराष्ट्र मंत्री येवगेनी प्रिमाकोव यांनी रशिया-चीन-भारत अशी त्रिपक्षीय शिखर परिषदेची कल्पना मांडली जी एक प्रकारे भारत ही उगवती प्रादेशिक सत्ता आहे याला दिलेली मान्यता होती.

### शेजारी देश

दक्षिण आशियातील सगळ्या देशांच्या सीमा भारताला लागून आहेत. म्यानमार, चीन, श्रीलंका, पाकिस्तान, बांगलादेश, थायलंड, इंडोनेशिया हे सगळे देश भारताचे शेजारी आहेत. याशिवाय हिंदी महासागर क्षेत्रातील देश, जे पूर्व आफ्रिका, पर्शियन आखात ते मलेशिया, व्हिएतनामपर्यंत पसरलेले आहेत आणि हिंदी महासागरावर अवलंबून असलेला मध्य आशियाई प्रदेश हा भारताचा विस्तारित शेजार आहे. स्वातंत्र्योत्तर काळात या सगळ्या देशांशी चांगले संबंध प्रस्थापित करणे हे भारताच्या परराष्ट्र धोरणाचे एक महत्त्वाचे उद्दिष्ट राहिलेले आहे.

**नकाशावर शोधा.**

अफगाणिस्तान हा भारताच्या सीमेलगतचा देश आहे का?

प्रधानमंत्री जवाहरलाल नेहरूंनी आशियाई आणि आफ्रिकी प्रादेशिकवादाची संकल्पना मांडली आणि सर्व नवस्वतंत्र देशांची एकजूट करण्याचा प्रयत्न केला. याची परिणती १९४७ ची आशियाई परिषद आणि १९५५ मध्ये इंडोनेशियातील बांडुंग येथील शिखर परिषदेत झाली. मात्र, शीतयुद्धाच्या प्रसारामुळे ही कल्पना मूळ धरू शकली नाही.

१९४७ मध्ये भारताची फाळणी झाली आणि पाकिस्तानची (पूर्व आणि पश्चिम पाकिस्तान) स्वतंत्र राष्ट्र म्हणून निर्मिती झाली. स्वातंत्र्याच्या काळापासूनच भारत आणि पाकिस्तान यांचे तणावाचे संबंध होते. त्यात मुख्य प्रश्न हा काश्मीरबाबत होता. त्या दोन्ही राष्ट्रांदरम्यान काश्मीरच्या प्रश्नावरून १९४७-४८ मध्ये युद्ध झाले. त्यानंतर काश्मीरची विभागणी झाली व पुढे १९६५ मध्ये पुन्हा काश्मीर प्रश्नावरून युद्ध झाले. १९७१ च्या भारत-पाकिस्तान युद्धानंतर बांगलादेशाची निर्मिती झाली. काश्मीरबाबतच्या वादाचे स्वरूप हे सुरुवातीला सीमावादाचे होते. पुढे १९९० च्या दशकात





लाल चौक, श्रीनगर - दोन भिन्न रूपे

त्याला दहशतवादाचे स्वरूप आले. आज देखील काश्मीरचा प्रश्न हा दोन्ही देशांतील सर्वांत महत्त्वाचा मानला जातो.

पाकिस्तानचे चीनशी असलेले वाढते संबंध हा देखील भारताच्या दृष्टीने चिंतेचा विषय आहे. चीनने पाकिस्तानमध्ये China-Pakistan Economic Corrider च्या आधारे गुंतवणूक करण्यास सुरुवात केली आहे.

भारत-पाकिस्तान दरम्यान शांतता प्रस्थापित करण्याचे अनेक प्रयत्न झाले आहेत. त्यात १९७२ चा 'सिमला करार' आणि १९९९ चा 'लाहोर करार' यांचा उल्लेख करता येईल, परंतु त्यात भारताच्या या प्रयत्नांना पाकिस्तानकडून योग्य प्रतिसाद मिळताना दिसत नाही.

ज्यांना "हिमालयीन राजवटी" म्हटले जाते ते नेपाळ, सिक्कीम आणि भूटान हे वसाहतकाळात ब्रिटिश सत्तेच्या प्रभुत्वाखालील देश होते. स्वातंत्र्यानंतर भारताने त्या देशांशी तशाच प्रकारचे करार केले. सागरी किनारा नसलेल्या या हिमालयीन राजवटींना भारतीय भूमीतून समुद्रप्रवेश मिळाला; तसेच भारताने या देशांच्या संरक्षणाची जबाबदारी स्वीकारली. भारताने या देशांच्या अंतर्गत बाबींमध्ये हस्तक्षेप न करण्याचे धोरण पाळले आहे.

१९७५ मध्ये सिक्कीमने भारतात विलीन होण्याचे ठरवले. आज ते भारतीय संघराज्यातील एक राज्य आहे. भारताच्या नेपाळबरोबरील संबंधात अनेक चढ-उतार आले. २००६ मध्ये भारताने नेपाळला अंतर्गत यादवीतून बाहेर पडून संवैधानिक शासनाकडे वाटचाल करण्यास मदत केली. भूटानबरोबरील संबंध बव्हंशी मैत्रीचे राहिले. अलीकडच्या काळात भारताने भूटानलाही संवैधानिक राजेशाही प्रस्थापित करण्यास मदत केली.

१९७१ मध्ये बांगलादेशाला स्वातंत्र्य मिळण्यात भारताने केलेला हस्तक्षेप निर्णायक ठरला. या नव्या देशाशी भारताचे संबंध सुरुवातीला अगदी चांगले होते. मात्र, बांगलादेशाचे पहिले प्रधानमंत्री शेख मुजीब उर-रहमान यांच्या हत्येनंतर ते बिघडत गेले. भू-सीमा आणि सागरी सीमा यांवरील विवाद, तीस्ता नदीच्या पाण्याच्या वाटपावरील विवाद या दोन देशांच्या संबंधातील काही समस्या होत्या, परंतु गेल्या पाच वर्षांहून अधिक काळ या दोन देशातील संबंध मैत्रीचे राहिले आहेत. सीमापार दहशतवाद आणि अंतर्गत विद्रोह या दोन्ही देशांच्या सामाईक समस्या आहेत. अलीकडेच भारत आणि बांगलादेशाने सागरी सीमेवरील आणि land enclave विवाद यशस्वीपणे सोडवला आहे.

ब्रह्मदेश (आताचा म्यानमार) आणि सिलोन (आताचा श्रीलंका) हे ब्रिटिश भारताचा भाग होते. स्वातंत्र्यानंतर भारताने या दोन्ही देशांशी चांगले संबंध प्रस्थापित केले. भारत, पाकिस्तान आणि इंडोनेशिया



**फराक्का बंधारा : १९९६ साली फराक्का येथील गंगा नदीच्या पाण्याच्या वाटपाबाबत भारत आणि बांगलादेश यांच्यामध्ये करार झाला.**

यांच्या बरोबरीने हे दोन्ही देश १९५५ च्या बांडुंग परिषदेचे सहनिमंत्रक होते.

श्रीलंकेबरोबरील संबंधात चांगले आणि वाईट अशी दोन्ही पर्वे येऊन गेली. श्रीलंकेबरोबरील सागरी सीमा विवादास्पद होती आणि त्या अनुषंगाने दोन्ही देशांतील मच्छिमार नकळतपणे एकमेकांच्या सागरी सीमा ओलांडून दुसरीकडे गेल्यामुळे पकडले जाण्याची समस्याही होती. त्याचप्रमाणे श्रीलंकेतील तमिळ प्रश्न हादेखील द्विपक्षीय संबंधातील एक समस्या होती. एलटीटीईला (विद्रोही तमिळ गट, जो पुढच्या काळात एक दहशतवादी गट झाला) पाठिंबा दिल्याचा आरोप श्रीलंकेने भारतावर केला होता. १९८७ मध्ये श्रीलंकेचे तत्कालीन राष्ट्राध्यक्ष जयवर्दने यांच्या विनंतीवरून भारताने श्रीलंकेत 'शांतीसेना' पाठवली होती. त्यानंतर दोन्ही देशांमध्ये वाईट संबंधांचे एक मोठे पर्व येऊन गेले. मात्र, दोन्ही देशांतील सध्याच्या शासनाच्या काळात संबंध पुन्हा एकदा सुधारले आहेत.

१९६२ च्या लष्करी उठावानंतर म्यानमारने स्वतःवर बाहेरच्या जगापासून अलिप्त राहण्याचे धोरण लादले, ज्यामुळे भारत-म्यानमार संबंध थंडावले. १९९२ मध्ये भारताने लोकशाहीवादी चळवळीला आणि तिच्या नेत्या आँग सान सु ची यांना पाठिंबा दर्शवला होता, मात्र त्यानंतर लगेचच भारताने म्यानमारमधील लष्करी राजवटीशी संबंध सुधारले. ईशान्य भारतातील अनेक विद्रोही गट आणि त्यांचे म्यानमारमध्ये दडलेले नेते यांच्याविरोधातील भारताच्या कारवाईला यश येण्यात म्यानमारच्या लष्करी राजवटीने दिलेला पाठिंबा अतिशय महत्त्वाचा ठरला.

पश्चिम आशियाई क्षेत्र भारतासाठी नेहमीच महत्त्वाचे राहिले आहे. आर्थिक विकासाचे इंजिन असलेले खनिज तेल याच क्षेत्रातील देशांमधून येते. अर्थात, पश्चिम आशियातील देशांशी चांगले संबंध ठेवण्यासाठी भारतास इतरही अनेक कारणे आहेत. इराण हा एक पारंपरिक मित्र आहे. मध्ययुगीन काळापासूनचे सांस्कृतिक आणि राजकीय संबंध टिकून राहिले आहेत आणि विसाव्या शतकातील संबंधांना त्यांनी आकार दिला आहे. तसेच सौदी अरेबियाबरोबरील संबंधही केवळ खनिज तेलाबाबतचे नसून ऐतिहासिक आणि धार्मिक घटकांनी त्याला आकार दिला आहे. पॅलेस्टिनी जनतेला आणि पॅलेस्टिन मुक्ती संघटनेला भारताने नेहमीच खंबीर पाठिंबा दिला आहे. पश्चिम आशियाई देशाबरोबरील मैत्रीचे संबंध आणखीही एका कारणासाठी महत्त्वाचे आहेत. त्यामुळे पाकिस्तानवर एक प्रकारचा दबाव येतो. त्याचबरोबर भारताने इस्राएलबरोबर उत्तम संबंध राहतील याची खबरदारी घेतली आहे. इस्राएल भारतात हाय-टेक संरक्षण सामग्री पुरवणारा एक महत्त्वाचा देश आहे.

स्वातंत्र्यानंतर जवाहरलाल नेहरू यांनी आशियाई देशांची एकी करण्याचा प्रयत्न केला. इंडोनेशिया हा या प्रयत्नातील भारताचा एक महत्त्वाचा भागीदार होता. परंतु १९६० च्या दशकात इंडोनेशियाबरोबरील संबंध हळूहळू थंडावले. शीतयुद्धाच्या काळात आग्नेय आशियातील बहुतेक देशांशी भारताचे संबंध अगदी नाममात्र होते, कारण हे देश शीतयुद्धामुळे झालेल्या गटबाजीमध्ये भारताच्या विरुद्ध बाजूला होते. व्हिएतनाम हा त्याला एक अपवाद होता. भारताने व्हिएत मिन्हच्या संघर्षाला पाठिंबा दिला होता आणि अमेरिकेच्या व्हिएतनाममधील हस्तक्षेपाला विरोध केला होता. आज व्हिएतनाम हा भारताचा एक महत्त्वाचा भागीदार देश आहे. या दोन देशांतील संबंध व्यापार, तंत्रज्ञान आणि लष्करी क्षेत्रात विस्तारले आहेत.

पूर्वाभिमुख धोरण आणि पूर्वाभिमुख कृतिशीलता यांचा भाग म्हणून भारताने या क्षेत्रातील देशांशी संबंध सुधारण्यास सुरुवात केली आहे. आज भारताचे सिंगापूरबरोबर अतिशय चांगले संबंध आहेत आणि हा देश भारताचा एक प्रमुख व्यापारी भागीदार तसेच भारतात गुंतवणूक करण्यास उत्सुक असा देश आहे. त्याचप्रमाणे जपान, थायलंड, मलेशिया आणि इंडोनेशियाबरोबरील संबंधही सुधारले आहेत. व्यापारी मार्गांची सुरक्षा, चाचेगिरीविरोधी कारवाया, सागरी संसाधनांची सुरक्षा हे भारताच्या या देशांबरोबरील सहकार्याचे महत्त्वाचे मुद्दे आहेत.

शीतयुद्ध संपल्यानंतर आग्नेय आशियातील आंतरराष्ट्रीय संबंधांनी वेगळेच वळण घेतले. आसियानचे सदस्यत्व पाचवरून वाढून दहावर पोचले आणि तो गट या क्षेत्रातील एक बलशाली गट बनला. आसियानने महत्त्वाच्या देशांशी आर्थिक भागीदारी प्रस्थापित करण्यास सुरुवात केली. याचा भारतालाही फायदा झाला. भारताचा आसियानबरोबर मुक्त व्यापाराचा करार आहे. तसेच आसियान-पुरस्कृत क्षेत्रीय सुरक्षा संघटना, आसियान रीजनल फोरमचाही तो एक सदस्य आहे.

सार्क, शांघाय सहकार्य संघटना, यांसारख्या अनेक क्षेत्रीय संघटनामध्ये भारत एक कृतीशील सदस्य आहे. तसेच भारताने स्वतः BIMSTEC, मेकाँग-गंगा सहकार्य यांसारख्या अनेक गटांना चालना दिली आहे.

### आफ्रिका

१९५० आणि १९६० च्या दशकात आफ्रिकेतील वसाहतवादविरोधी, राष्ट्रीय स्वातंत्र्याच्या चळवळी आणि तेथील भारतीय वंशाचे लोक हे भारताच्या आफ्रिका धोरणाचे लक्ष्य होते. भारताने वंशवादी भेदाभेदाला विरोध केला. हरारे येथील अलिप्ततावादी चळवळीच्या शिखर परिषदेदरम्यान निर्माण केलेल्या 'आफ्रिका फंड' (Action For Resisting Invasion, Colonialism and Apartheid Fund-Africa Fund) या माध्यमातून देखील मदत केली गेली.




भारत-आफ्रिका शिखर परिषद, नवी दिल्ली, २०१५

आफ्रिकेबरोबरील भारताच्या संबंधात अनेक मुद्दे आणि संधी आहेत :

(i) १९९० नंतर बदललेल्या जागतिक व्यवस्थेत ऊर्जा सुरक्षेचा मुद्दा ऐरणीवर आला आहे. सध्या भारताच्या खनिज तेल आयातीपैकी सुमारे २४% तेल आफ्रिकेतून येते. भारतीय तेल कंपन्यांनी आफ्रिकेतील तेलखाणीमध्ये गुंतवणूक केली आहे. ONGC Videsh ची सुदान आणि इजिप्तमध्ये, ONGC Mittal Energy ची नायजेरियात गुंतवणूक आहे; तर रिलायन्स समूहाच्या नायजेरिया, अंगोला, चाड, कॅमेरून, काँगो येथे वाटाघाटी चालू आहेत.

(ii) भारतीय उद्योग क्षेत्राने आता आफ्रिकेत रस घ्यायला सुरुवात केली आहे. ते आफ्रिकेतील विकसनशील देशांना तंत्रज्ञान आणि इतर मदत देण्याची शक्यता आहे.

(iii) पूर्व आणि दक्षिणी आफ्रिकी देशात मिळून भारतीय वंशाचे सुमारे दोन कोटी लोक राहातात. भारताने आता त्यांच्याकडे अधिक सकारात्मक दृष्टीने पाहायला सुरुवात केली आहे.

(iv) हिंदी महासागरातील सुरक्षा हा भारतासाठी काळजीचा मुद्दा आहे. भारताच्या या सामरिक दृष्टिकोनात सोमालियापासून दक्षिण आफ्रिकेपर्यंतचे सर्व देश येतात. सोमाली समुद्रातील चाचेगिरीच्या वाढत्या घटना आणि दहशतवादाचा वाढता धोका हे भारतासाठी संवेदनशील मुद्दे आहेत.

(v) भारतातील अग्रगण्य सैनिकी प्रशिक्षण संस्था हे आफ्रिकी देशांचे आकर्षण आहे. पुण्यातील राष्ट्रीय संरक्षण प्रबोधिनी (NDA) (येथील 'सुदान ब्लॉक' नावाची मुख्य इमारत हे भारत-सुदान सहकार्याचे प्रतीक आहे), डेहराडूनची इंडियन मिलिटरी अकादमी आणि वेलिंग्टन येथील स्टाफ कॉलेज यांचा त्यात समावेश होतो.

### हिंदी महासागर क्षेत्र

हिंदी महासागर हा जगातील सर्वांत जास्त वावर असलेला आणि महत्त्वाचा सागरी वाहतुकीचा मार्ग

आहे. येथून दरवर्षी सुमारे एक लाख मालवाहू जहाजे ये-जा करतात; ज्यातून जगातील कंटेनर वाहतुकींपैकी निम्मी वाहतूक, एक-तृतीयांश मालवाहतूक आणि खनिज तेलाच्या एकूण वाहतुकींपैकी दोन-तृतीयांश वाहतूक होते. हिंदी महासागराच्या किनारपट्टीवरील देशांच्या अर्थव्यवस्था बंदरांवर, मालवाहतुकीवर आणि महत्वाचे म्हणजे तेथील समुद्रातील सागरी संसाधनावर अवलंबून आहेत.

भारताच्या परराष्ट्र धोरण आणि सुरक्षेच्या संदर्भात त्याचा विस्तृत समुद्रकिनारा हे आव्हानही आहे आणि संधीही. भारताचा समुद्रकिनारा सुमारे ७५०० कि.मी. लांबीचा आहे; तसेच पश्चिमेकडील लक्षद्वीप आणि पूर्वेकडील अंदमान आणि निकोबार यांच्यादरम्यान शेकडो बेटे आहेत. भारताच्या दक्षिणेकडे इंडोनेशिया फक्त ९० सागरी मैल अंतरावर आहे. भारताला २.४ लाख वर्ग कि.मी. चे विशेष आर्थिक क्षेत्र लाभले आहे. भारताच्या व्यापारापैकी ९०% वाहतूक आणि खनिज तेलाची बहुतेक आयात सागरी मार्गाने होते. मत्स्य, खनिजे, तेल इत्यादी संसाधने यांच्यामुळे समुद्रकिनारा ही संधी आहे. पण दुसऱ्या बाजूला समुद्रामुळे अशा अनेक घटकांना भारतात सहज प्रवेश मिळू शकतो, जे राष्ट्रीय सुरक्षेला घातक ठरू शकते.

१९४८ च्या नौदल योजनेत प्रथमच भारताचा सागरी दृष्टिकोन मांडला गेला. १९६५ च्या भारत-पाकिस्तान संघर्षात भारतीय नौदलाची भूमिका व्यापारी मार्ग नियंत्रित करण्यापुरती मर्यादित होती. १९७१ च्या युद्धात भारतीय नौदलाने प्रथमच महत्वाची भूमिका बजावली. भारतीय नौदलाच्या सागरी रणनीतीमध्ये परराष्ट्र धोरणाला पाठबळ पुरवण्यासाठी शक्तीप्रदर्शन करण्याची गरज अधोरेखित केली आहे.

७५०० कि.मी.चा समुद्रकिनारा आणि १४५०० कि.मी.चे वापरू शकता येतील असे जलमार्ग आणि हिंदी महासागरातील सामरिक स्थान यांचा उपयोग करण्यासाठी भारताने 'सागरमाला' ही बंदराधारित विकासाची योजना आणि त्याला पूरक अशी 'भारतमाला' ही योजनाही आखली आहे. भारतमाला या योजनेत रस्त्यांचा व्यापक विकास आणि ते बंदरांना जोडणे अभिप्रेत आहे. बंदरे आणि जलमार्ग यांच्यासाठी सागरमाला ही पूरक योजना आहे.

शीतयुद्धाच्या काळात भारताचे परराष्ट्रीय धोरण तीन तत्वांभोवती आखले गेले होते. आंतरराष्ट्रीय व्यवस्थेत अलिप्ततावाद, अंतर्गत क्षेत्रात स्वायत्तता आणि विकसनशील राष्ट्रांबाबत एकता. १९९१ नंतर भारताच्या जागतिक दृष्टिकोनात बदल झाला. आर्थिक उदारीकरणाच्या धोरणाद्वारे भारताची अर्थव्यवस्था खुली करण्यात आली. वास्तववादी दृष्टिकोनावर आधारित राष्ट्रहिताच्या चौकटीत भारताने वेगवेगळ्या देशांशी संबंध आखण्यास सुरुवात केली शीतयुद्धाच्या काळात भारताकडे एक गरीब विकसनशील राष्ट्र म्हणून बघितले जात असे. १९९० च्या दशकात भारत आर्थिक आणि तंत्रज्ञानाच्या क्षेत्रात एक सक्षम राष्ट्र म्हणून पुढे आले आहे. आज भारताचा जागतिक राजकारणात सक्रिय सहभाग आहे.




**माहीत आहे का तुम्हांला ?**

**आयोरा** (Indian Ocean Rim Association–IORA) **:** दक्षिण आफ्रिकेचे राष्ट्राध्यक्ष नेल्सन मंडेला यांनी १९९५ मध्ये भारताला भेट दिली तेव्हा IORA च्या संकल्पनेने जन्म घेतला. ते असे म्हणाले की, ऐतिहासिक आणि भौगोलिक घटकांच्या पलीकडे जाऊन हिंदी महासागराची किनारपट्टी सामाजिक-आर्थिक आणि इतरही शांततामय योजनांवर सहकार्य करण्याचे व्यासपीठ व्हावे. अलीकडच्या काळात आंतरराष्ट्रीय व्यवस्थेत जे बदल झाले आहेत, त्यामुळे ही गरज निर्माण झाली आहे. या भावनेतून मार्च १९९७ मध्ये IORAचा जन्म झाला. आज या संघटनेत २२ सभासद आणि ९ संवाद-भागीदार आहेत. हिंदी महासागर क्षेत्राचा आणि सभासद देशांचा शाश्वत आणि संतुलित विकास करणे आणि क्षेत्रीय विकासासाठी सामाईक व्यासपीठ तयार करणे, ही IORA ची मुख्य उद्दिष्टे आहेत.

**हे करा. (जगाच्या नकाशाकडे एका वेगळ्या दृष्टिकोनातून पहा.)**

खाली दिलेल्या नकाशाचा अभ्यास करा. तुम्ही जेव्हा हिंदी महासागरातील भारतीय द्वीपकल्पाचे स्थान पाहाल, तेव्हा भारतासाठी त्याचे असलेले महत्त्व तुमच्या लक्षात येईल. या नकाशाच्या आधारे वर्गात 'हिंदी महासागराचे महत्त्व' यावर चर्चा करा.




हिंदी महासागर

**See the following website for additional information:**

1. Ministry of External Affairs, Government of India, Briefs on Foreign Relations
   This website provides: (i) Briefs on India and Regional Organisations and (ii) Briefs on Bilateral Relations with various countries. **https://mea.gov.in/foreign-relations.htm**
2. India and the United Nations, Ministry of External Affairs, Government of India
   **https://www.mea.gov.in/india-and-the-united-nations.htm3.**
   Government of Maharashtra, E Governance Policy, 23 September 2011
3. Annual reports, Ministry of External Affairs, Government of India.
   **https://www.mea.gov.in/annual-reports.htm?57/Annual_Reports**

## स्वाध्याय

**प्र.१ (अ) दिलेल्या पर्यायांपैकी योग्य पर्याय निवडून विधाने पूर्ण करा.**

(१) अलिप्ततावादाचा गाभा हा आहे -
- (अ) जागतिक घडामोडींचे स्वतंत्र आकलन
- (ब) शीतयुद्धात सहभाग
- (क) लोकशाही समाजवाद एक धोरण
- (ड) प्रादेशिकतावादाचे धोरण

(२) भारताने नदी पाणी वाटपाबाबत फराक्का करार या देशाबरोबर केला आहे -
- (अ) बांगलादेश
- (ब) पाकिस्तान
- (क) चीन
- (ड) नेपाळ

**(ब) गटातील चुकीची जोडी दुरुस्त करून लिहा.**

(१)
- (a) NATO - युरोप
- (b) ANZUS - आफ्रिका
- (c) SEATO - दक्षिण पूर्व आशिया
- (d) CINTO - पश्चिम आशिया

**प्र.२ खालील विधाने चूक की बरोबर ते सकारण लिहा.**

(१) म्यानमार हा भारताचा पारंपरिक मित्र आहे.

(२) १९९० नंतर बदललेल्या जागतिक व्यवस्थेत दहशतवादाचा मुद्दा ऐरणीवर आला आहे.

(३) सागरमाला या योजनेत रस्त्यांचा व्यापक विकास अभिप्रेत आहे.

**प्र.३ आपले मत नोंदवा.**

हिंदी महासागरात भारताची भूमिका.

**प्र.४ खालील प्रश्नांची उत्तरे लिहा.**

(१) भारत-आफ्रिका संबंधांवर टीप लिहा.

(२) भारत-चीन संबंधांवर थोडक्यात चर्चा करा.

**प्र.५ पुढील प्रश्नाचे उत्तर दिलेल्या मुद्द्यांच्या आधारे लिहा.**

भारताच्या परराष्ट्र धोरणाला प्रभावित करणारे घटक पुढील मुद्द्यांच्या आधारे सविस्तर लिहा.

(अ) भौगोलिक घटक (ब) ऐतिहासिक घटक

(क) आर्थिक घटक (ड) राजकीय घटक

(इ) आंतरराष्ट्रीय व्यवस्था

**उपक्रम**

भारताच्या परराष्ट्र धोरणाबाबत पं.जवाहरलाल नेहरू यांचे आकाशवाणीवरील ७ सप्टेंबर १९४६ चे भाषण वाचा व त्यावर चर्चा करा.


## परिशिष्ट I : संक्षिप्त रूपे


| | | |
|---|---|---|
| ANZUS | : | Australia New Zealand United States |
| ARF | : | ASEAN Regional Forum |
| ASEAN | : | Association of Southeast Asian Nations |
| BIMSTEC | : | Bay of Bengal Initiative for Multi-Sectoral Technical and Economic Cooperation |
| BRICS | : | Brazil, Russia, India, China, South Africa |
| CENTO | : | Central Treaty Organisation |
| ECJ | : | European Court of Justice |
| ECOSOC | : | Economic and Social Council |
| ECSC | : | European Coal and Steel Community |
| EEC | : | European Economic Community |
| ETA | : | Euskadi Ta Askatasuna (Basque separatist group, Spain) |
| EU | : | European Union |
| G 20 | : | Group of 20 |
| GATT | : | General Agreement on Tariffs and Trade |
| IAEA | : | International Atomic Energy Agency |
| IORA | : | Indian Ocean Rim Association |
| IRA | : | Irish Republican Army |
| JKLF | : | Jammu Kashmir Liberation Front |
| LTTE | : | Liberation Tigers of Tamil Eelam |
| NATO | : | North Atlantic Treaty Organisation |
| NPT | : | Nuclear Non-Proliferation Treaty |
| PLO | : | Palestine Liberation Organisation |
| SAARC | : | South Asian Association for Regional Cooperation |
| SAFTA | : | South Asian Free Trade Area |
| SAPTA | : | South Asian Preferential Trading Arrangement |
| SCO | : | Shanghai Cooperation Organisation |
| SEATO | : | Southeast Asia Treaty Organisation |
| TRIPS | : | Agreement on Trade-Related Aspects of Intellectual Property Rights |
| UNCED | : | UN Conference on Environment and Development |
| WTO | : | World Trade Organisation |

## परिशिष्ट II : ईशान्य भारतातील राज्यांसंदर्भातील काही माहिती

**North Eastern Region of India, comprises of the states of Arunachal Pradesh, Assam, Manipur, Meghalaya, Mizoram, Nagaland, Sikkim and Tripura**

## DEMOGRAPHIC PROFILE




| | Arunachal Pradesh | Assam | Manipur | Meghalaya | Mizoram | Nagaland | Sikkim | Tripura |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| Persons | 1,383,727 | 31,205,576 | 2,570,390 | 2,966,889 | 1,097,206 | 1,978,502 | 610,577 | 3,673,917 |
| Males | 713,912 | 15,939,443 | 1,290,171 | 1,491,832 | 555,339 | 1,024,649 | 323,070 | 1,874,376 |
| Females | 669,815 | 15,266,133 | 1,280,219 | 1,475,057 | 541,867 | 953,853 | 287,507 | 1,799,541 |


## CONSTITUTIONAL PROVISIONS



| Article | Description |
|---|---|
| A. Part IX - The Panchayats | |
| Article 243M | Part not to apply to Certain Areas |
| Article 243ZC | Part not to apply to Certain Areas |
| B. Part X - The Scheduled and Tribal Areas | |
| Article 244 | Administration of Scheduled Areas and Tribal Areas |
| Article 244A | Formation of an autonomous State comprising certain tribal areas in Assam and creation of local Legislature or Council of Ministers or both therefore |
| C. Part XXI - Temporary, Transitional and Special Provisions | |
| Article 371A | Special provision with respect to the State of Nagaland |
| Article 371B | Special provision with respect to the State of Assam |
| Article 371C | Special provision with respect to the State of Manipur |
| Article 371F | Special provision with respect to the State of Sikkim |
| Article 371G | Special provision with respect to the State of Mizoram |
| Article 371H | Special provision with respect to the State of Arunachal Pradesh |
| D. Sixth Schedule | |
| Articles 244(2) and 275(1) | Provisions as to the Administration of Tribal Areas in the States of Assam, Meghalaya, Tripura and Mizoram |

Major Religions : Hinduism, Islam, Christianity, Buddhism

Languages spoken : English, Hindi, Assamese, Khasi, Garo, Jaintia, Manipuri, Mizo, Nagamese, Bengali, Nepali, Bhutia (Sikkimese), Bhutia (Tibetan), Lepcha, Limboo, Local dialects.

Source : North Eastern Council, Government of India
http://necouncil.gov.in/northeastindia/constitutional-provisions



या पाठ्यपुस्तकाच्या आधारे आंतरराष्ट्रीय घडामोडींच्या नोंदी करा.

महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ, पुणे.

राज्यशास्त्र इयत्ता बारावी (मराठी माध्यम) ₹ ५५.००







